# माणूस

शनिवार । ११ डिसेंबर १९७६ । साठ पैसे

## अशा राक्षसाचा विकास आपल्या गावात होऊ देऊ नका..

### पू. बाबा महाराज आर्वीकर

श्रीक्षेत्र माचणूर. पंढरपुरापासून वीस-बावीस मैल अंतरावर असलेले ठिकाण. तालुका मंगळवेढा. चोखामेळा आणि दामाजीपंत यांच्या काळापासून दुष्काळासाठी प्रसिद्ध असलेला भाग. सातशे वर्षे उलटली. भक्तीचे मळे जेथे सातत्याने फुलले, तेथे अजूनही दुष्काळाची सतत भीती बाळगत जगावे लागते. चंद्रभागा संथ वाहत असते. कोटयवधी लोकांची पापे तिने आजवर धुतली असतील. पण आसपासचा मुलुख हिरवा करून सोडावा, येथील लोकांचे अन्नदुर्भिक्ष कायमचे मिटवावे असे तिला कधी वाटले नाही. यंदाचे वर्षही याला अपवाद नाही. एक पाऊस न पडता तर होतीच नेहमीची ओरड. माचणूरचा उत्सव होतो की नाही, याची शेवटपर्यंत चिंता. अनेकांनी देवाला साकडे घातले. देव शेवटी धावून आला. पुरेसा पाऊस पडला. माणसे पुन्हा चिंता न करायला, आकाशाकडे डोळे लावून बसायला मोकळी झाली.

वर्षानुवर्षे हे असे चालूच आहे. त्यांना जमिनीकडे पाहायला कुणी सांगितलेच नाही. दहा-बारा वर्षांपासून मात्र, या वृत्तीत थोडा बदल घडवून आणावा या उद्देशाने माचणूर या ठिकाणी एक केंद्र सुरू करण्यात आले. शुद्ध विठ्ठलभक्ती बरोबरच लोकांचे ऐहिक कल्याण साधावे या दृष्टिकोनातून या केंद्राची उभारणी होऊ लागली. प्रथम प्रथम सांप्रदायिकांचा विरोधही झाला. यंदा उत्सवाच्या चालकांना गुरांचे व सुधारलेल्या शेतीतंत्राचे एक प्रदर्शन भरवायचे होते. शुद्ध सांप्रदायिकांना हे मान्य नव्हते. शासनानेही दुष्काळाची शक्यता होती म्हणून प्रदर्शनाला परवानगी नाकारली. त्यामुळे प्रदर्शन झाले नाही, पण पुढच्या वर्षी प्रदर्शन भरवण्याचा चालकांचा विचार आहे. सांप्रदायिक नाखुषीने का होईना, या उपक्रमांना मान्यता देत आहेत. यंदा परंपरेला सोडून असलेल्या काही विषयांवर प्रवचने मात्र झाली, परिसंवाद-व्याख्यानांचे कार्यक्रम चालकांनी आवर्जून घडवून आणले. खेडयापाडयात विज्ञानाचा प्रसार कसा होईल या विषयावर पुण्याच्या नॅशनल केमिकल लेबॉरेटरीचे संचालक डॉ. टिळक यांच्या अध्यक्षतेखाली एक परिसंवाद झाला. प्रा. गं. भा. सरदार यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून संतवाङ्मयाची फलश्रुती उपस्थितांसमोर मांडली. 'ग्रामीण आणि शहरी संस्कृती' या विषयावरील परिसंवादात सोलापूरच्या 'संचार' या वृत्तपत्राचे संपादक श्री. रंगा वैद्य यांनी शेतकऱ्यांना शेतीमालाचे भाव बांधून दिल्याशिवाय ग्रामीण भागांचे उत्थान होणार नाही, असे आग्रहाने प्रतिपादन केले; श्री. बिंदूमाधव जोशी यांनी मधले दलाल वगळून ग्रामीण उत्पादकाशी थेट संपर्क साधण्यासाठी पुण्याची ग्राहक पंचायत कशी प्रयत्नशील आहे, याचा वस्तुपाठ श्रोत्यांसमोर ठेवला. पारमार्थिक भजनपूजने होतीच. पण त्यासोबत प्रपंचविज्ञानाचाही उपक्रम आवर्जून योजला गेला होता. यामुळे ओढाताण जाणवत होती हे खरे. सुमन ताडे यांच्या 'ठेविले अनंते' या अभंगावरच्या रसाळ

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सोळावे – अंक अठ्ठाविसावा**

**११ डिसेंबर १९७६**

**मूल्य : साठ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


परमार्थप्रवचनात श्रोते तल्लीन होतात न होतात; तोच पुढच्या ज्ञानसत्राची घंटा वाजे आणि लय विस्कटून जाई. प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही टोके एकदम पकडण्यासाठी चालकांनी चालवलेली ही धडपड स्पृहणीय, पण मधून वाटे असे, की हे शक्य आहे का ? दुष्काळ पडल्यावर ही इष्टापत्ती मानून तुकारामाने संसार मोडला आणि भंडारा डोंगरावर तो निघून गेला. प्रपंचविज्ञान सांगते– त्याने असे करायला नको होते. लोकात जागृती निर्माण करायला हवी होती. दुष्काळाची कारणे हुडकून ती दूर करण्याचा प्रयत्न त्याने का करू नये ? शुद्ध भौतिकता किंवा शुद्ध अध्यात्म एकमार्गी असल्याने आचरण्यास सरळ आणि सुलभ, पण या दोहोंचा समन्वय फार कठिण. मग कोणी सांगितली आहे ही उरस्फोड ? ती केल्याशिवाय मात्र गत्यंतरही नसते. माणसाचे शरीर 'धर्मक्षेत्र' आहे, 'कुरूक्षेत्र'ही आहे, तोवर ही उरस्फोड अटळ आहे. सृष्टीच्या उत्क्रांतीतील मानवाचे विशिष्ट स्थान त्याला या दोन्ही क्षेत्रात वावरण्यास भाग पाडत आहे. माणसाला नियतीने टाकलेला हा सनातन पेच आहे आणि सगळे श्रेष्ठ ज्ञानविज्ञान हा पेच कसा सोडवावा, याविषयीच्या चिंतनातून निर्माण झालेले आहे. प्रवृत्तीचा अतिरेक माणसाला पशु बनवतो आणि निवृत्तीवादानेही जडता येते. सत्वाधिष्ठित रजोगुणाचा आदर्श नेहमी समाजासमोर असावा असे टिळक म्हणत असत. माचणूरच्या उत्सवाची, विशेषतः यंदाच्या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात साजऱ्या झालेल्या साधनासप्ताहाची मांडणी, हा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन करण्यात आली होती आणि ती बरीच परिणामकारकही ठरत होती. ज्यांना प्रवृत्ती किंवा निवृत्ती यापैकी एकाच मार्गाने पुढे-शेवटपर्यंत जायचे असते अशांना ही मांडणी अर्थातच अपूर्ण व वरवरची वाटण्याचा संभव आहे. पण उत्सव, मेळावे अशा थोड्यांसाठी नसतातच. ते समुदायांसाठी असतात. या दृष्टीने माचणूरचा यंदाचा उत्सव खूपच यशस्वी व मार्गदर्शक ठरला असे म्हणायला हरकत नाही. आपल्या धार्मिक संचिताचा असा नवा उपयोग जितक्या मोठ्या प्रमाणावर होईल तितका हवा आहे. सरळ दोन भाग कल्पिले जावेत. जसे ते कलेच्या किंवा विज्ञानाच्या क्षेत्रात कल्पिले जातात. शुद्ध कला, शुद्ध विज्ञान आणि शुद्ध अध्यात्म यांची एक पातळी; दुसरी पातळी उपयोजनाची. उपयोजित ( applied ) कला असू शकते, विज्ञान असू शकते, मग अध्यात्म का नसावे ? एकनाथ - रामदासांपासून अशी उपयोजनाची परंपरा आपल्याकडे आहे. नाथांनी

भागवतापाठोपाठ रामायणावर एरव्ही ग्रंथ कशाला लिहिला असता ? भारुडे कशाला रचली असती ? दासबोध हा तर उपयोजनावरील ग्रंथराज आहे. रामदासांचा महाराष्ट्रधर्म हा वारकरी संतांच्या भागवत धर्माचेच स्थलकालसापेक्ष असे उपयोजन ( application ) आहे. ही परंपरा अगदी आधुनिक काळातही दिसून येते. रामकृष्ण परमहंसांच्या शुद्ध अध्यात्माचे विवेकानंदांनी उपयोजन केले. गांधीजी याच परंपरेचे प्रतीक होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला ही परंपरा अशी उपयोगी ठरली, तर नवभारताच्या उभारणीसाठी ती टाकावूच ठरेल असे समजण्याचे कारण नाही. शुद्ध विज्ञानात मौलिक संशोधन करणारे न्यूटन किंवा आईन्स्टाईन शतकातून एखाददुसरेच होत असतात. पण विज्ञानाच्या उपयोजनासाठी शेकडो प्रयोगशाळा अस्तित्वात असतात व त्यात हजारो वैज्ञानिक कामे करीत असतात. यातून वैज्ञानिक संस्कृतीचे पाऊल पुढे पुढे पडत जाते. अध्यात्मक्षेत्रही याच क्रमाने विकसित होते. मानवजातीच्या आध्यात्मिक ज्ञानात--अनुभवात नवीन भर टाकणारा ख्रिस्त, बुद्ध, ज्ञानेश्वर किंवा परमहंस शतकाशतकातून एखादाच उदयास येतो. पण या ज्ञानाचे-अनुभवाचे उपयोजन झाले नाही तर आध्यात्मिक 'मूल्ये' निर्माण होत नाहीत.फक्त विचार अस्तित्वात राहतात. वैज्ञानिक संस्कृती म्हणजे जसा बुद्धिवादाचा स्वीकार, तसे आध्यात्मिक 'मूल्य' म्हणजे मानवामानवामधील आणि मानव आणि निसर्ग यामधील प्रेमभाव--एकात्मतेची जाणीव. या जाणिवेशिवाय मानवी जीवन कोरडे, भकास, आणि उध्वस्त होत आहे हे आज वैज्ञानिकदेखील सांगू लागले आहेत. मग शुद्ध प्रेमाचा शुद्ध भागवतधर्म आणि त्याचे स्थलकालसापेक्ष असे माचणूरसारखे उपयोजन या दोन्हींचे स्वागतच व्हायला हवे--असे अनेक उपयोजनप्रयोग ठिकठिकाणी उभे रहायला हवेत.

माचणूर प्रयोगक्षेत्र उभारताना कोणती दृष्टी बाळगण्यात आली होती ? मूळ प्रेरणा बाबामहाराज आर्वीकर यांची. बाबामहाराज यांची काही भाषणे, प्रवचने उपलब्ध आहेत. त्यावरून या प्रयोगक्षेत्रामागील दृष्टिकोनाची थोडी कल्पना येऊ शकते. 'चुये' या एका गावातील गावकऱ्यांसमोर केलेल्या भाषणात बाबामहाराज म्हणाले होते--

'गावाचे कल्याण व्हावे असे वाटत असेल तर गावातले सर्व पक्ष, पंथ, जाती मोडून टाका. गाव हाच एक पक्ष ! पक्षोपक्षांच्या ज्वालेत गाव होरपळून देऊ नका. ऐक्याच्या' भावनेतच गावाचा विकास आहे. धर्माची सुरुवात याच वृत्तीपासून होते. विकासाचा निश्चित मार्ग ज्ञात नसला म्हणजे विपरीत घटना घडतातच. साऱ्या देशात आज हेच चालले आहे. विकास नेमका कशात आहे व तो कसा साधावा हे अंधःकारमय परिस्थितीतून चाललेल्या माणसांनी ठरविणे घातक आहे. विकास हा मानवी प्रवृत्तीच्या स्नेहमय अवस्थेचा व्हावयाचा असतो. माझे घर--माझे गाव-या भावनेत विकासाचे मूळ आहे. जेव्हा त्यातील 'माझा' शब्द विसरला जातो तेव्हा विकास हा राक्षस बनतो. अशा राक्षसाचा विकास आपल्या गावात होऊ देऊ नका.

माणसात देव पहाल व त्याच्या आत्म्याला शांत करणारे काम कराल तेव्हाच खरे भजन होणार आहे. मानवामानवात भांडणे ही पशुता आहे. भजनपूजनादी कार्यक्रमांद्वारे ही पशुता नष्ट करावयाची असते. पण आपला पशुपणा राखून भजनपूजन करणारे लोक धार्मिक नव्हेत हे निश्चित समजा. अशा धर्महीन वृत्तीला गावात थारा देऊ नका. आपले गाव स्वर्गतुल्य करण्यासाठी सारे मिळून अहर्निश झटत रहा. गाव स्वच्छ करण्यापूर्वी तुमचे संतान धैर्यशाली करा. गावात देवळे बांधण्यापूर्वी स्त्रियांचे शील-पावित्र्य रक्षण करा. यामुळे प्रत्येक घरच देऊळ बनेल.

प्रथम तुम्ही प्रत्येकजण महान् व मंगल होण्यासाठी सावधान असा. द्वेष, सूड, मत्सर व परहानी या दोषांना मूठमाती द्या. मग गावात मंदिरे, विद्यामंदिरे, विद्युत्दीपांचे झोत, नळ या व्यवस्था करा. श्रम, परोपकार, सहिष्णुता प्रेम व ज्ञान संपादन करण्याची पराकाष्ठा करा. यासाठी कोणताही पक्ष, राजकीय डाव नको. यासाठी हवी आहे निर्मळ माणुसकी............

जुन्या भागवतधर्मवृक्षाला आलेले हे नवे मानवताधर्माचे फळ परिपक्व नाही असे कोण म्हणेल ?

माणसाने स्वतःही बदलले पाहिजे--परिस्थितीही बदलवून घेतली पाहिजे, हेच नवा मानवताधर्म सांगतो.

सुरुवात गावापासून.

म्हणून तर 'ग्रामायन'चे काही कार्यकर्ते या धार्मिक उत्सवाला--माचणूरच्या मेळाव्याला मुद्दाम पुण्याहून गेलेले होते. हेमलकसा--भमरागडच्या आदिवासी भागात काम करणारा जगदीश गोडबोले म्हणून तर इतक्या लांबवरून येथे येऊन तळ ठोकून बसला होता. वास्तविक तो काही भजनपूजनवाला नाही. पण धर्माचा उपयोग समाजपरिवर्तनासाठी करून घ्यायला हवा असे त्याचे, प्रत्यक्ष काम करता करता झालेले मत. म्हणून तो माचणूरकडे वळला आणि इतरांनीही वळावे असे आता तो सांगू लागला आहे. □

# गरज आहे स्पृश्य बांधवांचा मानभावी स्वार्थ संपण्याची

डॉ. नरेंद्र दाभोलकर

ता. १३ नोव्हें. १९७६ च्या माणूसच्या अंकातील 'गरज आहे अस्पृश्य बांधवांचा स्वाभिमान जागा करण्याची' या मानभावी पवित्र्याने लिहिलेला भा. द. भावेंचा लेख (? की गरळ) "अस्पृश्यता-उन्मलून की दृढमूलन" हा या प्रश्नाबाबत मारल्या जाणाऱ्या चोरांच्या उलटचा बोंबांचा इरसाल गाळीव आणि दुर्दैवाने प्रातिनिधिक नमुना आहे. तर्कशून्य भूमिका, वस्तुस्थितीचा विपर्यास, अहंकाराचा वास येणारा आत्मविश्वास याने सारा लेख ठासून भरला आहे. या अस्पृश्यतेची समस्या व ती सोडवणुकीचे उपाय याबाबत यातील आक्षेप हे उघडपणे वा छुपेपणे अभिनिवेषाने वा कुत्सितपणे घेणे नेहमीच चालले असल्याने त्याचा समाचार घेणे हे अत्यावश्यक होऊन बसले आहे.

हजारो वर्षे अस्पृश्यांवर सवर्णांनी केलेल्या अत्याचाराची घोषवाक्ये आता कालबाह्य झाली आहेत आणि ती या प्रश्नाच्या सोडवणुकीत अडथळा निर्माण करत आहेत, हा भावेंचा दावा निखालस खोटा आहे. अस्पृश्यांवर होणारे अत्याचार आणि त्यांची अनेक मार्गांनी केली जाणारी कोंडी ही आजचीही विदारक वस्तुस्थिती आहे. बाबा आढावांचे नुकतेच प्रकाशित झालेले 'एक गाव एक पाणवठा' हे पुस्तक वाचण्याचे परिश्रम घेणाऱ्या कोणत्याही सुबुद्ध, सहृदय माणसाला हे जाणवल्यावाचून राहाणार नाही. झाले आहे ते असे की, अत्याचाराची साधने अधिक प्रभावी आणि सूक्ष्म व बळकट झाली आहेत. लोकशाही मार्गाने होणाऱ्या या पिळवणुकीविरुद्ध आवाज उठविणे अवघड झाले आहे. ग्रामपंचायतीचा हरिजन सदस्य कसा निवडला जातो ? त्याला किती मीटिंगची आमंत्रणे येतात ? त्याला कोठे बसवतात आणि कसे वागवतात याकडे नुसती नजर टाकली तरी याची प्रचीती येईल. डोळसपणे वस्तुस्थिती बघितली तर प्रश्न सोडविण्यात अडथळे निर्माण होत नाहीत. उलट प्रश्नाचे नेमके भान येते. वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारण्याची व राबवण्याची गरज समजते. या साऱ्या सत्यचित्राला घोषवाक्ये समजून एका फटकाऱ्यात निकालात काढले की, मग वास्तवाचे भान सुटते. प्रश्न मुळात न समजल्याने तो सुटण्याची शक्यताही दुरावते.

जुन्या आकसाने कोणी कोणावर सूड घेऊ नये. ना हिंदूंनी मुसलमानांवर ना अस्पृश्यांनी स्पृश्यांवर; हे भाव्यांचे विधान तत्त्वतः स्वागतार्ह आहे (तेही वाक्याच्या पूर्वार्धापुरतेच). पण तो जमाना संपला आहे, ही त्यांना वाटणारी ग्वाही खरी आहे काय ? आणीबाणी-पूर्वीच्या कालखंडात पूर्वीचे हिशेब चुकते करावयास हवेत, असा पवित्रा महाराष्ट्रातील एक साप्ताहिक जाहीरपणे घेत नव्हते काय ? आता हिंदू मार खाणार नाहीत, हे जनसंघाच्या एका प्रमुख नेत्याचे लोकसभेतील काही वर्षांपूर्वीचे भाषण काय दर्शविते ? ही सूडबुद्धी जर जागृत असेल तर क्वचितप्रसंगी अस्पृश्य नेत्यांनी स्पृश्यांच्यावर शाब्दिक कोरडे ओढले तर एवढे कळवळून जाण्याचे काय कारण ? कारण शेवटी प्रत्यक्ष कोरडे ओढण्याचा प्रसंग आला तर सवर्ण समाजाचे जीवनातील सर्व बाजूंचे वर्चस्व आपली धूळदाण करण्यास समर्थ आहे, याची खात्री आणि भीती (या देशातील मुसलमानांप्रमाणेच) अस्पृश्यांच्या मनात सतत वाढत असते. आणि भाव्यांसारख्यांचे लेखन बघितले की, ती खरे नाही असे तरी त्यांना कसे पटवायचे ? (याची जिवंत उदाहरणे पाहिजे असल्यास भावेंनी स्वतः काही गावात साधा एक गाव एक पाणवठ्याचा प्रयत्न करून बघावाच ! म्हणजे गावचा बहिष्कार हे कसले जीवघेणे हत्यार आहे हे त्यांना उमगेल.)

भावे यांच्या मते अस्पृश्यता हा हिंदू धर्माला कलंक आहे. खरे तर अस्पृश्यता हा हिंदूंनी निर्माण केलेला आणि साऱ्या भारतीयांना भोगावा लागत असलेला कलंक आहे. पूर्वीच्या काळात हा अपराध जरी हिंदूंनी केला असला तरी सर्वधर्मीय राष्ट्र असल्याने त्याची भरपाई सर्व राष्ट्राने करावयास हवी. राखीव जागांच्यामुळे अन्याय होतो, असे क्षणभर गृहीत धरले तरी सर्व धर्मांतील हुशार विद्यार्थ्यांच्यावर होतो. हिंदू धर्मीयांनी केलेल्या या प्रचंड पापाचे परिमार्जन इतर धर्मीयांतील हुशार विद्यार्थ्यांचा बळी देऊन का करता ? असा प्रश्न चुकूनही कधी इतर धर्मीय मंडळी विचारत नाहीत. उलट ही भरपाई करताना भाव्यांच्यासारखी हिंदू मंडळीच प्रचंड मानभावी आक्रोश करतात.

व्यक्तीची व समाजाची भरभराट ही नेहमी त्या व्यक्तीचा व समाजाचा विकास किती झाला, यावर अवलंबून असते. हा विकास स्वतःविषयीच्या अस्मितेतून होतो, हे समजण्याची प्रगल्भता अस्पृश्य समाजाने दाखवावी, असे भाव्यांनी प्रतिपादले आहे. वरवर गोंडस दिसणारी परंतु प्रत्यक्षात मात्र विषारी ठरणारी ही व्यक्तिवादी संकल्पना आहे. व्यक्तीचा व समाजाचा विकास या गोष्टी नेहमीच सुसंगत नसतात. अनेकदा तर त्या विरोधीही असतात. समाजाच्या विकासासाठी व्यक्तीच्या प्रखर परंतु स्वार्थी कर्तृत्वाला-आत्मविश्वासाला बंधन घालावे लागते. ही प्रगल्भता न दाखवणे म्हणजे स्वतःची अस्मिता कुरवाळत तिच्या नावाखाली स्वतःच्या पोळीवर तूप ओढणे होय.

सर्व लेखात भाव्यांनी घेतलेली उदाहरणे ही इतकी चुकीची आहेत की, त्यांनी वेड पांघरून पेडगावला जावयाचे ठरवले आहे, हे कोणा

लाही स्पष्ट व्हावे. मागासलेला वर्ग स्वराज्याच्या सुरुवातीच्या काळात लहान मुलासारखा होता. आता, तो चांगला तीस वर्षांचा धडधाकट तरुण झाला आहे. लहानपणीचा पांगुळगाडा मोठेपणी माणसाने वापरणे हे जसे व्यक्तीच्या दुबळेपणाचे लक्षण, तसे स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या काळातील सवलती या वर्गाला अजून चालू ठेवणे ही या समाजाच्या पांगळेपणाची खूण, निकोप वाढीची नव्हे, असा युक्तिवाद (!) भावे करतात. जन्माला आलेल्या एखाद्या बालकाची वाढ आणि आणि हजारो वर्षे पिचलेल्या एखाद्या प्रचंड समाजाला भारतासारख्या गरीब देशात स्वातंत्र्यानंतर मिळालेल्या मूठभर संधी-सवलती याची तुलना करण्यात कोणते साधर्म्य आहे ? आणि ते नसताना आता झाली तीस वर्षे, खूप झाले कोडकौतुक, आता गुमानपणे स्वतःचा रस्ता स्वतः बघा, असे अस्पृश्य समाजाला बजावताना भावे स्वतःच्या बुद्धिमत्तेची कोणती पातळी आणि मनोवृत्ती दाखवतात ?

दीडशे वर्षांच्या ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात इतर समाजापेक्षा काकणभर अधिकच सवलती या समाजाला मिळाल्या, प्रगतीचा दरवाजा त्यांना सताड उघडा होता, हा शोध लावल्याबद्दल भावे यांना कोणते बक्षीस द्यावे ? इथल्या कोणत्याही धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचा राणीचा १८५७ चा जाहीरनामा आणि त्यामुळे सवर्ण आणि अस्पृश्यांची एकत्रित चालू केलेल्या आणि नंतर स्पृश्यांच्या विरोधाने अस्पृश्यांना बंद केलेल्या शाळा भाव्यांना माहीत नाहीत काय ? ब्राह्मणाला शासकीयरीत्या दक्षिणा देणाऱ्या इंग्रजांना खडसावणाऱ्या लोकहितवादींचे पहिलेच पत्र त्यांच्या वाचनात नाही का ? महात्मा ज्योतिबा फुल्यांना पुण्याने कोणता अनुभव दिला ? उच्च विद्याविभूषित होऊन आल्यावरही साहेब आंबेडकरांच्या अंगावर दुरून फाइली फेकणाऱ्या शिपायांच्या कथा भाव्यांनी ऐकल्याच नाहीत का ? या साऱ्या प्रकाराबाबत ब्रिटिशांचा दृष्टिकोन हा बराचसा अलिप्त आणि गरज, सोयीनुसार स्पृश्यांच्या बाजूने झुकते माप देणारा होता.

अस्पृश्यतेच्या खातेऱ्यातून बाहेर यावी ही मुळी या समाजाची इच्छाच नव्हती. यांच्यासाठी एकजात प्रयत्न केले ते स्पृश्यांनी, असा शेरा मारून भावेंनी एक नामावली सादर केली आहे. एकजात या लेखकाच्या शब्दावरून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अभिप्रेत नाही हे स्पष्ट होते. आता या करंटेपणाला काय म्हणावे ? या समाजात ही इच्छाच दोनशे वर्षांत निर्माण झाली नाही असे म्हणणे म्हणजे गुलामाला गुलामगिरीतच राहावे असे वाटते, हे प्रतिपादण्यासारखे आहे. वस्तुस्थिती अशी की, स्पृश्य समाजाचा सर्वच दबाव एवढा प्रचंड होता की, इतरांच्या बरोबरीने पुढे जावयाचे राहू द्याच, साधा धड मोकळा श्वास घेण्याची देखील अस्पृश्यांना भीती वाटत होती. या स्पृश्य वर्गाच्या दबावापुढे भारतीय कीर्तीच्या लोकमान्यांसारख्या पुढाऱ्यांनाही सनातनी भूमिका घ्याव्या लागल्या. फार झाले तर नरो वा कुंजरो वा असे वागावे लागले. सावरकरांचे अस्पृश्यता निर्मूलन त्यांच्या हिंदुमहासभेने देखील किती स्वीकारले व राबविले, याला इतिहास साक्ष आहेच. काँग्रेसला हरिजनोद्धाराची म. गांधींचे व्यक्तिगत प्रयत्न वगळता फारशी वेगळी कहाणी नाही. सवर्णांच्या एवढ्या प्रचंड सुप्त विरोधापुढे नरपुंगवांच्या प्रयत्नांची ही कथा तर हजारो वर्षे पिचलेल्या समाजानेच स्वतःच्या पुरुषार्थाचा झेंडा उभारावा, हा उपदेश मानभावीपणाचाच नव्हे काय ?

पुढे जाणे म्हणजे दुसऱ्यांना मागे खेचणे रास्त व न्याय नव्हे. पण हे लागू पडते सर्वांना सर्व प्रकारची उपलब्धता देऊन. शर्यत एका रेषेवरून चालू केली तर, काही हजार वर्षे सवर्णांनी अस्पृश्यांना मागे खेचावयाचे आणि अवघी दोन-तीन दशके त्याची किरकोळ भरपाई चालू झाली की, न्यायाचा प्रश्न उपस्थित करावयाचा म्हणजे कर्णाने स्वतःचे चाक आत जाऊ लागल्यावर धर्मयुद्धाची आठवण करून देणे आहे. (अर्थात चाक आत जाणे ही उपमाही बरोबर नाही. कारण सवर्णांच्या भरधाव प्रगतीला या सवलतींमुळे काही फार मोठे मुळीच सोसावे लागत नाही.) यातही गंमत अशी की, स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना ज्या सवलती मिळतात, त्याबाबत आमची कधी तक्रार नसते. काही वर्षे स्वातंत्र्यसंग्रामात हालअपेष्टा सोसल्याबद्दल जी कणव आम्ही दाखवतो ती पाच हजार वर्षे अगणित हालअपेष्टा सोसूनही राष्ट्राशी इमान राखणाऱ्या मागासवर्गीयांबाबत आम्ही दाखवू नये ना ?

चीनबरोबर तुलना करावयाची, इस्राइलचे उदाहरण द्यावयाचे (आणखी जपानसारखेही उदाहरण देता येईल), या साऱ्यांमध्ये वडाची साल पिंपळाला चिकटवण्याचा हा प्रकार आहे. माओ आणि गांधी यांच्या तुलनेएवढाच हा हास्यास्पद प्रकार आहे. चीनची सारी व्यवस्था आपण मान्य करणार का ? आणि समजा, चीनसारखी प्रगती अस्पृश्य समाजाने सवलतीच्या काठीमुळे नाही केली; उरलेल्या ७५ टक्के सवर्णसमाजाचे हात ती प्रगती करण्यासाठी कोणी बांधले होते ? त्यांनी ही प्रगती केली असती तर चीनप्रमाणे सर्वांनाच नोकरी उपलब्ध झाली असती आणि मग राखीव जागांचा प्रश्न येतोच कुठे ? इस्राइल राष्ट्राचे उदाहरणही फसवे आहे. धर्म आणि वंश यांच्या कृत्रिम आधारावर निर्माण झालेली साऱ्या जगात दोन राष्ट्रे. एक पाकिस्तान, दुसरे इस्राइल. त्यांपैकी पहिल्याचे तुकडे झालेच, दुसरे सतत अडचणीत येते. साऱ्या जगात पसरलेल्या श्रीमंत ज्यूंची मदत, अमेरिकेचा सतत पाठिंबा या व इतर अनेक कारणांनी इस्राइल उभे राहते. पण त्याचे उदाहरण आपल्या देशाला लावून भावे काय सुचवू इच्छितात ? हा भारत हिंदुराष्ट्र करा म्हणजे पाहा कशी प्रगती होते ती, असे तर त्यांना सुचवायचे नाही ?

हा मुद्दा मांडताना एक ठिकाणी ज्यू समाजावर जे अत्याचार झाले त्यापुढे अस्पृश्य समाजावर झालेले अत्याचार खिजगणतीतही घेता येणार नाहीत, असे महाभयंकर विधान भावे यांनी केले आहे. अत्याचाराची प्रतवारी लावण्याच्या या मनोवृत्तीला काय म्हणावे ? आणि मग हे जर मान्यच करावयाचे तर स्पृश्य समाजावर अस्पृश्यसमाजाकडून आज ते सोयीसवलतीच्या रूपाने आक्रमण होत आहे ते आणखी काही हजार वर्षे कोणत्याच गणतीत घेण्याचे कारण काय ?

अस्पृश्यांची जात हा त्यांनी अधिक सवलती पदरात पाडून घेण्यासाठी योजलेला डाव आहे, असा आरोप भावे करू शकतात. कारण उपेक्षित अस्पृश्यांना आपली जात दाखवून मदत मागावी लागते, त्यामुळे ती डोळ्यांवर येते. सवर्णांची जातीयता आपला फायदा बिनबोभाट उचलते. काही प्रमुख बँकांतून फक्त एकारान्त कोकणस्थ प्रामुख्याने नोकरीला लागतात, ते इतरांना कोणता न्याय

वेऊन ? जिल्हा मध्यवर्ती बँका आणि साखर कारखाने यामध्ये सारी भरती खानदानी कुळवाल्यांचीच कशी होते ? जातीय आणि ज्ञातीय मदतीच्या संस्था जात, उपजात, पोटशाखा इथपर्यंत कोणत्या समाजात फोफावल्या आणि रुजल्या आहेत, त्यामध्ये समाजाच्या व्यापक गरजेपेक्षा कमी गरजेच्या जातवाल्यांचे हित सांभाळणारी मनोवृत्ती हा कसला डाव आहे ?

या ठिकाणी आपण नेमक्या पोटदुखीच्या कारणाकडे येतो. मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती, फी-पुस्तके फुकट, प्रवेशात मेरिट नाही, नोकरीला पात्रता नाही, बढतीला गुणवत्ता नाही, याचे वैषम्य, असूया सतत प्रकट केली जाते. याबाबत् नेमकी वस्तुस्थिती कायआहे !

Statistical Abstract, India 1972, Govt. of India, New Delhi 1973–' Report of the Commissioner for Scheduled castes and Scheduled tribes ' for different years यावरून या प्रश्नाचा अभ्यास केला तर आभास आणि वस्तुस्थिती यात केवढे भयानक अंतर आहे याची जाणीव होते. केवळ एक तक्ता सोबत दिला आहे तो पुरेसा बोलका आहे.

All India – Percentage share in Population

| Year | Population in lakh | | | Percentage share | |
|---|---|---|---|---|---|
| | Total | sch. caste | sch. tribe | sch. caste | sch. tribe |
| 1951 | 3610 | 551 | 224 | 15·25 | 6·22 |
| 1961 | 4391 | 672 | 299 | 15·31 | 6·80 |
| 1971 | 5479 | 835 | 380 | 15·24 | 6·94 |

All India – Percentage share in Plan Expenditure

| Period | Scheduled caste | Scheduled tribe |
|---|---|---|
| 51–56 | ·30 | ·89 |
| 56–61 | ·57 | ·87 |
| 61–66 | ·53 | ·61 |
| 66–71 | ·43 | ·50 |

सुमारे वीस टक्के समाजाच्या खाली आपण एक टक्का खर्च करणार आणि काय हा अस्पृश्यांना पक्षपात असे स्वतःच ओरडत सुटणार याला काय नाव द्यावे ?

महाराष्ट्रात काय स्थिती आहे ? महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या १९७१ च्या जनगणनेनुसार ५०.४ लाख होती. त्यांमध्ये ३० लाख अनुसूचित जातीचे व ३१ लाख बुद्धधर्मीय, म्हणजे एकूण लोकसंख्येच्या १३ टक्के लोकसंख्या परंपरागत अस्पृश्य मानलेल्या लोकांची आहे. ४० लाख आदिवासी व २० लाख भटक्या जमाती व विमुक्त जमाती याची एकत्रित संख्या १२५ लाख म्हणजे एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ एकचतुर्थांश आहे. या लोकांना जमिनी नाहीत, कसण्याची साधने नाहीत, पारंपरिक धंदे बसलेले, सामाजिक स्थान नाकारलेले आदिवासी जमाती वन्य अवस्थेत, सावकारांकडून लुबाडलेल्या या लोकांना खरोखरच पोटदुखी वाटावे असे काय मिळते ? महाराष्ट्रातील सव्वीस जिल्हा परिषदांत (मदतीची प्रमुख संस्था) सुरुवातीच्या दहा वर्षांत दलित व मागासवर्गीयासाठी शून्य टक्के खर्च करणाऱ्या अशा दहा जिल्हा परिषदा, एक टक्क्यांपेक्षा कमी खर्च करणाऱ्या सात जिल्हा परिषदा, १ ते ५ टक्क्यापर्यंत खर्च करणाऱ्या चार जिल्हा परिषदा व पाच ते दहा टक्क्यांपर्यंत खर्च करणाऱ्या तीन जिल्हा परिषदा असल्याचे मंगुडकर अहवालानेच नमूद केले आहे.

१९६९–७० च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीमधे शिकणाऱ्यांचे प्रमाण ५ वी ते ९ वी पर्यंत मुलांच्याबाबत ३६ टक्के तर मुलींच्याबाबत १३ टक्के आढळले. दहावी-अकरावीत हे प्रमाण १६ टक्के व तीन टक्के इथपर्यंत घसरले. या मुलांना शिकण्याची हौस-इच्छा नसते म्हणणे म्हणजे क्रूर थट्टा आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य मागासवर्गीय जातीजमातींना शेतमजुरीपलीकडे काम नाही. अपुरे, अनिश्चित काम व उत्पन्नाची अत्यंत निकृष्ट पातळी, यामुळे शिक्षण आणि सर्व जीवनाचीच होणारी आबाळ याचा साकल्याने विचार न करता कल्याणकारी योजनांच्या अपयशाचा दोष, मागासवर्गीयांच्या अनास्था, कमकुवतपणा यावर टाकणे कितपत योग्य आहे ?

अनुसूचित जातीजमातींमधील सरकारी नोकरीचे प्रमाण खाली दिले आहे.

| अनुसूचित जाती | सरकारी कर्मचाऱ्यांतील शेकडा प्रमाण (१९६८) |
|---|---|
| वर्ग १ | १·४ |
| वर्ग २ | २·० |
| वर्ग ३ | १०·३ |
| वर्ग ४ | २३·८ |
| **अनुसूचित जमाती** | |
| वर्ग १ | ०·४ |
| वर्ग २ | ०·२ |
| वर्ग ३ | १·७ |
| वर्ग ४ | २·९ |

नोकरीमध्ये अनुसूचित जातींसाठी १३ टक्के जागांची व जमातीसाठी ७ टक्के जागांची तरतूद आहे. गेल्या वीस वर्षांत झालेली वाढ ही प्रामुख्याने शिपाई व कारकून याबाबतच झाली आहे. सहकारात ३४ टक्के जागा राखून ठेवण्याच्या निर्णयाची तर कोणत्याच पातळीवर अंमलबजावणी नाही. साताऱ्यासारख्या पुरोगामी जिल्ह्यातील पाच सहकारी साखर कारखान्यांच्या संचालक मंडळावर औषधाला देखील मागासवर्गीय नाही.

महाराष्ट्राची पाचवी पंचवार्षिक योजना २६३१ कोटी रुपयांची आहे. त्यातील १७.५ कोटी रक्कम मागासवर्गीयांसाठी आहे. लोक-

संख्येतील टक्केवारी आणि आर्थिक मदतीची टक्केवारी याचा कोणता मेळ बसतो? अशा परिस्थितीत भावे कोणत्या भ्रमात आपली तडाखेबंद विधाने करत आहेत?

शैक्षणिक वातावरणाची भोंगळ सबब म्हणणाऱ्या भाव्यांच्या भोंगळ विचाराची कीव वाटते. शैक्षणिक वातावरण घरातले, सभोवतालचे आणि शाळेतले नसतेच, तर मग आपले घर चांगल्या वस्तीत असावे, मुलगा हुशार मुलांच्या संगतीत असावा, जवळची नगरपालिकेची स्वस्त शाळा सोडून दूरच्या महागडया इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चिरंजीवांनी जावे, हा झाला मध्यमवर्गाकडून आवर्जून धरला जाणारा आग्रह का धरला गेला असता?

उच्चपदस्थ मागासवर्गीयांना सवलती कशाकरता? हा प्रश्न खरा असला तरी तो अत्यल्पांच्या बाबतीत खरा आहे. आजही त्यांच्या मुलांना आर्थिक सवलती मिळत नाहीत. शिक्षणात, नोकरीत मिळतात. परंतु आज सर्वच क्षेत्रांत इतर भ्रष्ट मार्गाने आपल्या जातीची, पैसे देणारी, नात्याची माणसे भरण्याची पद्धत दुर्दैवाने चालू झाली आहे. ते मुसळ काढण्यासाठी हे कुसळ का बरे डोळचाला दिसावे?

सर्वांना समानसंधी मिळावी हे घटनेतले कलम भाव्यांनी अर्धेच का बरे दिले? त्याबरोबरच मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदी घटनेनेच केल्या नाहीत काय? सुप्रीम कोर्टानेही आपल्या निकालात यावर शिक्कामोर्तबच केले आहे. नव्या घटनादुरुस्तीमध्ये मार्गदर्शक तत्त्वांना मूलभूत हक्कापेक्षा अधिक महत्त्व देतानाही मागासवर्गीयांच्या तरतुदींना धक्का लागणार नाही, याची ग्वाही कायदेमंत्र्यांनी दिली आहे. आंबेडकरांनी हा धोका अगदी पहिल्यापासून हेरला होता, म्हणूनच त्यांनी राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परिवर्तन केल्यावाचून सारे व्यर्थ ठरेल, असे आपल्या घटना प्रतिष्ठापनेच्या भाषणात सांगितले होते. भावे हे सारेच अमान्य करतात काय?

दलित वाङमयाला फॅशन म्हणून या विषयाबद्दल इतकी उथळ समज भावे यांनी दाखविली आहे की, त्याच्यावर लिहिले तरी त्यांना समजेल का, याची शंका वाटावी.

अस्पृश्यांनी स्वतःच्या सामर्थ्यांनी वेगवेगळी क्षेत्रे काबीज करावीत, समाज त्याची निश्चित कदर करेल, हे भाव्याचे स्वप्नरंजन आहे.

एक गाव एक पाणवठा पुस्तकातील, कलेक्टरच्या पत्नीला पूजेच्यावेळी देवळाबाहेर ठेवण्याचे उदाहरण कशाचे लक्षण आहे? सवर्ण समाजातील मुलगी अस्पृश्य–ऑफिसर आणि स्पृश्य क्लार्क यातील कोणाला वर म्हणून पसंत करेल?

डॉक्टरी–इंजिनीअरिंगमधले प्रवेश हे एक सवर्णांच्या मनात सतत सलणारे सल आहे. पैसा आणि प्रतिष्ठेची केंद्रे ही फक्त गुणवत्तेच्या आधारे मुक्तद्वार असावीत, हा भांडवलशाही, जीवघेण्या स्पर्धेवर आधारलेल्या जगातील विचार आहे. ही जीवनपद्धती अमानुष आहे म्हणून त्याच्या पोटी जन्माला आलेला विचारही अमानुष आहे. सामाजिक न्यायाची कल्पना नाकारली की मग उरतो तो हा फक्त स्वतःपुरतेच पाहाण्याचा स्वार्थी दृष्टिकोन. उद्या डॉक्टरी व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झाले आणि नोकरीत मर्यादित पैसाच मिळू लागला आणि स्वायत्तता संपुष्टात आली तर वैद्यकीय प्रवेशाचा लोंढा दुसरीकडे वळेल आणि त्या क्षेत्रात मलाच सर्वाधिक संधी मिळावी, असा ओरडा चालू होईल. त्याला चढवलेला मुलामा हा दलितांना स्वाभिमान आणि अस्मिता मिळवण्याचा असला तर त्यामागची खरी भूमिका ही दलितांना बांधव हा शब्द वापरल्यास त्याच्या जवळपास जाणारी नाही. दुधाची गरज घरात सर्वांनाच असते. व्यायाम करणाऱ्या एका भावाला ती अधिक असते तरीही आजारातून उठलेल्या आपल्या दुसऱ्या भावाला ते मिळावे, यासाठी इतर सारेजण आपल्यावर आपखुशीने मर्यादा घालतात त्याला कौटुंबिक भावना म्हणतात. मी व्यायाम करतो आणि हा मात्र ताप गेला तरी जास्त दूध पितो, अशी तक्रार केली तर त्यात कदाचित व्यावहारिक सत्यांश असेल, पण बंधुत्वाचा लवलेशही नाही. दुर्दैवाने दलितांच्या प्रश्नाबाबत तर आज ना व्यावहारिक सत्यांश ना बंधुतेचा लवलेश. (उदा.–सर्व आर्थिक मागासवर्गीयाना मदत द्यावी ही गोष्ट केव्हाही स्वागतार्ह, पण ती जर शक्य नसेल तर आहे त्या परिस्थितीत अस्पृश्यांना प्राधान्य द्यावे हे नाकारले जाते.) भाव्यांचा लेखाचा एवढा सविस्तर समाचार घेण्यात भावे या व्यक्तीचा अधिक्षेप करण्याची बिलकुल कल्पना नाही. तो तसा कुठे त्यांना वाटला तर मी दिलगीर आहे. परंतु भाव्यांचा लेख हे या समाजातील एका प्रातिनिधिक मनोवृत्तीचे लक्षण आहे. या मनोवृत्तीची सर्व लक्षणे ही या लेखात पुरेपूर उतरली आहेत. जीवनकलह तीव्र होत चालला आहे, स्पर्धा जीवघेणी बनत आहे, अशावेळी नेमके काय बदलावयास हवे? सर्वांना शिक्षणाची, नोकरीची, चांगल्या जीवनाची शाश्वती मिळणारा समाज कसा निर्माण करावयास हवा, हा मूळ मुद्दा डावलून भलत्याच गोष्टीवर त्याचे खापर फोडणे म्हणजे चोर सोडून संन्याशाला बळी देणे होय.

□


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# सोलकढी

## उंटिणीच्या दुधाचे पेढे

युरोप–अमेरिकेतून पश्चिम मार्गाने भारतात येताना वाटेत पुष्कळदा मी तेहेरानला थांबतो. तेहेरान आवडते मला : कॉफी फार झकास मिळते इथे. गंमत आहे. मुंबई–पुण्याच्या भारतीय इराण्याची चहाकरता ख्याती; आणि खुद्द इराणच्या इराण्याची कॉफीकरता प्रसिद्धी. तेहेरानच्या कॅफेमध्ये काळचा इराणी कॉफीचे घुटके घेत आणि गोऱ्या इराणी पोरींना दृष्ट लावत मी तासन् तास स्वत:वर उदार होऊन बसून राहतो. दोन–तीन वर्षांपूर्वी एका कॅफेमध्ये असाच बसलो होतो. त्या दिवशी ते कॅफे जरा गजबजले होते. इराणी पोरांचे एक उभाट टोळके माझ्यापलीकडे बसले होते. इरसाल होती पोरे. शाळामहाविद्यालयात त्यांनी पुष्कळ दसरादिवाळी केली होती, असे त्यांच्या बोलण्यावरून कळत होते. परीक्षा पार करण्याच्या त्यांच्या याहूयुक्त्या ऐकल्यावर मला कॉफी बशीतून प्यावी लागली. इराणमधल्या माध्यमिक आणि उच्च शिक्षण-व्यवस्थेबद्दल मला चिंता वाटू लागली. शाळामहाविद्यालयातली एकेक परीक्षा ओलांडताना सर्वांगात कसे पेटके येत होते ते चर्र आठवले मला. मी उगाच हसलो. इतक्यात त्या टोळक्यापैकी एकाचे लक्ष माझ्याकडे गेले. तिकडून ताडकन उठून तो माझ्यासमोर येऊन बसला आणि विचारू लागला, 'अंकल, तुम्ही का हसलात ?'

'तुम्हाला नाही हसलो मी. सहज हसलो. अगदी उगाच हसलो.'

'हे खरं नाही अंकल. उगाच नाही हसलात तुम्ही. सांगा ना का हसलात.'

आता काही तरी सांगणे भाग होते. काही तरी म्हणजे जे खरे होते तेच. मुलग्याने कोणी मला अंकल म्हटले तर त्याला खरेखरे सांगायचे, अशी माझी आपली एक पद्धत आहे. 'अरे बाबा, तुम्ही भारतातल्या पुणे विद्यापीठात असता ना, तर कळली असती तुम्हाला परीक्षांची गंमत. हा विचार मनात येऊन हसू आलं बघ पोरा.'

'अंकल, पुण्याची पोरंच बावळट असली पाहिजेत. मी सांगतो.' पुण्याच्या अडीच टक्क्यांच्या पोरांना बावळट म्हणणाऱ्या त्या इराणी ईडलिंबूच्या जिभेची पानपट्टीसारखी घडी घालावी, असे वाटले. त्यापूर्वी कॉफीचा एक घुटका घ्यावा असे ठरवले. घुटका घेताना वाटले की, या परिस्थितीत शांत माथ्याच्या मुत्सद्देगिरीची आवश्यकता आहे. ती दाखवण्यापूर्वी कॉफीचा आणखी एक घुटका घ्यावा, असे ठरवले. घुटका घेतला आणि म्हटले, 'चुरमुऱ्या, पुण्याची पोरं नाहीत बावळट. मी म्हणतो, इराणचे–तेहरानचे प्राध्यापकच भडभडभुंजे आणि भ्रष्ट आहेत. म्हणून चालतात तुमच्या गमजा. पुणे विद्यापीठातले प्राध्यापक–'

माझा तडाखा ऐकताच ते सगळेच टोळके बिथरले. त्यांचा देशाभिमान भुईनळ्यासारखा उफाळला. आता मीसुद्धा हट्टाला पेटलो. पुणे विद्यापीठ, पुण्याचे प्राध्यापक, पुण्याचे विद्यार्थी यांच्या थोर चारित्र्यसंपन्नतेचा अभिमान मलाही होता. अखेर वाद विकोपाला गेला. पुणे विद्यापीठात दाखल होऊन आपण इराणी पद्धतीने परीक्षा पार करून दाखवतो, असा भुभुक्कार त्यांनी केला. पुणे विद्यापीठाचे देवदत्त चारित्र्य स्मरून मी त्यांना आव्हान दिले.

उरलेली सगळी कॉफी मी एका घुटक्यात संपवली आणि हिंदी चित्रपटातल्या इज्जतवान नायकाच्या आवेशाने कॅफेबाहेर पडलो.

हा प्रसंग नंतर मी सफै विसरून गेलो. इतके विचित्र, अद्‌भुत, सनसनाटी प्रसंग अनंतरावांच्या आयुष्यात रोजच्या रोज घडत असतात, ते सारे स्मृतीत कसे ठेवायचे त्याने ? पण पंधरावीस दिवसांपूर्वीच्या सगळ्या वर्तमानपत्रांतून पुणे विद्यापीठातल्या भ्रष्टाचाराची एक अजब कहाणी वाचली आणि मी चमकलो : पंधरा इराणी विद्यार्थी स्टॅटिस्टिक्सचे दोन पेपर्स घेऊन १९७५ च्या एप्रिलात टी. वाय. बी. ए. आणि टी. वाय. बी. एस्सी. च्या परीक्षांना बसले. त्या वेळी त्यांना तीन ते दहा गुण मिळून ते नापास झाले. मग ते पुन्हा ऑक्टोबरमध्ये परीक्षेला बसले. एप्रिल ते ऑक्टोबर या दरम्यान त्यांनी अशी बेमालूम तयारी केली होती की, ऑक्टोबरच्या परीक्षेत सर्वांना सत्तर टक्क्यांच्यावर गुण मिळाले आणि ते पास झाले. तेहेरानला जाऊन त्यांनी उंटिणीच्या दुधाचे पेढे वाटले. इकडे एका अज्ञात इराणी विद्यार्थ्याने १८ नोव्हेंबर १९७५ रोजी पुणे विद्यापीठाला यासंबंधी एक पत्र पाठवले. ते विद्यापीठाला २२ तारखेला मिळाले. पण संबंधित अधिकाऱ्यांनी सदर पत्र लगेच विद्यापीठाच्या गैरप्रकार समितीकडे पाठवले नाही. आधी त्यांनी एप्रिलच्या परीक्षेच्या त्या इराणी विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका लगद्यासाठी नष्ट करून टाकल्या आणि मगच ते पत्र समितीपुढे सरकवले.

समितीने ऑक्टोबरच्या परीक्षेच्या इराणी उत्तरपत्रिका एका जबाबदार प्राध्यापकाकडून पुन्हा तपासून घेतल्या. त्या वेळी त्यांना त्यात मोठ्या गमतीगमती आढळल्या. सगळ्या विद्यार्थी इराण्यांनी ठराविक प्रश्न ठराविक क्रमाने सोडवले होते; ते सोडवताना त्यांना थोडीसुद्धा कच्ची आकडेमोड करावी लागली नव्हती... समितीला पुढे असे आढळले की, त्या इराणी विद्यार्थ्यांना तीन पुणेकर प्राध्यापकांच्या शिकवण्या होत्या. त्यांनीच (म्हणजे प्राध्यापकांनीच; इराणी विद्यार्थ्यांनी नव्हे.) प्रश्नपत्रिका काढल्या होत्या आणि उत्तरपत्रिका तपासल्या होत्या. शिकवणीसाठी एका प्राध्यापकाला म्हणे वीस हजार रुपये मिळाले होते.

आता हे पुण्यातले पंधरा इराणी विद्यार्थी आणि मला तेहेरानच्या कॅफेमध्ये भेटलेली इराणी पोरे एकच असतील की काय, या शंकेने मी आकुळव्याकुळ झालो आहे. तसे खरोखरच असेल तर या प्रकरणात खरा दोषी मीच ठरतो. कशाला त्या इराणी पोरांना मी एवढे आव्हान दिले ? पण माझे हे आव्हान मुळीच निराधार नव्हते, हे त्या प्रकरणाची हकीकत बऱ्या बारकाईने वाचणाऱ्याच्या बरोब्बर लक्षात येईल : अहो त्या पंधरा इराणी विद्यार्थ्यांना जे करायचे होते ते एप्रिलच्या परीक्षेत नाहीच ना करता आले त्यांना. कशी जिरली त्यांची. बोलूनचालून पुणे विद्यापीठ ते. झक्कत ऑक्टोबरच्या परीक्षेपर्यंत रखडावे लागले त्या बावळट इराण्यांना. आणि हेच तिकडे तेहेरानमध्ये पुण्याच्या विद्यार्थ्यांना बावळट म्हणून राहिले होते. आहे की नाही कमाल ? पुण्याचे विद्यार्थी काळ्या इराण्याच्या हॉटेलातला चहा पितात, असे वाटते की काय यांना ?

एवढ्यात मी तेहेरानला थांबलेलो नाही. आणखी काही काळ थांबणार नाही. कारण थांबलो आणि त्या पंधरा पदवीधर इराणी विद्यार्थ्यांची गाठ पडली तर उंटिणीच्या दुधाचे पेढे खाल्ल्याचून माझी सुटका होणार नाही आणि मला तर उंटिणीच्या दुधाचे पेढे तितकेसे आवडत नाहीत.

–अनंतराव

# बांगला देश

## लष्करशाहीची पकड वाढली

वा. दा. रानडे

बांगला देशच्या स्वातंत्र्यास या आठवड्यात पाच वर्षे पुरी होतील. राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समाजवाद या चतुःसूत्रीवर नव्या राष्ट्राची उभारणी करण्याची शेख मुजीबुर रहमान यांची आकांक्षा होती. पूर्व सीमेवर भारताला विश्वासू मित्र मिळाला आणि त्या सीमेवरच्या कटकटी आता थांबतील, याबद्दल भारतीय नेत्यांना समाधान वाटत होते. पण उपखंडातील स्थैर्यापेक्षा वर्चस्वक्षेत्राचे राजकारण आपल्या हितसंबंधांच्या दृष्टीने काही शक्तींना महत्त्वाचे वाटत होते. मुजीब यांच्या नेतृत्वाखाली बांगला देश सुस्थिर झाला तर रशिया-भारत-बांगला अशी फळी या भागात निर्माण होईल आणि आपला प्रभाव कमी होईल, असे अमेरिका व चीनला वाटत होते. बांगला देशची मुक्तता आपण थांबवू शकलो नाही, पण निदान तेथे भारतविरोधी आणि पाककडे कल असलेले सरकार कसे अधिकारावर आणता येईल, या दृष्टीने पाक हस्तकांच्या हालचाली चालू होत्या. आपण ठरविलेल्या धोरणानुसार देशाची घडी उभारण्यासाठी परिणामकारक सत्ता आपल्या हाती हवी, म्हणून मुजीब यांनी संसदीय लोकशाहीऐवजी अध्यक्षीय लोकशाही जानेवारी १९७५ मध्ये स्थापन केली. देशात एकच पक्ष राहील, अशी घोषणा केली. आपले हे धोरण अंमलात आणताना मुजीब यांच्या हातून काही चुका झाल्या, काही तरुण लष्करी अधिकाऱ्यांवर अन्याय झाला. या अधिकाऱ्यांनी १५ ऑगस्ट १९७५ ला मुजीब व त्यांच्या कुटुंबियांची निर्घृण हत्या करून लष्करी क्रांती घडवून आणली. आपली सत्ता बळकट करण्यासाठी या गटाचा भर दहशतीवर होता. बांगला देशच्या स्वातंत्र्यलढ्यातील चार प्रमुख नेते ताजुद्दीन अहमद, मन्सूर अली, नझरुल इस्लाम आणि कमरुझ्झमान यांची त्यांनी डाक्का तुरुंगात क्रूर हत्या केली. या दुसऱ्या हत्याकांडाने देशाला हादरा बसला. तरुण लष्करी गटाच्या हाती सत्ता राहू देणे धोक्याचे आहे, असे ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना वाटले, व त्यांनी नोव्हेंबर, १९७५ मध्ये दुसरी लष्करी क्रांती करून सत्ता आपल्या हाती घेतली. खोंडकर मुश्ताक अहमद यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि त्यांच्या जागी न्यायमूर्ती सायेम अध्यक्ष झाले. पंधरा महिन्यांत निवडणुका घेतल्या जातील, असे त्यांनी जाहीर केले. लष्करी राजवटीने सर्वच राजकीय पक्षांना बंदी केली होती. पण बांगला देश जावीद लीग आणि मौलाना भाषाणींच्या नेतृत्वाखालील नॅशनल अवामी पार्टी या दोन पक्षांना कार्य करण्याची मोकळीक देण्यात आली. त्यांपैकी बांगला देश जावीद लीग हा उजव्या गटाचा पक्ष होता. पूर्व पाकिस्तानचे माजी पंतप्रधान अताउर रहमान खान यांनी तो स्थापन केला होता. इतर पक्षांवरचे निर्बंधही हळूहळू उठतील आणि ठरल्याप्रमाणे निवडणुका होतील, अशी अपेक्षा लोक करीत होते, पण गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांनी त्यांना धक्का दिला.

बांगला देशमधील निवडणुका बेमुदत पुढे ढकलल्या असल्याचे जाहीर करण्यात आले. निवडणुका पुढे ढकलल्या एवढेच नव्हे तर लष्करी नेत्यांनी सत्तेवरील आपली पकड अधिक घट्ट केली. न्या. सायेम अध्यक्ष आणि लष्करी कायद्याचे मुख्य प्रशासक असले तरी तो देखावा होता. खरी सत्ता लष्करप्रमुख जनरल झिआउर रहमान यांच्या हाती आहे, हे लौकरच स्पष्ट झाले. मेजर झिआउर रहमान यांनी हा बुरखा टाकून दिला आणि ते स्वतःच लष्करी कायद्याचे प्रमुख प्रशासक झाले. त्यांच्याकडे हे अधिकार सोपविण्याची घोषणा अध्यक्ष सायेम यांनी केली. मुख्य प्रशासक झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी खोंडकर मुश्ताक अहमद व दहा नेत्यांना अटक केली. आपल्या सर्व संभाव्य विरोधकांचा बंदोबस्त करून आपली सत्ता निर्वेध करण्याचा मेजर झिआउर रहमान यांचा प्रयत्न आहे, असे दिसते. आपण राजीनामा द्यायला भाग पाडलेले खोंडकर मुश्ताक अहमद स्वस्थ बसणार नाहीत, लष्करातील दुसऱ्या एखाद्या गटाच्या पाठिंब्याने ते पुन्हा सत्तेवर येण्याचा प्रयत्न करतील, असे मेजर रहमान यांना वाटले असण्याची शक्यता आहे. पण याचा अर्थ लष्करात गट आहेत. मेजर झिआउर रहमान आज प्रमुख लष्करी प्रशासक असले तरी सर्व लष्कराचा त्यांना एकमुखी पाठिंबा आहे का, हे सांगणे कठीण आहे. दुसरा एखादा लष्करी नेता आणखी एखादी क्रांती करून सत्ता हाती घेण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

प्रमुख नेत्यांची हत्या झाली, काही तुरुंगात आहेत. जनता ज्याच्याकडे मार्गदर्शनासाठी पाहू शकेल, असा एकही नेता आज बांगलामध्ये दिसत नाही. लष्करी राजवट आपले प्रश्न सोडवू शकत नाही, हा अनुभव आयूबच्या राजवटीपासून बांगला जनतेला आलेला आहे. लोकशाही आणि समाजवाद या दोन्ही ध्येयांपासून लष्करी राजवट देशाला दूर नेत आहे. सर्व नागरी हक्कांची गळचेपी तिने चालविलीच आहे, पोलीस आणि नोकरशाहीमध्ये भ्रष्टाचार व लाचलुचपत फार मोठ्या प्रमाणावर असून पापभीरू नागरिकांऐवजी गुन्हेगारांनाच पोलिसांचे संरक्षण मिळत असल्याची टीका 'हक कथा' या बांगला साप्ताहिकाने काही महिन्यांपूर्वी एका अग्रलेखात केली होती. एखादा नागरिक गुन्हेगाराविरुद्ध तक्रार करायला गेला तर त्यालाच पोलीस डांबून ठेवतात व गुन्हेगाराला माहिती कळविली जाऊन निसटण्याची संधी मिळते, असे या पत्राने म्हटले होते.

'माझी केवळ हंगामी राजवट असून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारणे आणि लौकर सार्वत्रिक निवडणुका घेणे एवढेच माझ्या सरकारपुढील काम आहे,' असे अध्यक्ष सायेम यांनी गेल्या वर्षी बांगला मुक्तिदिनी केलेल्या भाषणात सांगितले होते. पण एक वर्षानंतर आज काय परिस्थिती दिसते ? निवडणुका बेमुदत पुढे ढकलल्या गेल्या असून नागरी हक्कांची व स्वातंत्र्याची गळचेपी चालू आहे. तीन महिन्यांतील गुन्हेगारीचा आढावा 'इत्तेफाक' पत्राने गेल्या जूनमध्ये प्रसिद्ध केला. त्यात रोज सरासरी अठरा खून, तीन दरोडे आणि जवानांच्या मारपिटीला एक बळी पडत असल्याचे म्हटले होते. मार्च, एप्रिल आणि मे या तीन महिन्यांचा हा आढावा होता. त्यानंतर गेल्या सहा महिन्यांत परिस्थिती सुधारल्याच्या दर्शविणाऱ्या बातम्या नाहीत.

लोकशाहीच्या दृष्टीने सध्याचा काळ अंधकारमय दिसत असला तरी लष्करी हुकूमशहा आपले प्रश्न सोडवू शकत नाहीत, हे स्पष्ट झाल्यावर जनता उठाव करील आणि पाकच्या आयूब–राजवटीसारखीच गत सध्याच्या बांगला राजवटीची होईल, असे निरीक्षकांना वाटते. □



# अशी चौकशी, अशी फाशी !

र. धों. धाणेकर

## : चार :

सिनेटर वुइल्यम नोलंड हा आतापर्यंत कॅलिफोर्नियामधून रिपब्लिकन पक्षातर्फे सिनेटवर निवडून जात असे. पण १९५० च्या निवडणुकीला आपण उभे राहणार नसल्याचे त्यांनी पक्षने याला कळवून टाकले.

डेमोक्रॅटिक पक्षाने मिसेस हेलन डग्लस ह्या स्त्रीला उभे करावयाचे ठरविले. ती पूर्वीची हॉलिवूडची नटी, अत्यंत देखणी–रूपसंपन्न. तिचं नाव चांगलं होतं. तिला वक्तृत्व होतं. राजकारणात आपण पुढे यावं, अशी तिची तीव्र इच्छा होती. ती स्वभावतःच धाडशी व वरच्या थरात उठबस असलेली होती. त्यामुळे तिला, तिच्या पक्षाला ती निवडून येईल ह्याविषयी निश्चिती होती. आता ती कॉंग्रेसमन होती व त्यामुळे नाही म्हटलं तरी तिच्यात पाहिजे तेवढा सभाधीटपणा आलेलाही! ती पैशाने संपन्न असल्याकारणाने पैशाची पण ददात नव्हती.

एकच उणीव तिच्यात होती व ती म्हणजे कॉंग्रेसमध्ये मारकांटोनिओ ह्या कम्युनिस्ट सभासदाबरोबर ती विचाराने नेहमी राहिल्यामुळे, जेवढे ठराव कॉंग्रेसमध्ये मारकांटोनिओने आणले व ते कायद्यात रूपांतर झाले, त्या त्या वेळी ह्या बाईने आपले मत मारकांटोनिओच्या बाजूने दिलेले.

कॉंग्रेसमन निक्सनने ३ नोव्हेंबर १९४९ ह्या दिवशी म्हणजे निवडणुकीच्या अगोदर बरोबर वर्षभर, आपण सिनेटच्या निवडणुकीसाठी उभे राहाणार असल्याची घोषणा केली.

निक्सनच्या वतीने वजनदार सिनेटर शेरिडन ह्याने आपले पत्रक काढले, 'डग्लसबाई हल्ली अगदी संतापाने उद्विग्न झालेल्या दिसतात. जनतेला त्यांची दुष्कृत्ये माहीतच आहेत. रशियाविरुद्ध झुंज देण्यासाठी, अमेरिका, ग्रीस व तुर्कस्तान ह्यांना मदत देण्यास तयार झाली तेव्हा ह्या बाईने कॉंग्रेसमध्ये मारकांटोनिओसारख्या कम्युनिस्ट सभासदाबरोबर हातमिळवणी केली. त्याचप्रमाणे अमेरिकेतील कम्युनिस्टांची संपूर्ण करण्याचे ठरविले त्यावेळीही हिने आग पाखडली.'

वकील मोरे छोटिनेर हा मागच्याप्रमाणे ह्याहीवेळेस निक्सनचा पाठीराखा होताच. शेरिडनचं वक्तव्य प्रसिद्ध झाल्याबरोबर लगेच निक्सनने स्वतःचा निवडणूक जाहीरनामा जनतेपुढे मांडला. त्यात त्याने म्हटले होते–

'आपल्यापुढे आता एकच प्रश्न विचारार्थ आहे व तो म्हणजे अमेरिकेत व्यक्तिस्वातंत्र्य अधिक मोलाचे का सरकारी समाजवाद अधिक मोलाचा? सरकारप्रणीत समाजवाद हा एकच उपाय राष्ट्रोन्नतीचा आहे, असे आताच्या राजवटीचे म्हणणे. त्याला त्यांनी Planned economy, Fair deal, Social welfare अशी नवनवीन गोंडस नावे दिली असली तरी सत्ताधारी कंपूकडून खरी भीती आहे ती आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याला! काही सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर राजकीय तोडगे राबवण्याच्या बुरख्याखाली, हा कंपू अमेरिकन नागरिकांच्या जन्मसिद्ध हक्कांचा ग्रास करणार आहे.'

समाजवाद्यांचा मोठा धोका राष्ट्राला आहे, असेही लोकांना फारसे वाटत नव्हते. तरी पण कॅलिफोर्नियातून सिनेटमध्ये रिपब्लिकन पक्षाचा सभासद निवडून जावा हे मात्र त्यांना खासच वाटत होते, आणि म्हणूनच निक्सनला पाठिंबा मिळत गेला.

निवडणुकीची धामधूम सुरू राहिली. आरोप–प्रत्यारोपाला उधाण आले.

हेलन डग्लस हिचा उल्लेख (Pink Lady) 'पिंक लेडी' व निक्सनचा उल्लेख (Tricky Dick) 'ट्रिकी डिक्' असा होऊ लागला.

जनता पिंक लेडीचे नाव विसरली पण निक्सन निवडून आल्यावर देखील जसजसा मोठा होऊं लागला तसतसा Tricky Dick ह्या शब्दांची बिरुदावली त्याला अधिकाधिक चिकटून राहिली. पुढे त्याला स्वतःला टी. व्ही.वरील भाषणात म्हणावे लागले,

'मी काही लुच्चा–लफंगा मनुष्य नाही!'

निवडणुकीच्या रणधुमाळीत हेलन डग्लसला टिकाव धरणे कठीण होऊन बसले. निक्सन–छोटिनेर ह्या जोडगोळीने तर 'हेलन डग्लसला मत म्हणजे लाल भाईला मत,' असाच प्रचार अव्याहत चालू ठेवला. स्वतः शेरिडन हा डेमोक्रॅट वजनदार माणूस, पक्ष डावलून निक्सनलाच मदत करीत राहिला.

निवडणूक झाली. निक्सन निवडून आला. जानेवारी १९५१ पासून निक्सन सिनेटर म्हणून काम पाहू लागला. ह्यावेळी त्याचे वय ३८ वर्षांचे होते व सिनेटमध्ये तो सर्वांत लहान होता.

१९५१ च्या मे महिन्यात निक्सनने युरोपची वारी केली. पॅरिस येथे तळ ठोकून बसलेल्या जनरल आयसेनहॉवरची गाठ घेतली. त्या ठिकाणी त्याने NATO (North Atlantic Treaty Organization) आणि SHAPE (Supreme Headquarters–Allied Powers in Europe) ह्या संस्थांच्या कार्यपद्धतीविषयी संपूर्ण माहिती करून घेतली. परत आल्यावर २८ जून १९५१ ला बोसन येथील 'यंग रिपब्लिकन्स नॅशनल फेडरेशन' ह्या संघटनेपुढे त्याचे भाषण झाले. त्यात तो म्हणाला,

'सहा वर्षांपूर्वी जगामधे युनायटेड स्टेटस हे सर्वांत भारी राष्ट्र गणले जात होते. सर्वांत वरचढ अशी नौसेना, भूसेना व वायुसेना त्यांचीच होती. अॅटमबॉम्ब फक्त त्यांच्यापाशीच होता. जगातील लोकवस्तीपैकी १ अब्ज ७६ कोटी लोक त्यांच्या बाजूला व १८ कोटी लोक साम्यवादी विचारसरणीचे होते.

'तेच आताचे चित्र पाहा. आपले भूदल तेवढे भारी नाही, वायुसेनेचे सामर्थ्य घटत चाललेलेच आहे, महासागरावर आपले सामर्थ्य आहे, पण मानवसागराच्या पोटात असणारे आपले सामर्थ्य कमकुवत आहे. जगातील लोकसंख्येपैकी ५४ कोटी लोक आपल्या बाजूस, तर ८० कोटी साम्यवादी आहेत व हिंदुस्थान–पाकिस्तान ह्यांसारख्या देशातील ६० कोटी जनता तटस्थ आहे.

'ह्याचा अर्थच हा की, दरवर्षी १० कोटी लोक आपल्या बाजूचे प्रतिपक्षाकडे धावले!'

८ मे १९५२ रोजी न्यूयॉर्कमधे न्यूयॉर्क–राज्याच्या रिपब्लिकन पक्षाच्या सभासदांचा मेळावा होता. ह्या मेळाव्याला आयसेनहॉवर, बॅरेव, गव्हर्नर डिवे, हरबर्ट ब्राऊनेल वगैरे रिपब्लिकन राजकारणी व्यक्ती आलेल्या होत्या. १९५२ मध्ये होणाऱ्या निवडणुकासंबंधी खल सुरू झाला. सिनेटर हेन्री कॅबट लॉज हा आयसेनहॉवरला राष्ट्रपतीच्या पदासाठी उभे करावे ह्या मताचा होता; व याबाबतीत गाठीभेटी चालू होत्या.

११ जुलैला नक्की काय ते ठरणार होते. ब्राउनेल ह्याने आयसेनहॉवरच्या कानावर निक्सनच्या विषयी आपले मत घातले व जनमतही निक्सनला उपराष्ट्रपतिपदासाठी निवडावे, असे असल्याचे कळविले. इतर सिनेटर्स व कॉंग्रेसमेन ह्यांचे मत काय आहे, हे अजमावून घेण्यासाठी आयसेनहॉवरनी कॉनरॅड हिल्टन हॉटेलमध्ये जबाबदार व्यक्ती बोलावून घेतल्या व त्यांचा सल्ला विचारला. टॅफ्टचे नाव सुचवले गेले. नोलंडने निक्सनचे नाव सुचविले व त्याला पेन्सिल्व्हानियाचा गव्हर्नर जॉन फारन ह्यानी दुजोरा दिला.

१९५१ च्या मे महिन्यात निक्सन युरोपमध्ये आयसेनहॉवरला भेटला होता व त्या भेटीत निक्सनने आयसेनहॉवरनी १९५२ च्या राष्ट्रपतीच्या निवडणुकीला उभे राहावे अशी विनंती केली होती! निक्सनला ही गोष्ट आता पथ्यावर पडली!

आयसेनहॉवरने निक्सनचे नाव उपराष्ट्रपतिपदासाठी मान्य केले व तात्काळ दुसऱ्याच दिवशी रेडिओ व टेलिव्हिजनवरील मुलाखतीत जाहीर केले.

दोन आठवड्यांनंतर डेमोक्रॅटिक पक्षाने अॅडलाय स्टेव्हन्सन् व अलाबामाचा सिनेटर जॉन स्पार्कमन ह्यांची नावे अनुक्रमे राष्ट्रपती व उपराष्ट्रपतिपदासाठी निवडून दिल्याचे जाहीर केले.

निक्सनचे स्वागत करताना अमेरिकन वर्तमानपत्रे म्हणू लागली:

"It is like a breath of fresh air to this country and we belive the people will respond to it." ['निक्सनची निवड हे देशात एक नवे वारे खेळू लागल्याची खूण आहे व देशातील जनतेने त्याचे स्वागत केलेले उत्तम!']

गव्हर्नर डिवे हा रिपब्लिकन पक्षाचा अनिभिषित राजाच होता व ब्राउनेल हा एक वजनदार विचारवंत रिपब्लिकन सिनेटर होता.

पहिल्यापासून निक्सन हा 'वारेन' सारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ रिपब्लिकन व्यक्तीलाच राष्ट्रपतिपद दिले जावे, असे वरवर तरी म्हणत असे. १९५१ मध्ये आयसेनहॉवरला वर्षभर तरी तो वॉरेनच्याच बाजूने बोलत होता. पण ती नुसती फसवाफसवी होती. त्याच्यात काहीच तथ्य नव्हते.

१८ ऑगस्ट १९५२ पासून पुढील एक आठवडा म्हणजे अमेरिकेमध्ये निक्सनच्या विरुद्ध वर्तमानपत्रांनी उडविलेल्या बावड्यांमुळे महत्त्वाचा गेला. सिनेटर निक्सनने कॅलिफोर्नियामधील श्रीमंत व्यापाऱ्याकडून स्वतःसाठी १८२३५ डॉलर्स घेतले, असा आरोप केला गेला व अशी व्यक्ती उपराष्ट्रपतिपदासाठी योग्य नव्हे, असा प्रचार सुरू झाला. लॉस एन्जेल्सचा टाईम्स, शिकागोचा ट्रिब्यून, न्यूयॉर्क टाईम्स, बोस्टनचा ग्लोब ही वर्तमानपत्रे निक्सनवर तुटून पडली. मोहीम एवढ्या थरापर्यंत गेली की, निक्सन घाबरून जाऊन आयसेनहॉवरला भेटून सांगू लागला की, 'मी उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीला उभा राहू इच्छित नाही!'

विलंदर छोटिनेर ह्याने निक्सनला सल्ला दिला की, त्याने निवडणुकीतून अंग काढून घेऊ नये. ती तर मनस्वी नाचक्की होईलच, पण वर्तमानपत्रकार आणि काही विशिष्ट लोक जे आरोप करीत आहेत, त्याला कबुली दिल्यासारखे होईल. पुढील आयुष्यात हे अत्यंत मारक ठरेल. अशा गोष्टींवर एकच उपाय दिसतो व तो म्हणजे स्वतः पैसे खर्च करून टेलिव्हिजनवर जनतेसमोर आपले सत्य विचार मांडणे व आरोपांना संपूर्ण योग्य ते उत्तर देणे!

निक्सनला ते पटले व त्याने आपण टेलिव्हिजनवर २ सप्टेंबर १९५२ ला रात्री ९ वाजता भाषण करून निरनिराळ्या आरोपांना उत्तर देणार असल्याचे जाहीर केले.

हॉलिवूड येथील एल. कॅपिटन थिएटरमध्ये निक्सनने ते अत्यंत

महत्त्वाचे असे टी. व्ही. वर भाषण केले.

या भाषणाबद्दल निक्सनला आयसेनहॉवरकडून शाबासकी मिळाली. बाहेरून रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षांकडे निक्सनच्या अभिनंदनाच्या ३ लाख तारा गेल्या. रिपब्लिकन नॅशनल कमिटीच्या १३८ सभासदांपैकी दुसऱ्या दिवशीच्या रात्रीपर्यंत १०७ सभासदांच्या अभिनंदन-तारा निक्सनकडे येऊन थडकल्या.

नोव्हेंबर १९५२ मध्ये निवडणुका झाल्या. रिपब्लिकन तिकिटावर उभे राहिलेले आयसेनहॉवर व निक्सन निवडून आले व २० जानेवारी १९५३ ला दोघांनी राष्ट्रपती व उपराष्ट्रपतिपदाची सूत्रें हातात घेतली.

*

प्रख्यात स्तंभलेखक ड्रयू पिअरसन, निक्सनची उपराष्ट्रपतिपदावर नियुक्ती झाल्यानंतर म्हणाला होता, " I do not know why, but I don't trust Nixon.' [ 'का कोण जाणे, पण मला निक्सन विश्वासार्ह वाटत नाही.' ]

१८-९-१९५२ पासून 'न्यूयॉर्क पोस्ट'ने निक्सनच्या गुप्त फंडाच्या जमवाजमवीवर चार मोठाले माहितीवजा लेख लिहिले. तेव्हापासून डेमोक्रॅटिक पक्षाचे जबाबदार घटक निक्सनचा उल्लेख नेहमीच TRICKY DICK ह्या उपरोधिक भाषेत करीत राहिले व हा शिक्का निक्सनच्या कपाळावर १९७४ पर्यंत राहिला.

१९५३ पूर्वी वॉशिंग्टनच्या स्प्रिंग व्हॅली ह्या भागात राहणारा सिनेटर निक्सन, आता उपराष्ट्रपती झाल्याकारणाने 'वेस्ले हाइटस' ह्या उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या भागात राहावयास गेला.

ब्लॅकस्टोन हॉटेलमध्ये आयसेनहॉवर एका खान्याच्या प्रसंगी निक्सनला सहज म्हणाला :

'Dick, I do not want a Vice-President who will be a figurehead. I want a man who will be a member of the team and I want you to be able to step into the Presidency smoothly, if anything happens to me.'

[ 'नुसता नामधारी उपराष्ट्रपती मला नको आहे. मी आता वृद्ध झालेलो आहे. जर मला काही झाले तर अमेरिकेच्या राष्ट्रपतिपदावर तुला अगदी सहजपणे विराजमान होता यायला हवे.' ]

खरोखरच जनरल आयसेनहॉवर रणांगणावरील राजकारण सतत ३० वर्षे खेळत होता, आता थकला होता, परंतु अमेरिकेतील सर्वश्रेष्ठ अशी सन्माननीय राष्ट्रपतीची धुरा, एकदा स्वीकारण्याची त्यालाही इच्छा होतीच. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत त्याला यश आले. निक्सनसारख्या-त्याच्या दृष्टीने अत्यंत कर्तबगार अशा-उपराष्ट्रपतीची त्याला जोड मिळाली. वार्धक्यामुळे व लढाया खेळून थकल्यामुळे आयसेनहॉवरला जगभर निरनिराळ्या देशांना भेटी देण्याची इच्छा असूनही, ते शक्य नव्हते. ते परराष्ट्रदौऱ्याचे काम निक्सनच्याच शिरावर पडले. १९५३ ते १९६० च्या दरम्यान निक्सनने एकंदर आठ वेळा अमेरिकेच्या बाहेर दौरे केले.

उपराष्ट्रपती म्हणून अमेरिकेच्या राज्यकारभारात निक्सनने चांगलेच लक्ष घातले व ज्या ज्या वेळी आयसेनहॉवर वॉशिंग्टनच्या बाहेर जाई त्या त्या वेळी कॅबिनेट व नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलच्या बैठकांचे अध्यक्षस्थान तोच स्वीकारीत असे. स्तंभलेखक व वर्तमानपत्रांचे बातमीदार ह्यांना त्याचे दरवाजे नेहमीच खुले असत. निरनिराळ्या ठिकाणांहून त्यास भाषणे देण्यासाठी बोलावणी येऊ लागली व काही काही वेळेला तर दरेक भाषणाला पाच पाच हजार डॉलर्स दिले जात होते. रिपब्लिकन पक्षातर्फे निवडून गेलेले सिनेटर्स व लोकप्रतिनिधी निक्सन हाच राष्ट्रपतीच्याऐवजी सर्व काम पाहतो, हे मानण्यास-व पटवून घेण्यास तयार नव्हते.

ह्यावेळी १९५३ च्या अखेरी 'लाईफ' मासिकानेही एका अग्रलेखात, कारकीर्दीचा आढावा घेताना लिहून टाकले की, 'अमेरिकेचा राज्यकारभार सध्या निक्सनच हाकत आहे. झटाझट कामे उरकून टाकण्यात तो वाकबगार आहे. प्रत्येक गुंतागुंतीच्या प्रकरणाची हाताळणी तो योग्य तऱ्हेने करीत असून, त्याचा दृष्टिकोण पूर्णपणे व्यवहारी दिसतो.'

१९५२ च्या अखेरीस इजिप्तच्या फरूक राजाला देश सोडून निघून जावे लागले व त्यानंतरच्या क्रांतीमधूनच नासर हा इजिप्तच्या सर्वाधिकारी झाला. एप्रिल १९५४ मध्ये त्याने राष्ट्राध्यक्षपद स्वीकारले. इजिप्त आणि इस्रायल यांच्यातील तेढ एकसारखी वाढतच होती. हल्ले, प्रतिहल्ले सारखेच चालू होते. इजिप्तच्या मागणीवरून अमेरिकेने लांब धाग्याच्या कापसाच्या बदल्यात २०० कोटी डॉलर्सची लढाऊ हत्यारे, विमाने व टँक्स पुरविली; परंतु त्या वेळचा सेक्रेटरी ऑफ स्टेट, जॉन फॉस्टर डलेस ह्याला ते पसंत नव्हते. त्याने आपली नाराजी राष्ट्राध्यक्षांच्या कानावर घातली होती. प्रकरण चिघळतच गेले. सप्टेंबर १९५५ मध्ये अरब राष्ट्रांना मदत करण्याच्या हेतूने व विशेषतः अमेरिकेला शह देण्यासाठी व जरब देण्यासाठी रशिया मध्यपूर्व राजकारणात पहिल्या प्रथमच उतरला. हे सहन न होऊन अमेरिकेने 'बगदाद-करार' करून टाकला. त्यात इंग्लंड, तुर्कस्तान, पाकिस्तान, इराक व इतर अरब राष्ट्रे घुसडून ठेवली.

बगदाद कराराला तोडीस तोड म्हणून नासरने इजिप्त, सायरिया, सौदी-अरेबिया व येमेन ह्यांच्यात करार घडवून आणला व रशियाने त्या कराराला संपूर्ण पाठिंबा दिला. ह्या कराराला 'SOUTHERN TIER' (सदर्न टायर) व बगदाद कराराला 'NORTHERN TIER' (नॉर्दन टायर) हे शब्द पुढे फारा वर्षे रूढ होऊन राहिले होते.

१९५४, ५५ व ५६ मध्ये अरब राष्ट्रे व इस्रायल एकमेकांवर सतत हल्ले, प्रतिहल्ले करीतच राहिली. इस्रायलला सर्व साहित्य पुरवून अमेरिका त्याचे बळ वाढवीत होती.

मे १९५६ मध्ये नासरने लाल चीनला मान्यता दिल्याची घोषणा केली. त्यामुळे अमेरिकेला मध्यपूर्वेत कम्युनिस्टांचा फार मोठा धोका वाटू लागला.

२४ सप्टेंबर १९५५ ला आयसेनहॉवरला हृद्विकाराचा पहिला झटका आला, तेव्हा ह्या परराष्ट्र घडामोडींच्याकडे आयसेनहॉवरपेक्षा निक्सन व स्टेट-सेक्रेटरी जॉन फॉस्टर डलेस हे बारकाईने नजर ठेवून होते. जरासे थोडे बरे वाटू लागल्यावर आयसेनहॉवर काम पाहू लागला. परंतु त्याची तब्येत अधिकच बिघडली. ९ जून

पृष्ठ २१ वर

# नव्याने धडा कोणता गिरवायचा ?

कपिल कीर्तिकर

माणूसच्या २७ नोव्हेंबरच्या अंकात, श्री. भावे यांचे 'नव्याने गिरवायचा धडा' हे टिपण वाचले. माझ्यासारख्याला, बऱ्याच दिवसांनी, काही वैचारिक झटापट करण्याची सुरसुरी आणण्यात या टिपणाने यश मिळवले, हीच गोष्ट त्याची किमान गुणवत्ता सिद्ध करण्यास पुरेशी आहे. एकूण टिपणाची रचना पेचदार आहे. अनेक कल्पना, व्याख्या यांचे स्पष्टीकरण, अमक्याचा अर्थ हा, तमके म्हणजे ते अशा ठोस स्वरूपात जवळजवळ समीकरणे मांडावी तसे केले आहे. शब्दांच्या उपयोगाचेही काही एकदोन नवे प्रयोग करून, मुळातल्या वादग्रस्त विषयाचे रूपांतर, पॉझिटिव्हिस्ट अशा विवेचनात करून टाकले आहे.

हे सर्व ठीकच आहे. पण हे सर्व मान्य केल्यावर, सर्व टिपण लक्षपूर्वक वाचल्यानंतर, प्रश्न शिल्लक राहतो तो हा की, नव्याने गिरवायचा धडा कोणता ?

असे का व्हावे ? इतक्या तर्कनिष्ठ चर्चेतून " लोकशाही राजकारण त्याची सर्व पथ्ये पाळून आपण करणार की नाही, हा खरा प्रश्न आहे, ". असा सपाट, पूर्णपणे टॉटॉलॉजिकल निष्कर्ष कसा निघाला ?

लोकशाही राजकारण म्हणजे लोकशाही घटनेचा प्राण आहे किंवा असे राजकारण म्हणजे कोणत्याही प्रश्नावर सार्वजनिक चर्चेने बहुमत निर्माण करण्याची प्रक्रिया या भावेजींच्या व्याख्यांशी अखेरचा निष्कर्ष जुळवून पाहिला तर या साऱ्या चर्चेचे द्विरुक्तिपूर्ण स्वरूप स्पष्ट होते. याचे कारण पाहू लागल्यास, ते टिपणाच्या मूळ प्रयोजनातच सापडते.

'लोकशाहीची गाडी रुळावरून खाली आली या पंतप्रधानांच्या वाक्याचा अर्थ लावणे या हेतूने टिपणाची उभारणी झाली. या कामातच मूलभूत गल्लत झाली आहे. पंतप्रधानांनी जेव्हा वरील विधान केले तेव्हा त्यांना असे म्हणायचे होते की, २६ जून ७५ पूर्वीच काही महिने लोकशाहीची गाडी रुळावरून घसरली होती. ती परत मार्गावर आणण्यासाठी घटनेतील तरतुदींनुसार काही आकस्मिक पावले टाकावी लागली. हे त्यांनी अनेकवार स्पष्ट केले असताना, भावेजींनी या विधानाचा अर्थ असा लावला की, २६ जून ७५ रोजी केलेल्या उपाययोजनेमुळे किंवा नंतर, लोकशाहीची गाडी रुळावरून घसरली असे पंतप्रधानांना अभिप्रेत आहे. खिडकीला दार म्हटले व दाराला खिडकी म्हटले तर घराच्या उपयुक्ततेविषयी व रचनेविषयी जो गोंधळ उडेल तसा पुढील सर्व टिपणाचा उडाला आहे. परिणाम असा होतो की, पंतप्रधानांच्या ज्या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी हा खटाटोप सुरू झाला ते स्पष्ट होणे दूरच, पण इतर काही तर्कदोष मात्र निर्माण झाले आहेत.

या टिपणातील व्याख्या, समीकरणे, सूत्रे या सगळ्यांतून एकत्रित असा अर्थ काही हाती लागतो काय ?

लागतो. या टिपणात असे एक सूत्र प्रामुख्याने मांडले आहे की, लोकशाहीमध्ये अल्पमताला बहुमतापासून काही बाबतीत पूर्ण संरक्षण पाहिजे व बहुमताला काही बाबतीत अल्पमतापासून पूर्ण संरक्षण पाहिजे. हा सिद्धांत आपल्याला सध्याच्या स्थितीत थोडा आकर्षक वाटण्याचा संभव आहे. तसा तो खरोखरीच आहे काय, याची थोडी छाननी करण्यास हरकत नाही.

तार्किक दृष्ट्या पाहता हा सिद्धांत असंभव, अंतर्विरोधी असा आहे. बहुमतापासून अल्पमताला जे संरक्षण मिळणार ते बहुमताच्या त्या त्या वेळच्या कल्पना, भावना, समजुती यांवरच आधारित असणार. आणि मुख्य म्हणजे ते बहुमताच्या मर्जीवर राहणार. तोच प्रकार अल्पमताकडून बहुमताला जी मुभा मिळणार त्याबाबत आहे. ही गोष्ट कोणत्याही कायद्याने, तत्त्वाने, सिद्धांताने बांधून टाकता येण्याजोगी नाही. लोकशाहीच्या रूढ व्याख्येनुसार, बहुमताचे वर्चस्व ही लोकशाहीची मुख्य खूण मानली गेली असल्याने, अल्पमताला याबाबत फारशी अपेक्षा, तीसुद्धा एखाद्या सिद्धांतानुसार करता येणार नाही.

या विचारसरणीतील मुख्य दोष म्हणजे यामध्ये समाजाचे बहुमत व अल्पमत असे पूर्णपणे स्वायत्त, संपर्करहित, तुटक असे तुकडे पडतात. कारण अमुक बाबतीत एकमेकांना पूर्ण संरक्षण द्यावयाचे म्हणजे चर्चा, विचारविनिमय, संपर्क यांची गरज ती काय उरणार ? 'लोकशाही म्हणजे सार्वजनिक चर्चेने बहुमत निर्माण करण्याची प्रक्रिया' असे सूत्र या टिपणात वारंवार मांडणारे भावेजी टिपणाच्या मुख्य विधानात समाजाचे परस्परापासून पूर्णपणे ईम्युन असे तुकडे पाडणारी सिद्धांत मांडतात हे आश्चर्यकारक वाटते.

पण तर्काचा आश्रय मर्यादेबाहेर घेतला की अशीच आपत्ती ओढवते. तर्कप्रक्रिया ही रेल्वेच्या डब्याप्रमाणे असते. मुख्य उद्दिष्ट हे जे इंजिन, त्याच्यामागे ती सरळ रेषेत जाते एवढेच. ती स्वतःची दिशा स्वतः ठरवू शकत नाही,

आता भावेजींच्या मुख्य विधानाचा काही ऐतिहासिक मागोवा घेता येतो का पाहू. अल्पमत व बहुमत किंवा सत्तेचे विभाजन किंवा मूलभूत अधिकार अशा सिद्धांतांना धरून पारंपारिक लोकशाहीची उत्क्रांती झाली नाही, ती तशी झाली असे मानले तर भावेजींनी लोकशाहीला जी अनेक सूत्ररूप लक्षणे प्रदान केली आहेत तशी करता येतात पण वस्तुस्थिती जरा वेगळी आहे.

लोकशाहीच्या जडणघडणीतील काळात सारा झगडा राजेशाहीविरुद्ध व काही प्रमाणात पुरोहितशाहीविरुद्ध होता. राजे व पुरोहित नाहीत ते, लोक–अशी लोकशाही या शब्दामधील 'लोक' या शब्दाची सिद्धी आहे. राजे व पुरोहित यांच्या हातून सत्ता काढून घ्यावयाची ही मूळ प्रेरणा. हा टप्पा बव्हंशी पार पडल्यावर मग लक्षात आले की राजे व पुरोहित निष्प्रभ झाले तरी 'लोक' या घटकात देखील काही स्पष्टता करणे आवश्यक आहे. 'लोक' हा काही एकसंध; एकजीवी घटक नाही. मग वाटले की, जास्तीत जास्त लोक ठरवतील तसे (बहुमत)

करावे. मग हे प्रमाणही जेव्हा काम देईनासे झाले तेव्हा पुस्ती जोडण्यात आली की, बहुमताला देखील निरंकुश सत्ता देऊन उपयोगी नाही. हे वाटण्यामागे लोकशाही लढ्यातीलच एक मोठी प्रेरणा होती. राजेशाहीमध्ये धार्मिक, वा अन्य अल्पमताचा पराकाष्ठेचा छळ होत असे तो कमी व्हावा ही ती प्रेरणा.

या वर्णनावरून ध्यानात येईल की लोकशाहीत काही मूलभूतपणे बहुमत–अल्पमत हे घटक अनिवार्य आहेत असा काही प्रकार नाही. लोकशाही काही प्रमाणात सुस्थिर झाल्यावर हे लक्षात आले की, अल्पमत–बहुमत अशा काही सामाजिक अवस्था असतात. व त्याची काही सोय लावणे भाग आहे.

'लोकशाही राजकारण हितसंबंधाचे अस्तित्व अटळ मानते' हे भावेजींचे विधान आजच्या काळातील विचारसरणी पूर्वीच्या उत्क्रांतीस लागू करण्याच्या दोषामध्ये मोडते. लोकशाही असे काही मानीत नाही. कारण एक रूढ व्यवस्था म्हणून स्थिर होईपर्यंत तिला काही पत्ताच नव्हता की राजे–पुरोहित नष्ट झाल्यावरही आपणात काही प्रबळ, परस्परविरोधी हितसंबंध राहतील की ज्यांना राजकीय महत्त्व असेल. अॅडमस्मिथ यांच्या अर्थशास्त्रातही निर्गुण–निराकार बहुमताची कल्पना स्पष्टपणे दिसते. किंबहुना 'सरकार' ही कमीत कमी व्यक्तींचा घटक वगळता, बाकी सर्व समाज व्यक्तीव्यक्तीचा, खुल्या स्पर्धेचा, त्याच्या जास्तीत जास्त भरभराटीस वाव देणारा असा आहे, अशीच समजूत होती.


त्यामुळे 'लोकशाही हितसंबंधी गटांचे अस्तित्व अटळ मानते,' असा सिद्धांत मांडून विचार केल्यास अनर्थ होईल. 'तात्त्विक हितसंबंध' हा एक प्रकार शोधून काढून भावेजींनी कमालच केली आहे. हितसंबंध (म्हणजेच साध्या भाषेत स्वार्थ) कसल्याही तत्त्वातून निर्माण होत नाहीत, ते मुळातच असतात व त्यांच्या रक्षणासाठी तत्त्वे निर्माण होतात, हीच वस्तुस्थिती आहे. 'हितसंबंध' हा प्रकार कोणत्याही चर्चेने, संवादाने, समजुतीने नष्ट होणारा नाही, याला गेल्या शेकडो वर्षांचा इतिहास साक्षी आहे. म्हणजे याही बाबतीत चर्चेचे प्रयोजन संपते. बहुमत व अल्पमत हे दोन हितसंबंध आहेत, असे कल्पून व इतर हितसंबंधांची अटळता मान्य करून भावेजी अशा प्रकारे चर्चा, संवाद यांची जरूरी स्वतःच खलास करीत आहेत. पण सर्व टिपणांत चर्चेचा पाठपुरावाही दिसतो. याची संगती लावणे मनोरंजक ठरले तरी सध्या श्रेयस्कर नाही. ते काम तूर्तास पुढे ढकलू.

या टिपणातील आणखी एका सिद्धांताचा परामर्ष घेऊन समारोप करू. भावेजी म्हणतात, 'बहुमताच्या निर्णयाच्या कक्षेत येणार नाहीत, अशी व्यक्तीच्या जीवनातील काही अंगे असली पाहिजेत, यालाच मूलभूत अधिकार असे म्हणतात.' मुळात मूलभूत अधिकार बहुमताच्या निर्णयाच्या कक्षेत येत नाहीत, हे म्हणणे बरोबर नाही. हे अधिकार बहुमतानेच व्यक्तीला प्रदान केलेले असतात. किंबहुना बहुमताचे राज्य नसते तर व्यक्तीला कोणताही अधिकार मूलभूतपणे असा प्राप्त झाला नसता.

लोकशाहीचे नाव सांगून मूलभूत अधिकारावर हक्क सांगावयाचा व त्याच लोकशाहीतील बहुमताविरुद्ध तो संरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करायचा, यात कसलेही तत्त्व नाही. उघडउघड हितसंबंधांचे राजकारण आहे. हेच राजकारण येथील हितसंबंध या ना त्या स्वरूपात गेली कित्येक वर्षे करीत आहेत.

ज्यांना रूढपणे 'मूलभूत अधिकार' म्हणतात ते बहुमताविरुद्ध वापरण्यासाठी तयार झालेले नाहीत, तर राजेशाहीशी झगडयाच्या काळात काही बाबी तरी राज्यांच्या हाताबाहेर ठेवाव्यात, असा प्रयत्न लोकशाही बहुमताने केला, त्यातून निर्माण झालेले आहेत. मूलभूत अधिकार या नावावर वारेमाप संपत्तीचा संचय, सर्व प्रकारच्या गुन्हेगारींतून शब्दांचा कीस काढून सुटणे, राष्ट्राच्या हेतूंना, प्रयत्नांना अडसर ह्या गोष्टी होत असतात. या गोष्टींना मुभा देण्यासाठी मूलभूत अधिकार उत्क्रांत झालेले नाहीत. समाजाचा प्रपंच व्यवस्थित चालावा या जाणीवेने प्रत्येक व्यक्तीस हे अधिकार 'दिलेले' आहेत. हा मूळ हेतू बाजूला पडेल, अशा प्रकारे हे अधिकार वापरता येणार नाहीत.

नव्याने गिरवायचा धडा कोणता असेल तर तो हा की, लोकशाही राजकारणाचे स्वरूप त्रिकालाबाधित असे केव्हाही असू शकत नाही: आपला मगदूर, आपले हेतू, आपल्या आकांक्षा यांच्यानुसार लोकशाहीची विविध रूपे संभवतात. व्याख्या, सूत्रे, कलमे यांच्यात जखडून टाकण्याची गोष्ट लोकशाही नव्हे. असे प्रयत्न वेळोवेळी करावे लागतात, कारण सर्वांच्या जाणीवेत काही निश्चितता यावी, एक सर्वमान्य संदर्भरेषा उपलब्ध व्हावी. यापलीकडे जाऊन कोणी शब्दांच्या वा सूत्रांच्या आधारावर या साऱ्या व्यवस्थेच्या मुळावरच आघात करील व ते आपण चालून देऊ तर श्रुतिस्मृतिपुराणोक्त बंधनात अडकलेला मध्ययुगीन समाज व आपण यामध्ये काही अंतर राहणार नाही. □



# मी....सौदामिनी !

**पतंग....आणि दोरी. पतिपत्नींचं असंच असतं. यातील पतंग कोण आणि दोरी कोण ? हे ज्याचं-त्याचं भाग्य आणि........**

कुं. ल. पुरी

माझ्या विवाहाप्रीत्यर्थ शर्माचाचाजींनी एक सुंदर पार्टी दिली. त्यांचा छोटासा—सुंदर दिवाणखाना माणसांनी फुलला होता. नाटचक्षेत्रातली नामवंत माणसं जमली. 'माझा संसार सुखाचा होवो' अशा शुभेच्छा व्यक्त झाल्या. मी नाटचक्षेत्र सोडणार म्हणून माझे चाहते हळहळले. जुन्याजाणत्या कलाकारांनी मात्र माझ्या निर्णयाचं कौतुक केलं. माझं अभिनंदन केलं. जुन्या आठवणी निघाल्या...नव्या योजना पुढं आल्या... हास्यविनोदात सारे रंगले. गप्पागोष्टींसोबत खाणंपिणंही सुरू होतं. माझ्या मनाची नदी आनंदानं भरून वाहू लागली. माझ्या मैत्रिणींना माझा हेवा वाटला. का वाटू नये? श्यामकांत ठाकूरसारखा राजबिंडा पुरुष माझा पती झाला. शिवाय जहागिरदार, लक्षाधीश. मला जो तो जहागिरदारीणबाई म्हणू लागला. माझी छाती अभिमानानं फुगली. मनपाखरू आकाशात आनंदानं संचार करू लागलं.

चाचाजींनी स्वतःच सर्वांचं स्वागत केलं. प्रत्येकाचे क्षेमकुशल विचारले. काही माणसांना मी ओळखत नव्हते. चाचाजी माझा परिचय करून देत, 'माझी मुलगी, मिनी... सौदामिनी... माझ्या जुन्या नाटकांची नायिका. माझं नवं नाटक 'रानी रूपमती' या नाटकाची देखील हीच नायिका. माझी नाटकं जणू हिच्यासाठीच जन्मलीत !' कुणी तरी म्हणालं सुद्धा, 'तसं नव्हे दामाजी, तुमच्या नाटकासाठी या जन्मल्यात !' मग सारे हसले.

माझ्या दृष्टीनं एक अभिमानास्पद गोष्ट घडली. श्री. मुखर्जींची भेट. मुखर्जी—हिन्दी सिनेमाक्षेत्रातील ख्यातनाम निर्माता—दिग्दर्शक. त्यांच्या 'रानी पद्मिनी'या चित्रपटात मी काम करावं असा त्यांचा आग्रह. मी नम्रपणे नकार दिला. त्यांना आश्चर्य वाटले. 'आपल्या सौंदर्याचा...विशेषतः कलेचा हा अपमान आहे. शिवाय येणाऱ्या लक्ष्मीला तुम्ही लाथाडता आहात...साऱ्या भारतवर्षात तुमचं नाव होईल.' ते म्हणाले.

मुखर्जींबरोबर मी गप्पा करण्यात एवढी रंगले की, चाचाजी हॉल सोडून कधी बाहेर गेले हे माझ्या लक्षात आले नाही. ते गडबडीनं माझ्या जवळ आले, तेव्हा माझ्या लक्षात आलं. 'मिने, चल माझ्याबरोबर !' ते म्हणाले. घामाघूम झाले होते. चेहऱ्यावर उदासी. अंग थरथरत होतं. मी प्रश्नार्थक चेहऱ्यानं त्यांच्याकडे पाहिलं. ते उपस्थितांना म्हणाले, 'माफ कीजिएगा...मेरे एक दोस्त का ॲक्सिडेंट हुआ है। हम चलते हैं। आप चायपानी लीजिए। हम अभी आते है।'

मी गोंधळले. अपघात ? कुणाला ? चाचाजी मला चल म्हणतात, त्या अर्थी... मला विचार करायला सुद्धा त्यांनी वेळ दिला नाही. जबरदस्तीनं त्यांनी मला कारमध्ये बसविलं. मी आपली विचारीत राहिले, 'काय झालंय चाचाजी ? कुणाला अपघात? कसं कळलं तुम्हाला ?' त्यांनी तोंडाला कुलूप घातलं. ते फक्त ड्रायव्हरला म्हणाले, 'चलो जनरल हॉस्पिटल !'

रस्त्यात कुणी कुणाला बोलले नाही. चाचाजींनी ओठ आवळले. शंकाकुशंकाच्या मुंग्यांनी माझं मन पोखरलं.

बघता बघता कार दवाखान्यासमोर उभी राहिली. आम्ही खाली उतरत नाही तोच आमचा सैय्यद ड्रायव्हर आमच्या समोर उभा राहिला. म्हणाला, 'अब हालत ठीक है ?' मी विचारलं, 'किस की ?' 'आपको कुछ पता नही ?' त्यानं माझ्याकडे जरा चमत्कारिक नजरेनं पाहिलं. 'सारे शहरमें हुआ... देखिए ये लोग—भीड...' मी समोर पाहिलं... दवाखान्यात माणसांची भाऊगर्दी...

'मी सांगतो. चल. मघा...तुझ्या बंगल्यावरून तुझ्या माळचानं फोन केला होता... श्यामकांतला...'

'काय झालंय त्यांना ?' मी घाबरून विचारलं. 'अपघात... अरे देवा, माझ्या संसाराची चूल-बोळकी मांडून झाली नाही तोच...' माझ्या मनात आले. अंगातली शक्ती संपली. गरगरायला लागले. समोरची माणसं अस्पष्ट दिसायला लागली. माझा तोल जाणार तोच चाचाजींनी मला सावरले.

मला चालावंसं वाटत नव्हतं. हिम्मत होत नव्हती. श्यामचं रक्ताळलेलं शरीर माझ्या नजरेसमोर तरळू लागलं. 'मिने, असं हातपाय गाळून कसं चालेल ? सैय्यद म्हणाला नाही का, की हालत ठीक है। मग...' दवाखान्याची एकेक पायरी चढणं म्हणजे हिमालय ओलांडण्याइतकं कठीण वाटू लागलं. पाय लटपटू लागले. लोकांच्या नजरा माझ्यावरच खिळल्या.

'ब्युटिफूल.....लव्हली !'

'क्या खूबसूरत औरत है। इस हालत में इतनी सुंदर !'

'काय रसरसलीय...जणू नागपुरी संत्रं!'

काय म्हणावं या लोकांना ? काही काळवेळ ! मला त्यांच्याकडे लक्ष देऊन चालणार नाही !

मध्येच डॉ. अडवाणी भेटले. म्हणाले, 'घबराने की कोई बात नही, सब कुछ ठीक है।' मनाला जरा बरं वाटलं. 'वार्ड नं ५... भेटू शकता.' ते लगबगीनं पुढं निघून गेले.

वार्ड नं. ५ समोर प्रेतवत झोपलेला श्याम !

त्याला बघून मला रडे कोसळले. त्याच्या अंगावर झेप घ्यावी...त्याला कुशीत घ्यावं... अश्रूंची नदी वाहावी... मी झेपावले तर चाचाजींनी हात धरला.

किंचित आश्चर्य वाटलं. त्याला अपघात झाला असं वाटत नव्हतं. मग झालं काय ? हा प्रेतवत का पडला ?...काही वाईट घडलं असतं तर...माझ्या भावना अश्रुरूपानं पाझरू लागल्या.

'हे हॉस्पिटल आहे, नसता तमाशा करू

नकोस.' माझ्या सासूचा कोरडा ठणठणीत आवाज. मी त्यांच्याकडे डोळे पुसत पाहिलं. सासू व नणंदेचा चेहरा मला कठोर वाटला. कपाळावर आठ्यांचं जाळं. डोळ्यांतून तिरस्कार व्यक्त झाला. मी तिथं यायला नको होतं असंच त्या भासवीत होत्या. मी त्यांच्याकडे पाहिलं. गाढ झोपल्यासारखे वाटले...

'सुमन, काय झालं ग यांना ?' मी थरथरत्या आवाजात नणंदेला विचारलं. तिनं दुर्लक्ष केलं. मी चाचाजींकडं पाहिलं, 'हाँ, बेटी...' ते अडखळले.

मी भांबावून गेले. त्यांना अपघात नक्कीच झाला नसावा. काय झालं ?

'आई, तुम्ही तरी सांगा. मी बाहेर गेले तेव्हा तर चांगले होते. असं एकाएकी काय झालं...?' मी सासूला पुन्हा विचारलं. त्यांचे ओठ थरारले. चेहरा रागानं लाल झाला. त्या बोलल्या नाहीत. मी न राहवून नर्सला विचारलं, 'सिस्टर...प्लीज, तुम्ही सांगा... इनको क्या हुआ है ?'

सिस्टर कोऱ्या चेहऱ्यानं-थंडपणे म्हणाली, 'पॉयझनिंग...' मी आश्चर्यानं तिच्याकडे पाहिलं. ती कसलं तरी इंजेक्शन देत होती. मी गोंधळून चाचाजींकडे पाहिलं. त्यांनी खांद्याला स्पर्श करून धीर दिला.

'जहर ? दिलं की घेतलं ? कुणी दिलं ? आई-सुमन...शक्य नाही ? कोण जहर देणार ? मी दिलं असं यांना वाटतं की काय ? माझ्या प्राणप्रिय पतीला मी जहर दिलं ? की घेतलं ! का घेतलं ?'

अनेक प्रश्नांच्या भेंडोळ्यात मी सापडले. माझा गळा आवळला जात आहे असा मला भास झाला. मला रडे कोसळले...

'हे बघ, नसता तमाशा नको. बघवत नसेल तर घरी जा. मी...त्याची आई जिवंत आहे त्याचं करायला...' सासूचे कडवट शब्द काळीज कापत गेले. श्यामकान्तनं त्याच्या मनाविरुद्ध माझ्याशी लग्न केलं, म्हणून...

इतक्यात डॉ. अडवाणी तिथं आले. 'शर्माजी, आप इन्हे घर ले जाइये ! सॉरी, मिसेस ठाकूर, आपके लिए यही अच्छा है...'

'नही डॉक्टर, मैं नहीं जाऊंगी !'

'मैं आपके भावनाकी कदर करता हूं ! मगर...जरा सोचिए...आप बैठेंगी-रोयेंगी ...पेशंटको तकलीफ होगी। और ये भीडका कारण आप है...इनको कैसे हटाये...पुलीस भी आ रही है...'

'क्या ?'

'हाँ...'

'चल बेटी, अभी चलते है !'

'नही चाचाजी...'

'आपके रहनेकी कोई जरूरत नही, हम है...' डॉ. अडवाणी.

'माझी इथं राहण्याची जरूरत नाही. माझी...ह्यांच्या पत्नीची ?

'भरोसा रखिए...'

'चल बेटी. डॉ. अडवाणी मेरे मित्र है... अच्छा डॉक्टर हम चलते है ! जरा ख्याल रखिए...' चाचाजी म्हणाले.

चाचाजींच्या आधारानंच मी पायऱ्या उतरू लागले.

'सम्हाल के; अरे हम भी है राहों में...'

'फुकट मरशील लेका ! नट्यांच्या नवऱ्यांना जहर खावं लागतं.' कुणी तरी बडबडले. मी माझ्याच नादात होते. 'ह्यांनी जहर घेतलं...का ?...का ?'

उत्तर सापडेना. डोकं बधीर झालं. माझं मन 'का' भोवतीच घिरट्या घालू लागलं.

चाचाजींनी मला घरी पोहोचतं केलं. बराच वेळ बसले. मी तर बोलण्याच्या मूडमध्ये नव्हते. 'येतो' म्हणून ते घरी गेले.

मी आमच्या शयनकक्षेत स्वतःला कोंडून घेतलं. हुमसूहमसून रडले. रडे थांबल्यावर पुन्हा विचार करू लागले. समोरच्या त्यांच्या मोठ्या-हसऱ्या फोटोला वारंवार प्रश्न विचारू लागले, 'आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला ? का म्हणून ? का...' वेड्यासारखी मी प्रश्न विचारीतच राहिले... *

पृथ्वीच्या पोटात भयंकर खळबळ माजली की भूकंप होतात.

ज्वालामुखीचा प्रचंड स्फोट होतो. पृथ्वीचं कवच फोडून लाव्हारस वाहू लागतो.

माणसाचं डोकं कसल्या प्रकारच्या कवचाचं बनलंय देव जाणे ! भयंकर संताप-द्वेष-जीवघेण्या आठवणी...सतत मनात खदखदत असतात. यामुळं डोकं फुटायला हवं होतं. एका सेकंदात सारेच कसे शांत झाले असते. पण...हे सद्भाग्य माणसाचं नाही. डोकं फुटत नाही... फिरतं-कुजतं...रखडत जाणं हेचं माणसाच्या नशिबी !

मला वाटलं, चटकन मरण यावं ! नाही आलं. वाटणं अन् होणं यात उभी ठाकते नियती ! दैव कमी !

मला वाटलं होतं, एक छोटंस-साधं-माझं स्वतःचं घर असावं. श्यामकान्तसारखा धष्टपुष्ट पती ! देखणा...गोजिरवाणी दोन मुलं...घरात हसणारी मुलं अन् अंगणात वाऱ्याच्या झुळकेनं डोलणारी फुलं ! बस... बाकी काही नको. पैसा खूप मिळविला... खर्चला. नावही झालं...महाराष्ट्रातील नाट्यप्रेमी माणूस मला विसरू शकणार नाही...

पैशाच्या-नावाच्या मागं लागून भरकटत जीवन जगू नये. त्यात सुख नाही. निदान मला तरी तसे वाटले.

माणसाच्या भूतकालीन कर्मावर त्याच्या वर्तमानकालीन जीवनाची इमारत उभी राहते. माझं पूर्वचरित्र...लोकांच्या दृष्टीनं घाण होतं...मला नाही वाटत...

माणसाचं जीवन दुःखाचा सहारा वाळवंट आहे. एवढं असह्य-वेदनामय जीवन कुणी बनवलं ? निसर्गानं ? की माणसानं ? माणसानं ! माणसातल्या स्वार्थानं ! आपलं ते छान...दुसऱ्याची ती घाण !

निसर्गानं माणसासाठी सुखाची दारं खुली केली...सुंदर पृथ्वीची निर्मिती केली-रूप-रंग-गंध दिला. सुख घ्या. सुख द्या. रसिकपणे जगा. समर्थपणे जीवन जगा. तारुण्य-माणसाच्या जीवनातील वसंत ! तो फुलला तरच जीवन ! करंटेपणा करतात ती माणसं ! माणसाला चौकटीत बसवतात. पापपुण्याच्या भिंती रचल्या. पावित्र्य नावाचं फॅड उभारलं. माणसांनी अगदीच ढोरासारखं वागावं असं मला म्हणायचं नाही, पण निसर्गाचं खरं स्वरूप ओळखून प्रत्येक गोष्टीला आवश्यक तेवढे महत्त्व द्यावे. माणूस-रक्त-मांसाचा-विकारांचा पुतळा. अन् त्यात पावित्र्य ते काय शोधणार ? चारित्र्याचा संबंध जोडला जातो ते स्त्रीपुरुषांच्या लैंगिक जीवनाशी ! पावित्र्याचा संबंध येतो स्त्रीच्या शरीराशी ! एवढा संकुचित अर्थ आहे 'पावित्र्य' अन् चारित्र्य या शब्दांचा ?

शूर-वीर-पुरुष ! साऱ्यांचं लक्ष त्याच्यातल्या गुणाकडे. त्याची कामवृत्ती बेफाम असू शकते, अनेक स्त्रियांशी संबंध ठेवतो, याकडे लोक दुर्लक्ष करणार... अशा वादळी व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रिया पण असू शकतात. पण जग

त्यांना पापी म्हणणार. भ्रष्ट ठरविणार. स्त्रियांचा नियम वेगळा, पुरुषांचा वेगळा. वाऽरे न्याय !

माझ्या बाबतीत बोलायचं तर मी प्रामाणिकपणे कबूल करते. मी विवाहपूर्व दोन पुरुषांशी संबंध ठेवला होता. जेव्हा जेव्हा मला गरज वाटे तेव्हा तेव्हा... मला यात गैर वाटले नाही. पैसा अन् कीर्ती यांच्या मागं लागून विवाहाला मी क्षुल्लक मानलं ! पण माणसातला कामविकार (शक्ती) ही दुर्लक्ष करण्यासारखी बाब नव्हे ! छोटं वाटणारं इंजिन... (संपूर्ण आगगाडीच्या मानानं) साऱ्या अगडबंब गाडीला ओढतच नेतं ना ? तसं हे. स्त्रीला पुरुषाकडे अन् पुरुषाला स्त्रीकडे ओढत नेतं... ढकलतं. भूक लागल्यावर माणसानं जेवलंच पाहिजे. चहा ढोसून– पाणी पिऊन भूक मारण्यात अर्थ काय ? असं करणं शरीराला अपायकारकच! कामशक्ती भयानक शक्ती आहे ! ती विद्वानाला गाढव बनविते ! ही भूक न भागल्यास माणसं विकृत बनतात...

स्वैराचाराचं... मी समर्थन मुळीच करीत नाही. उद्देश हा, की माणसांनी निसर्गप्रवृत्ती ओळखाव्यात. स्त्री-पुरुषांनी हे जाणूनच विवाह करावा. म्हणजे विनाकारण 'पावित्र्याच्या' चिखलात फसून वैवाहिक आयुष्य बरबाद होणार नाही ! विवाह म्हणजे आयुष्यातील 'फार मोठी' तडजोड !... अर्थात, दोघांनीही एकमेकांशी एकनिष्ठ राहिलं पाहिजे !

मी श्यामकांतशी एकनिष्ठ राहिले. एकनिष्ठ राहणार होते. माझं जीवन मी त्याला वाहिलं होतं. तो माझ्या जीवनाचा एकमेव आधार होता.

मग त्यानं जहर का घ्यावं ? त्याला संशय यावा असं मी मुळीच वागले नाही. अन् त्याला माझ्या पूर्वायुष्याबद्दल काय माहीत ? अफवा ? ऐकिवच ना ? मग त्यात एवढं काय होतं की त्यानं आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न करावा ? मला विचारता. मारता. घटस्फोट घेता. मी हसत हसत त्याच्याजवळ गेले होते, तशीच दूर झाले असते. दुःख पचविलं असतं.

श्यामकांत ठाकूर... मराठवाड्यातील एका जहागिरदाराचा मुलगा. औरंगाबादला भेटला. 'रानी लक्ष्मी'च्या पहिल्या प्रयोगाचे वेळी... खरं म्हणजे हे सारं सांगावंसं वाटत नाही...सुखद आठवणी पण नकोत... ओझरतं का होईना... हे सांगितल्याशिवाय... माझ्या जीवनकथेची संगती कशी लागेल... प्रेक्षक म्हणून आला. माझ्या कामावर एवढा खूष झाला की, त्यानं व्यक्तिशः माझं हार घालून अभिनंदन केलं. ही सुरुवात... तो माझ्या रूपाला भुलला. पुण्याला माझ्याकडे येऊ लागला. मला लग्नाची मागणी घातली. मी सुरुवातीला नाकारली... कारण...

कारण मला तो आवडत नव्हता म्हणून नाही. मलाही त्याची भुरळ पडली... मला... पुरुषात वावरलेली... दोन पुरुषांशी संबंध ठेवलेली... अशा स्त्रीला एखादा पुरुष आवडतो म्हणजे तो असामान्य असला पाहिजे ! त्याला पाहिलं अन् मी माझे अस्तित्व विसरले, माझ्या जीवनाचा तो एकमेव आधार आहे असं मला वाटू लागलं. मुकेशबद्दल– श्रीकांतबद्दल मला असं कधी वाटलं नाही. ती एक तात्पुरती गरज होती...

मी श्यामकांतला नाकारलं, ते याचमुळं. मला माझ्या वागण्याचं काही वाटलं नाही, पण ते समाजाला मान्य होणारं नव्हतं. श्यामकांतला तरी ते कसं सहन होणार? त्याच्याशी लग्न करा... त्याच्या सुंदर जीवनात जहर कालवा... छे... छे... मला हे मंजूर नव्हतं. मला माझ्या जीवनाबरोबरच त्याचंही जीवन फुलवायचं होतं...

म्हणून मी नकार दिला. तर तो हटूनच बसला. मला आजही त्याचा खिन्न झालेला चेहरा आठवतो. आठवतात ते डोळ्यांतील अश्रू. स्वरातील ओलावा, "मिनी, खरंच मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही गं... असं माझ्यात काय कमी आहे की, ज्यामुळं तू मला नाकारतेस ?" किंचित हसत म्हणाला, "रंगारूपानं... शरीरानं... बरा आहे मी... एकदम काही व्राईट नाही. पैशाची पण कमतरता भासणार नाही..."

मी त्यावेळी संथपणे म्हणाले होते, "ठाकुर, खरंच तुम्ही मला आवडलात, पण... ठाकुर, मी आकाशातील लखलखणारी वीज आहे. आकाशातून तुफान वेगानं कोसळणाऱ्या गंगेला समर्थपणे आधार दिला शंकरानं... तसा मला समर्थ पुरुष हवा... माझं जीवन... नाटकात कामं करणारी मी... मी..."

मला पुढं त्यानं बोलूच दिलं नाही. जवळ घेत म्हणाला, "मिनी... मी तुला आवडलो ना '.. बस... बाकी काही सांगू नकोस... मी समर्थ आहे...' अन् मी विरघरळे !

आमचं लग्न झालं.

आम्ही काश्मीरला जवळ जवळ एक महिना घालविला. आमच्या आनंदाला सीमा नव्हती. शामकान्तच्या प्रत्येक कृतीतून उत्साह ओसंडत होता. मला कुठे ठेवू न् कुठे, नको असं त्याला झालं. मला फार जपत असे. माझं मन अनेक प्रकारची स्वप्ने रंगवू लागलं.

शामकान्तनं एक लाख रुपये खर्चून इथं एक प्रशस्त बंगला विकत घेतला. त्याचे वडील वारले होते. आईला अन् बहिणीला तो घेऊन आला. आमचं लग्न या दोघींना आवडलं नाही... पण... मी त्यांचं मन जिंकण्याचं ठरवलं. त्यांचे टोमणे सहन केले. बघता बघता लग्नानंतरचे दोन–अडीच महिने निघून गेले.

शर्मा चाचाजींबद्दल सांगितलं पाहिजे. माझ्या वडिलांचे सच्चे मित्र. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनीच आधार दिला. मदत केली. आमचे घराणे कलावंताचे. आई-वडील दोघंही कसलेले नट ! वडिलांच्या अभिनयकलेचा– आईच्या रूपाचा वारसा मजकडे आला होता. शर्मा चाचाजी स्वतः नाटकं लिहीत. दिग्दर्शित करीत. पैसा खर्च करीत. मी आतापर्यंत त्यांच्याच नाटकात काम केलं. त्यांनी 'रानी रूपमती' या नावाचं नाटक लिहिलं. मी त्यात काम करावं असा त्यांचा आग्रह. त्यांचं मन मोडवेना. फक्त चार-पाच प्रयोगांत मी भाग घेणार होते...

पाच–दहा दिवसांपासून मी बघते... शामकान्त उदास दिसू लागला. मन अस्वस्थ असावे.

मलाही त्याच्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. नाटकाच्या तालमी सुरू झाल्या...

शर्मा चाचाजी माझ्या विवाहाप्रीत्यर्थ पार्टी द्यायचं म्हणत होते. म्हणता म्हणता दोन–तीन महिने निघून गेले. अखेर तो दिवस उगवला...

माझ्या जीवनाची शोकांतिका झाली. जे घडू नये असं वाटत होतं, तेच घडलं,

तुझ्याशिवाय मी जगू शकत नाही,' असं म्हणणाऱ्या... जीवापाड प्रेम करणाऱ्या पतीनं– शामकान्तनं जहर खावं ? यापेक्षा आणखी दुर्दैव कुठले ?

मी त्या दिवशी रात्रभर खोलीत कोंडून घेतले. खूप रडले. अस्वस्थ मनानं रात्रभर खोलीत येरझारा घातल्या ! माझ्या वागण्याचा अन् त्याच्या जहर खाण्याचा संबंध जोडू लागले. उत्तर काही मिळेना...

सकाळीच मी त्याला भेटायला गेले. वाटलं होतं की, त्याला जवळ घ्यावे. मांडीवर डोकं घ्यावं. अश्रूंनी अभिषेक घालावा. कानाशी लागावं अन् विचारावं, 'राजा... तू असं का केलं ?...' लोकांच्या समोर असं वागून कसं चालेल ! काय हरकत आहे ? तो माझा पती आहे. नाटकात– खोट्या पतीच्या छातीवर डोकं ठेवलेलं चालतं.. लोकांना आमचं कृत्रिम जीवन पसंत... आमच्या भावनांची कदर लोकांना नाही, मग मीच का त्यांची बंधने पाळावी ?

मोठ्या आशेने मी दवाखान्यात गेले. तो शुद्धीवर आल्याचं बघून मला केवढा आनंद झाला– पण...

विपरित घडलं.

त्याच्या चेहऱ्यावर आठ्या पडल्या. चेहरा ताठर बनला. मला बघून त्यानं मान फिरवली...

माझ्या मागं मागं हिंडणाऱ्या माणसानं...

माझं मन दुखावलं. अपमान वाटला. पण मी त्याच्यावर प्रेम केलं ना... मला हे सारं सहन केलं पाहिजे. मी स्वतः बोलले. चौकशी केली. धड बोलले नाहीत.

सासूबाई जहर ओकल्या, 'नुकताच तो शुद्धीवर आलाय्... त्रास नको त्याला.'

'आई, मला का ते समजत नाही ? आपण त्यांच्या केवळ आई आहात. पण मी... दोन्हीही आहे. ते माझं जीवनसर्वस्व आहेत. माझाही जीव तिळतिळ तुटतो...'

'बरं बाई, बस त्याचा भेज्या खात...' असं म्हणून त्या तणतणतच खोलीबाहेर पडल्या.

'अहो... तुम्ही बोला ना माझ्याशी... कसं वाटतं ?'

तो काही बोलला नाही. मी पुन्हा काहीतरी विचारणार इतक्यात एक पोलीस इन्स्पेक्टर तिथं आला, 'मिसेस ठाकूर, आपली जबानी हवीय... प्लीज...' डोळ्यांतील अश्रू पुसत मी त्याच्यामागे गेले.

मला त्याच्यामागे गेलेच पाहिजे. माझ्या पतीनं जहर खाल्लं ना ?

डॉ. अडवाणी यांचे उपकार मी कसे विसरू ? चाचाजींचे ते मित्र. माझे चाहते. त्यांच्यासमोर ही केस येताच त्यांनी झटपट उपचार केले. त्यांचे प्राण वाचवीत असताना, आमची अब्रू वाचविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या खिशातील एक चिठ्ठी त्यांनी लपविली. कायद्याच्या दृष्टीनं गुन्हा होता तो. यांनी लिहिलं होतं, 'माझ्या मृत्यूस मीच कारण !' हे प्रकरण गुप्त ठेवण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला. पण... साऱ्या पुण्यात एकच बोंब... प्रसिद्ध नटी सौदामिनी हिच्या नवऱ्यानं जहर खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला !

पेपरवाल्यांनी माझ्या अब्रूच्या अक्षरशः चिंधड्या केल्या. शंकाकुशंकांचं मोहोळ उठलं. माझे अनेकांशी संबंध जोडले. मी कलाकार नव्हते, तर जनावर होते. एक वेश्या होते. वेश्येलाही अब्रू असते !

पोलिसांनी भंडावून सोडले. ते तर हात धुऊन माझ्या पाठी लागले. खटला भरला गेला... बरखास्त झाला. ह्यांनी सांगितले की, झोपेच्या गोळ्या मी नेहमी घेत असे. त्या दिवशी चुकून मी एक जास्त घेतली...' सत्य कोर्टापासून लपविता आलं.

दुसऱ्याच दिवशी संध्याकाळी त्यांना घरी आणलं. घरी आल्यावरही ते उदास राहू लागले. माझ्याशी कुणीच नीट बोलेना. नोकरचाकरसुद्धा तुसड्यासारखं वागू लागले. मी अगतिक तरी किती व्हावं ? मी दीन बनले. लाचार बनले. माझं मन सिंहिणीचं. ते अस्वस्थ बनलं. मी असा काय गुन्हा केला की, मी साऱ्यांचा तिरस्कार सहन करू.

हा कसला पती ? आपल्या पत्नीच्या अब्रूचे धिंडवडे काढणारा ! मी याच्यामुळेच फार बदनाम झाले. हा माझ्या आयुष्यातील एक भयंकर व्हीलन आहे. याला माझं शरीर हवं होतं. त्याला मिळालं. त्यानं मला रेप केलंय् ! शीः, नको अशा माणसाची संगत. मला त्याची शिसारी आली.

त्यांना घरी येऊन सात-आठ दिवस झाले. माझ्याकडे बघणं नाही, बोलणं नाही, या घरात माझी किंमत नाही, माझ्याबद्दल कुणाला आस्था नाही, तर इथं राहून काय उपयोग ?

माझं सांसारिक जीवन बरबाद झालंय... माझं...कलाकाराचं दुसरं–स्वतंत्र आयुष्य आहे ! माझं व्यक्तिमत्त्व...सौदामिनीसारखं...भन्नाट. तिला आकाशाचं प्रांगणही अपुरं पडतं. मी तरी का आता संसारात बांधून घ्यावं ? तिथं नाव मिळेल. पैसा मिळेल. मुखर्जींनी नाही तरी मला सिनेक्षेत्रात येण्याचं आमंत्रण दिलंय...

अन् तो घरी नाही, असं पाहून मी घर सोडलं. कुणी मला अडवलं नाही. निदान 'कुठं चाललीस ?' एवढं तरी कुणी विचारावं असं मला वाटलं. घराबाहेर पडणारं पाऊल कदाचित रुकलं असतं. या घरात मी प्रवेश केला होता त्या वेळीचा प्रसंग आठवला अन् डोळ्यांत टचकन पाणी आलं.

हॉटेल नटराजच्या रूम नं. १७ मध्ये मी माझं बिऱ्हाड थाटलं. आता मला घर कुठलं ? आईचं घर तर मी मागेच सोडलं ! आईनं किती आग्रह केला होता, पण मी नाही म्हटलं.

इथं एकच काम केलं मी. भरमसाट प्यायचं अन् खोलीत कोंडून घ्यायचं. खाणं-पिणं सारं विस्कळीत...या क्षुल्लक बाबी. घर कोसळल्यावर त्याच्या आढ्याची कोण काळजी करतो ?

घर सोडल्यानंतरची तिसरी रात्र. दहा वाजले असावेत. मी आपली झाल्या प्रकाराचा विचार करीत अन् दारूचे घुटके घेत बसले होते. कोण काय काय करीत असेल, चाचाजी हैराण झाले असतील, आई रडत असेल. मला तिच्याकडे एकदा तरी गेलंच पाहिजे. ती मला पुन्हा श्यामकांतकडे जायला सांगेल. हे मला आवडणारं नव्हतं. मी घर सोडले ते कायमचं. पुन्हा त्याच्याकडे जायचं नाही हे ठरवून.

दारावरची बेल वाजली. किर्रऽऽ

'कोण मेलं कडमडलं यावेळी. गेल्या तीन दिवसांत कुणी आलं नाही बघायला–मी मेले की...' मी पुटपुटले. बेल पुन्हा पुन्हा वाजू लागली. आता मात्र दार उघडलंच पाहिजे. मी उठले. तोल जात होता.

माझ्या मनानं एका सेकंदात अनेक रंग बदलले. आश्चर्य...आनंद...शेवटी विषाद... तिरस्कार.

दारात श्यामकांत उभा होता. मला आवडणाऱ्या वेशात. हसरा...पूर्वीचा. पण हे दृश्य मला कसं स्वप्नवत वाटू लागलं. माझ्या मनात सध्या जी मूर्ती कोरली गेलीय् ती ही नव्हे...मी या श्यामला विसरले. मला आठवतो श्याम...मला बघून ज्याच्या कपाळावर आठयांचं जाळं पसरलं, ज्याच्या डोळ्यांतून तिरस्कार ओसंडत आहे. खळाळून हसणाऱ्या...सदैव बडबड करणाऱ्या निरागस डोळ्यांच्या श्यामला मी विसरले...हा नवीन वाटतोय...घरी येऊन माझ्या संगतीत सात–आठ दिवस राहून न बोलणारा घुमा श्याम...

'आपणास कोण हवंय ?'

'मला...?'

'हं...आपला परिचय ?' मी अगदीच कोरडेपणानं विचारलं. त्याला आश्चर्य वाटलं. त्याचे खेळकर डोळे चमकले. तो स्मित करीत म्हणाला, 'माझा परिचय हवा तुला ?'

'होय !'

'मी तुझा श्याम !'

'माझा श्याम ? नवीनच ऐकतेय मी ! माझा कुणी श्याम नव्हता, ना मी कुणाची राधा ! मी...एक नटी...बाजारबसवी...'

'क–क–काय बोलतेस तू ?'

'बरोबर बोलल्ये मी...कृपया आपण निघून जावं...'

'मीना, तू शुद्धीवर आहेस ना ?'

'मला मीना म्हणू नका. मी आहे सौदामिनीदेवी. प्रसिद्ध नटी...मी शुद्धीवर आहे. एकदाच मी देहभान विसरले होते. गाढवपणा झाला. तुम्हाला बघून मी बेहोश–धुंद व्हावं असं आता काय राहिलंय् तुमच्यात ?'

'अगं...असं काय बोलतेस...' म्हणत तो आत आला.

'माफ करा. हा कसला सभ्यपणा ? लाज–शरम ? कुणाच्याही घरात परवानगी न घेता शिरता !'

'कुणाच्या घरात शिरतोय मी ? माझ्याच घरात...'

'तुमचं घर ? कुठाय तुमचं घर ?'

'जियं तू, ते माझं घर !'

'माफ करा. मी आता आपली कुणीच नाही. कुणा एकाची मी पत्नी झाले, जीवनाचा सत्यानाश झाला. आपलं नातं संपलं. त्याच क्षणी...तुम्ही जहर घेतलं त्या क्षणी...मी...मराठी नाटयक्षेत्रातील एक ख्यातनाम नटी, रूपयौवनसंपन्न–लक्षाधीश. मी तुमच्या पायाची दासी बनले. तुम्ही एक शब्द बोलावं म्हणून धडपडले–तुमच्या प्रेमाच्या एका शब्दासाठी...एका शब्दाची भीक नाही घातली. नुसता तिरस्कार वाटयाला आला. का म्हणून ? मी जहर दिलं होतं ? की घ्या म्हटलं होतं ? तुमच्यामुळं सारा कलाकारवर्ग बदनाम झाला.

'माझ्या स्वप्नातला राजकुमार...शामकांत ठाकूर कसा धीरोदात्त होता. माझ्या जीवनाचा तो एकमेव आधार होता. माझं ते विश्रांतिस्थान ! माझ्या साऱ्या गुणादुर्गुणांसह मला जवळ करणारा. माझ्या जीवनरूपी फुलांवरील कीड हळुवार हातानं दूर करणारा. मी एका वाघाशी लग्न केलं होतं, मुळूमुळू रडणाऱ्या बायल्याशी नव्हे ! मी काय चूक वागले, म्हणून तुम्ही जहर घ्यावं. राग आला होता, दोन थोबाडीत मारायच्या होत्या. आणखी राग आला होता. मला सांगायचं, तुमची ती शिकार करायची बंदूक आहे ना, तिच्यासमोर उभी राहिले असते. पण...तुम्ही खरंच शत्रू असता अन् रेप केलं असतं तरी मला फारसं वाईट वाटलं नसतं. कारण तो शत्रूच. तुम्हाला काय म्हणू ? पतीनं पत्नीवर बलात्कार...तुम्ही केवळ एकांतात माझे कपडे उतरविले नाही तर... समाजासमोर तस्संच उभं केलं मला.' मी फाडफाड बोलत होते.

तो नुसतं ऐकत होता. ऐकणार नाही तर काय करील ? त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलू लागले. तो जसजसा दीन बनू लागला, तसा मला आनंद वाटू लागला.

'माझ्या स्वप्नांचा चुराडा झाला. पतीमुळं मी बदनाम झाले. माझ्यासारखी दुर्दैवी स्त्री मीच आहे !'

त्याच्या डोळ्यांत अश्रू जमा झाले. आभाळ केव्हा कोसळेल याचा नेम नव्हता. त्यानं खिशातून रुमाल काढून डोळ्यांना लावला.

'नाही. मी फसणार नाही आता. मिस्टर ठाकूर, तुमच्या अशा अश्रूंना मी एकदा फसले...मी जहर दिलं होतं तुम्हाला ? नव्हे...मीच जहर होते तुमची. तेव्हा... जहर पचविण्याची ताकद तुमच्यात नाही. कुठल्याच पुरुषांत नाही. ते काम स्त्रियांचं. या जगात कोण जास्त छळलं गेलं असेल, त्या स्त्रियाच...तुम्ही घेतलेलं जहर मला पचवावं लागलं. मला तुमचे अश्रू दिसत नाहीत. पूर्वीचा शामकांत ठाकूरही आठवत नाही. मला आठवतो तो ठाकूर, की ज्याला मी सकाळी सकाळी भेटायला गेले. माझ्या डोळ्याला डोळा लागला नव्हता रात्रभर. दवाखान्यात सासूबाई थांबू देईनात. तुम्हाला काय वाटले, घरी मी सुखाची झोप घेत होते ? माझ्याकडे पाठ फिरविणारा ठाकूर मी विसरू शकत नाही. वर्तमानपत्रांच्या ओळीच्या ओळी नजरेसमोर येतात. मला आठवतात ते लोकांचे टोमणे–घाण बोलणी. चाचाजींशी लोकांनी संबंध जोडले. मी फक्त लोकांना दिसले ती मादी म्हणून...मला काही नाती वगैरे जणू नाहीतच. जाऊ द्या. आपण चालू लागावं.'

त्यानं अश्रू पुसले. 'मीना, मला माफ करणार नाही का ? मी जीवावरच्या संकटातून वाचलो. आनंद होत नाही तुला ?

'तुमच्या वाचण्यामुळं माझ्याएवढा आनंद कुणाला झाला असेल ?'

'मला असं वाटतं की, तू मला बघून आनंदानं माझ्याकडे धाव घेशील.'

'माझा आनंद तुम्हाला त्या दिवशी का नाही दिसला ? मीच वेडी. धावत धावत आले.' हे वाक्य तोंडून येताच मी चटकन् त्या दिवसाच्या मनःस्थितीत गेले. दुःखाचा उमाळा आला. पण भावनांचा कढ तसाच दाबला. आवंढा गिळला. त्याच्याकडे पाठ फिरविली. डोळ्यांतील अश्रू पुसले. माझा आवाज किंचित घोगरा झाला होता, 'आपण वाचलात. दैवाची कृपा. त्यामुळेच ही मीना...जिवंत राहिली....जे घडतं ते भल्यासाठी...'

'मीना, अगं चुकलं माझं. विसर ते सारं.'

'विसरू म्हणता ? कसं विसरू ? कितीही दारू ढोसली तरी विसरू शकत नाही मी...'

'आपण दोघं एकमेकांना माफ करू या !'

'एकमेकांना ? मला कसली माफी देता ? माझं काय चुकलं ?' मी त्याच्याकडे रोखून बघत विचारले. तो घुटमळला. 'सांगा ना ? मी स्वैर वागले ? पळून गेले...?'

'...........'

'तुम्ही न सांगता मी हळूहळू माझे नाटयक्षेत्रातले जीवन संपवणार होते. तुमच्या परवानगीनेचच मी तालमीला चालले होते... मला सांगाच तुम्ही, जहर का घेतलं ते. कुठली चिंता तुम्हाला जाळत होती ?' मी त्याच्याकडे पाहिलं. तो काहीच बोलेना. मीच पुढं बोलले, 'तुम्हाला माझा संशय आला ?'

त्यांनी मान हलविली.

'का संशय आला ? मी लग्नापूर्वीच एक-दोन वेळेला सावध केलं होतं. महाशय, जीवन जबाबदारीनं जगायचं असतं, नादान-

पणा कामाचा नाही. दुकानातला माल पारखून घ्यायचा असतो. नंतर दुकानदाराला दोष द्यायचा नसतो. मी तुमच्याशी आयुष्याचा सौदा केला होता. तो असा एक-दोन महिन्यांत मोडण्यासाठी नाही. तुम्ही स्वतःचा स्वभाव न ओळखताच न पेलणारं ओझं उचललंत...'

'हे पुन्हा पुन्हा बोलून काय उपयोग ?' त्याची अजीजी.

'काही उपयोग नाही !.. तुमच्या शरीरातील विष कदाचित बाहेर पडलंही असेल, पण माझ्या मनात रुजलेल्या विषवृक्षाचं काय ? तुम्हाला जर सीतासावित्री हवी होती तर कशाला कडमडलात इकडे... तिकडेच बघायची एखादी घरकोंबडी... कुरूप !...माणसानं ज्योतीच्या प्रकाशाचा विचार करावा. दिव्याखालच्या अंधाराचा कोणी विचार करीत नाही. तसा तुम्ही माझ्या पूर्वायुष्याचा विचार करायचा नव्हता. तुम्ही पारखायची असती तुमच्याविषयीची निष्ठा. झालं गेलं गंगेला मिळालं. त्याचा कशाला विचार केला.. तुम्हाला त्या वेळी म्हणाले होते, मी आहे आकाशातील वीज. दैदिप्यमान—लखलखणारी—उग्र—दाहक. वीज जिथे पडते तिथं खडकाचंही पाणी बनेल. घरं जळतात. ती वीज—गतिमान—चंचल असते. तशी मी. मला समर्थ पुरुष हवा आहे...तुम्ही फक्त बोलके शंख निघालात... तुम्ही नाही विचारलंत तरी मी सांगते. विवाहापूर्वी माझे दोन पुरुषांशी संबंध होते...'

'मीना ऽऽ'

'नाही ऐकवंत ? राहिलं. विवाहापूर्वी तुम्ही काय काय केलं हे मी कधी विचारलं ? विचारणारही नाही. पण मला असं कधी वाटलं नाही की, 'मी फसवले गेले.''

'मीना, बस कर हे सारं. प्लीज. पाया पडू का ? चुकलो. कान धरू ? पण घरी चल...'

'ते कदापिही शक्य नाही. ब्रह्मदेव खाली आला तरी. ज्याला स्वतःच्या बायकोचं यश पचत नाही, त्याची मी बाईल बनू ? त्याच्या ताटाखालचं मांजर बनू ? की त्याच्या उपकाराखाली सदैव पिचत राहू ? शक्य नाही. तुम्ही जहागिरदार असलात, लक्षाधीश असला तरी या पुण्याला त्याचं काय होय ? ते तुम्हाला माझ्यामुळं ओळखते. हीच गोष्ट साऱ्या महाराष्ट्रभर घडू शकेल. जिथं जावं तिथं माझा मान... पत्रकार माझ्यासमोर— फोटोग्राफर माझ्यासमोर... जो तो मला बोलायला धडपडणार... तुम्ही उपेक्षिले गेलात. लोकांनी तुमची उपेक्षा केली, मी नव्हे. उलट मी अभिमानाने तुमची ओळख करून देत होते. तुम्हाला हे अपमानास्पद वाटू लागलं. नंतर नंतर तुम्ही माझ्याबरोबर येणं टाळू लागलात, होय ना ?'

त्यानं होकारार्थी मान हलविली, "असं काही घडणार याची तुम्ही कल्पनाच केलेली नव्हती. म्हणून तुम्हाला अस्मान कोसळले असे वाटले. ह्या साऱ्या गोष्टी घडणारच होत्या. त्या मला थांबविणं शक्य नव्हतं. आता बघा, पतंग... पतंग व दोरा ! दोऱ्याशिवाय पतंग उंच उंच उडू शकणार नाही. दोन्हीही एकमेकाला पूरक. पण लोकांचं लक्ष पतंगावरच खिळतं. पतिपत्नीचं असंच. यातील पतंग कोण, दोरा कोण हे ज्याचं त्याचं भाग्य अन् सामर्थ्य. पतंगासारखा आकाशात संचार करणारा पुरुष असू शकतो. त्याचा हेवा... द्वेष पत्नीनं करायचा नसतो. एखादवेळी ते भाग्य पत्नीला लाभलं तर... पतीनं काय म्हणून तिचा द्वेष करावा ? स्वतःचा अपमान समजावा ! दोऱ्याची उपेक्षा...अपमान पतंगालासुद्धा करता येणार नाही. कळसाला पायाचा विसर पडू नये, तसंच प्रसिद्धीच्या प्रकाशात असणाऱ्यानं आपल्या जीवनसाथीला विसरू नये. दुखवू नये. मी माझं कर्तव्य केलं. माझा जीवनसाथी कच्चा खेळाडू निघाला. नादान निघाला..."

'मीना ऽऽऽ माझी मीना...माफ कर... विसर...' तो पुटपुटला अन् एकदम मला येऊन बिलगला. मी किंचित गडबडले. त्याच्या आलिंगनात गुदमरले. मला ते आवडलं नाही. मी पूर्ण शक्तीनिशी त्याला दूर केले. तो माझ्या नजरेतून उतरला होता. आमचे दोघांचे जीवनप्रवाह वेगळे व्हायला हवेत.

'महाशय, माझ्या शरीराला स्पर्श करण्याची किंमत काय आहे, माहीत आहे ?' तो गोंधळून माझ्याकडे बघू लागला. 'एका रात्रीचे दीडशे रुपये. एका वेळेचे पन्नास.'

'मीना ऽऽ'

'अहं, सौदामिनीदेवी !'

'उगीच बकू नकोस.'

'मी बकत नाही. तुमच्याशी संसार केल्याचं हे फळ आहे. मी नवीन जीवन जगणार आहे. या नवीन जीवनाची सुरवातदेखील तुमच्यापासूनच करत्ये... या... कमी पैसे द्या.'

'एऽऽऽ' त्याला राग येत चालला असावा.

मी कपडे उतरवू लागले, 'काय करत्येस?' त्यानं विचारलं.

'या शरीरानंच मोह घातला होता न् तुम्हाला ? बघून घ्या शेवटचं. उपभोगून घ्या... तुम्हाला चांगलं वाटलं, जवळ केलं. भ्रष्ट वाटलं... दूर लोटलं... तुम्ही किंमत केली ती माझ्या शरीराची, प्रेमाची नव्हे, त्यागाची नव्हे ! या...'

'निर्लज्ज रसाली ऽऽ' म्हणत त्यानं एक थप्पड ठेवून दिली. मी कोलमडून खुर्चीवर पडले. तो मला सावरायला आला. मी त्याला दूर लोटले.

'काही जरूरत नाही. मी खंबीर आहे स्वतःला सावरायला. तुम्ही केलेल्या वज्राघातातून मी सावरलेच की ! अन्याय तुम्हीच करणार न् तुम्ही मारणार. व्वा ऽऽ न्याय ! तुम्हाला काय वाटलं, की मी खरंच तुमच्यासमोर... त्या लायकीचे तुम्ही नाही. सौदामिनी आत्मसमर्पण करू शकते, बलात्कार सहन नाही करू शकत. तुमच्याकडे राहणं याचा अर्थ तुमचा बलात्कार सहन करणं.'

'मिनी... मी शपथ घेतो...'

'चला हो, मोठे आलेत शपथा घेणारे. मी तुमच्याबरोबर राहू शकत नाही. माझी वाट वेगळी... तुमची वाट वेगळी... चला...'

'नाही. तू आल्याशिवाय मी जाणार नाही !' तो ठामपणे म्हणाला.

'तमाशा करणार आहात का ? सूज्ञ असलात तर चालू लागा. स्वतःच्या आवडीची— लायकीची मुलगी बघा. सुखानं राहा..'

'मिनी...'

काही उपयोग नाही. प्लीज... गेट आऊट...'

'मी जाणार नाही. अस्सा इथं बसून राहणार..' तो खुर्चीवर बसला.

'मग राहा तर बसून. मी चालल्येय्...'

'अगं ऽऽ ए... तू राहा, मी जातो...' तो म्हणत राहिला. मी मात्र झपाटल्यासारखं त्या खोलीच्या बाहेर पडले. समोरून एक टॅक्सी जात होती. मी थांबविली. आत बसले. टॅक्सी-चालकानं विचारलं, 'कुठं ?' मी पुटपुटले 'कुठंही...' त्यानं चमत्कारिकपणे माझ्याकडे पाहिलं. टॅक्सी सुरू झाली. कुठं ?...?...? □

# अशी चौकशी, अशी फाशी ! : पृष्ठ १२ वरून

१९५६ ला त्याला हृद्‌विकाराचा दुसरा झटका आला.

६ मार्च १९५३ ला स्टॅलिन वारलो व त्याच्या जागी क्रुश्चेवची नियुक्ती झाली. स्टॅलिनसारखा क्रूर राजकारणी पुरुष गेल्यानंतर रशियाचे राजकारण बदलेल असे अमेरिकेला वाटत होते, पण त्यात काहीच अर्थ नव्हता. १२ ऑगस्ट १९५३ ला रशियाने हायड्रोजन बॉम्बचा पहिला स्फोट करून जगाच्या राजकारणाला हादरा दिला. स्टॅलिन ख्रिस्तवासी झाल्यानंतर लगेच ४ महिन्यांतच क्रुश्चेव्ह हे जगाच्या निदर्शनाला आणील असे कोणालाच वाटले नाही. ह्यापूर्वी १–११–१९५२ ला अमेरिकेने पहिला हायड्रोजन बॉम्बचा स्फोट नेव्हाडाच्या वाळवंटात करून जगाला थक्क करून सोडले होते. तेव्हापासूनच लवकरात लवकर आपणही बॉम्बस्फोट करवावा ही स्टॅलिनची इच्छा होती, परंतु ते त्याच्या हयातीत त्याला जमले नाही.

फ्रान्सने यावेळी इंडोचायनामध्ये मार खाल्ला होता व कम्युनिस्ट राजवटीने इंडोचायनाचे दोन तुकडे पाडले होते व पुढील व्हिएटनाम युद्धाची चुणूक दाखविण्यास सुरुवात केली होती. १९५३ सालात बाहेरील १९ देशांना भेटी देऊन आल्यानंतर नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलच्या बैठकीत अहवाल देताना निक्सनने स्पष्टच सांगितले की, इंडोचायना कम्युनिस्टांच्या घशात उतरला की नंतर लाओस, कंम्बोडिया, मलाया, थायलंड आणि त्यानंतर उरलासुरला आग्नेय आशियातील भाग रशियन राजनीतीला बळी पडणारच व जपानवर आर्थिक संकट कोसळणार. त्याला तोडगा म्हणून (NATO) नाटोची संघटना उभारली गेली. हिंदुस्थानविषयी बोलताना निक्सन स्पष्टच म्हणाला :

'India's neutralism was an outgrowth of Nehru's mistakes belief that India could be a dominant force only if the rest of the non-communist Asia were weak and unarmed.'

[आशियामधील साम्यवादी नसलेले देश जर दुबळे व कमताकद राहिले तरच हिंदुस्थानचे वर्चस्व वाढेल, या नेहरूंचा चुकीच्या विचारप्रवाहाचे दृश्यफळ म्हणजे त्यांचा अलिप्ततावाद होय.]

राजनैतिक दृष्टचा परकोटीचा अलिप्तपणा हा दोषच ठरेल, हे निःसंशय ! जर १९५० किंवा त्याहीपुढे आयसेनहॉवर निवडून आल्यानंतर पंतप्रधान नेहरू यांनी अलिप्तपणाचे धोरण न अवलंबिता लोकशाहीतत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्याच्या बरोबरच मैत्रीचे करार केले असते तर अमेरिकेची उत्तम आधुनिक शस्त्रसामग्री हिंदुस्थानच्या घरात येऊन पडली असती, चीनला तोंड येणे सुसह्य गेले असते, पाकिस्तानशी लढाया कराव्या लागल्या नसत्या व शक्य तर काश्मीरचा, पाकिस्तानकडे गेलेला अर्धा भाग, परत जिंकता आला असता. अमेरिकेला आशिया खंडात कोणते तरी असे राष्ट्र पाहिजेच होते की, ज्या ठिकाणी युद्धसामान मोठ्या प्रमाणावर साठविले जाईल. तेव्हा साहजिकच, इच्छा नसताना देखील, अमेरिकेस पाकिस्तानला हाताशी धरावे लागले. १९५४ पासून व्हिएटनाम युद्ध चालूच होते. अरबराष्ट्रे इस्रायलशी युद्धे करीत होती. अशावेळी हिंदुस्थान सरकारने आपण शस्त्रसज्ज होण्याचा अधिकात अधिक प्रयत्न करावयास पाहिजे. उलटपक्षी असेही दिसते की, १९५३ ते १९६० ह्या दरम्यान आयसेनहॉवरला व १९६८ नंतर निक्सनला हिंदुस्थान सरकारचे मत आपल्या बाजूस वळवून घेणे हे जमलेच नसावे. १९७२ नंतर हिंदुस्थानातील परिस्थिती संपूर्ण बदलून गेली. रशियन मार्क्सवादी हिंदुस्थानात पेरले गेले. सरकार–दरबारात घुसले, त्यांच्यावरील बंधने शिथिल झाली. हिंदुस्थान देश आता तर जगातल्या कोणत्याही देशाकडून त्याची राजकीय मते व संभाव्य धोके मनात न घेता, मन मानेल ती मदत घेत आहे.

१९५३ पासून १९७३ पर्यंत इंडोचायना, लाओस, कंबोडिया, मलाया, थायलंड, व्हिएटनाम ह्या देशांतून मार्क्सवाद रशियाने पेरला व ही राष्ट्रे आपल्या पंखाखाली आणली. ह्यालाच रशिया 'Collective Leadership'–सामुदायिक नेतृत्व–असे म्हणतो !

इकडे खुद्द अमेरिकेत यावेळीच सिनेटर जोसेफ मॅकॉर्थी हा रिपब्लिकन पक्षातील एक पुढारी केवळ तो कम्युनिस्ट–विरोधी मताचा होता, म्हणूनच पुढे सरकला. हजरजबाबी, उद्दाम, अगडबंब भाषणे करण्याची हौस, कम्युनिस्टांचा कट्टा शत्रू असा हा मॅकॉर्थी पुढे MACARTHISM ह्या मतप्रणालीनेच ओळखला जाऊ लागला. आयसेनहॉवरविषयी त्याच्या मनात दुःश्वास पण निक्सनविषयी मात्र प्रेम आणि विलक्षण जिव्हाळा– अशी ही वल्ली होती. अल्जर हिस प्रकरणापासून निक्सन कम्युनिस्टविरोधी होता, हे मॅकॉर्थीला माहीत होते व त्यामुळेच, जरी दोघांचे स्वभाव भिन्न होते तरी, एकमेकांचे सरळ सूत होते. १२ डिसेंबर १९५२ ला सलग्रेव्ह क्लबमध्ये खाना होता. तिथे मॅकॉर्थी, निक्सन, पिअरसन, चार्लस बॅनेट व अन्य राजकीय पुढारी व वर्तमानपत्रांमधील स्तंभलेखक जमा झालेले होते. त्यावेळी मॅकॉर्थी व पिअरसन ह्या दोघांची अगदी किरकोळ कारणावरून एवढी जुंपली की, काही विचारण्याची सोय नाही. दोघात चिक्कार मारामारी झाली. निक्सनने दोघांनाही सोडवले नाही तर मॅकॉर्थीने पिअरसनला जिवे मारले असते.

आयसेनहॉवरला मॅकॉर्थी नको होता. स्वतः रिपब्लिकन असूनदेखील पक्षाविरुद्ध सिनेटमध्ये त्याची एकसारखी झोड चालू असे. ही विचित्र वल्ली पुढे १९५६ च्या मध्याला ख्रिस्तवासी झाली व त्याचा मॅकॉर्थीझम तेवढा इतिहासात नमूद होऊन राहिला.

६ मार्च १९५३ ला स्टॅलिनचा मृत्यू झाला आणि रशियामध्ये क्रुश्चेव्हची राजवट आली. त्यावेळी हे 'Collective leadership' चे नवे राजकीय तत्त्व रशियातून बाहेर पडले. ह्याचा सरळ अर्थ एकच की, रशियाचे सार्वभौमत्व व ज्या ज्या देशांना त्यांनी पैशाची व युद्धसाहित्याची मदत देऊन लोकशाहीविरुद्ध झुंजविले ते ते देश मांडलीक! मात्र म्हणताना म्हणावयाचे असे की, ह्याच्या मुळाशी खरे तत्त्व आहे सामुदायिक नेतृत्व !

"अमेरिका ही जात्याच व मूलतःच वसाहतवादाविरुद्ध आहे. वसाहतवाद व साम्यवाद ह्यांच्यात कोणत्याच दृष्टीने तुलना करता येत नाही. "सामुदायिक नेतृत्व" हे पूर्वीच्या स्टॅलिनच्या अमानुष,

पाशवी व क्रूर तत्त्वांपेक्षा देखील भयंकर भयाण असे तत्त्व आहे ! क्रुश्चेव्ह काय, मोलोटोव्ह काय किंवा स्टॅलिन काय– सर्वांचे डावपेच व क्लृप्त्या व ध्येय एकच– फरक फक्त रस्ता चोखाळण्यामध्ये– सर्वांना अमेरिकेचा संपूर्ण नाश अभिप्रेत आहे."

१९५५ सालापासून रिपब्लिकन पक्ष फारच दुर्बल झालेला होता. पक्ष-मजबुतीसाठी म्हणून अमेरिकेत चांगलाच अध्यक्ष निवडला गेला पाहिजे, असा विचार सर्वत्र दिसून आला. कॅरेबियन देशातील दौरा आटोपून आल्यानंतर निक्सन व त्याचे रिपब्लिकन सहकारी नेते ह्यांनी जाहीर करून टाकले की, आयसेनहॉवर १९५६ च्या निवडणुकीला पुनः उभा राहाणार आहे.

तिकडे अरब-इस्रायल युद्ध पेटण्याच्या मार्गावर होते व किसिंजर हा स्वतः ज्यू असल्यामुळे त्याला व्हिएटनाम युद्धापेक्षा इस्रायल-युद्धाची अधिक आपुलकी–जवळीक होती. १९५६ मध्ये रशियाने अरब राष्ट्रांतून युद्धसामग्री पेरून ठेवलेली होती. सर्व सामर्थ्यानिशी अरब राष्ट्रांच्या विरुद्ध इस्रायलला सर्व प्रकारची मदत करावी लागणार, हे आता निश्चितच झाले होते. अमेरिकेतील धनाढ्य ज्यू लोकांचा डेमोक्रॅटिक पक्षाशी घरोबा होता व रिपब्लिकन निक्सन आयत्या वेळी काय करील ह्यावर ज्यू लोकांचा विश्वास नव्हता. निक्सनने मध्य-पूर्व भागातील प्रकरणाचा पूर्ण अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी– रोजर्स व सिस्को ह्यांना धाडून दिले. जाऊन आल्यावर त्यांनी आपली योजना, अहवालाला सोडून, आयसेनहॉवरपुढे टाकली. इजिप्तला इस्रायलबरोबर समेट करावयास भाग पाडावयाचे असेल व दोघात संघर्ष टाळावयाचा असेल तर सुएझ कॅनॉल वापरण्याची इस्रायलला परवानगी देववणे व टिरेन सामुद्रधुनीतून जहाज-वाहतूक करण्याची सवलत देणे–ह्या महत्त्वाच्या दोन गोष्टींची कबुली इजिप्तकडून मिळाली तरच हे काम जमणार आहे. एरव्ही नाही. त्या दोघांनी अहवालात पुढे म्हटले होते की, जर ही योजना मान्य झाली व संघर्ष टळला तरच पुढे-मागे अरब राष्ट्रे अमेरिकेकडे मदतीची याचना करतील. आणि तसे झाले नाही तर अरब राष्ट्रांवरील रशियाची पकड घट्टच होत राहाणार व अमेरिकेला एकसारखा त्या भागात पैसा ओतत राहावा लागणार.

रशियाचा अमेरिकेतील वकील डोब्रिनिन ह्याला देखील रॉजर्स भेटून आला; पण त्याचा प्रयत्न निष्फळ ठरला.

१९५६ मध्ये अमेरिकेच्या राष्ट्रपतीची निवडणूक होण्याची वेळ येऊन ठेपली. आयसेनहॉवरनी आपण त्या पदासाठी फिरून उभे राहाणार आहोत, हे २०।२।१९५६ ला जाहीर केले; पण ते करताना उपराष्ट्रपतिपद कोणाला द्यावयाचे हे जाहीर न करता गुलदस्तातच ठेवले. निक्सन नाराज झाला.

स्टॅसेन ह्याने, निक्सनविरुद्ध चळवळ उभारली त्याचे नाव "निक्सनला कचऱ्यात फेका– उपराष्ट्रपतिपदासाठी उभे करू नका." [DUMP NIXON MOVEMENT] प्रचार उघडपणे सुरू झाला.

वास्तविक हॅरॉल्ड स्टॅसेन हा आयसेनहॉवरच्या अनेक सल्लागारांपैकी एक होता. त्याने ही चळवळ उभारण्यापूर्वी आयसेनहॉवरची परवानगी घ्यावयास पाहिजे होती, सल्ला विचारावयास पाहिजे होता, तें त्याने काहीच केलेलं नव्हतं. आयसेनहॉवरने एवढं ताडलं की, काही जबाबदार रिपब्लिकन्स व्यक्ती निक्सनच्या विरुद्ध असल्या पाहिजेत व त्यांचे मत अजमावल्याखेरीज निक्सनचे नाव जाहीर करण्याची घाई करू नये. ते काम ऑगस्टमध्ये भरणाऱ्या रिपब्लिकन्सच्या मेळाव्यात जबाबदार व्यक्तींच्यावर सोपविलेले उत्तम. मार्च महिन्याच्या अखेरीस आयसेनहॉवरने निक्सनला बोलावून घेतले. त्याच्या नजरेला सर्व हकीकत आणून तो म्हणाला की त्याची स्वतःची काहीच हरकत नाहीं, परंतु त्या पदी उभे राहाण्यापेक्षा मंत्रिमंडळातील जबाबदारीची एखादी जागा त्याने स्वीकारावी म्हणजे त्याला अधिक अनुभव मिळेल व कार्यपद्धती ध्यानात येईल. इतके असूनही आयसेनहॉवरनी त्याला सांगितले की, त्याने स्वतःच काय ते ठरवावे. राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत मंत्रिमंडळ व इतर कौन्सिलसच्या बैठकांना, निक्सन उपराष्ट्रपती या नात्याने अध्यक्ष राहात होता. ह्यापुढे केवळ सभासद म्हणून काम करणे त्याला रुचेना. त्याच्या नातेवाइकांनी व स्नेह्यांनी त्याला ही अपमानास्पद गोष्ट आहे व कबूल करू नये असा सल्ला दिला.

निक्सनने उपराष्ट्रपतिपदाच्याच निवडणुकीसाठी उभे राहाणे आपल्याला आवडेल असे आयसेनहॉवरला भेटून कळविले.

मध्यंतरीच्या काळात आयसेनहॉवरनी आपल्या सल्लागारांचा सल्ला घेतला व निक्सनला उमेदवार म्हणून निवडण्यास हरकत नसल्याचे त्यांच्याही बोलण्यात आले.

नाव नक्की झालं. घोषणा पण झाली.

आयसेनहॉवर व निक्सन ही जोडगोळी राष्ट्रपती व उपराष्ट्रपती ह्या पदी उभे राहाण्यासाठी निवडली गेली.

शिकागो येथे १३ ऑगस्ट १९५६ ला डेमोक्रॅटिक पक्षाचा मेळावा भरला व ८ दिवसांनंतर त्याच ठिकाणी २० ऑगस्टला रिपब्लिकन पक्षाचा मेळावा भरला. रिपब्लिकन पक्षातर्फे आयसेनहॉवर व निक्सन ह्यांनाच पुनः उभे करावे असे ठरले.

नोव्हेंबर १९५६ ला निवडणुका झाल्या व दोघेही निवडून आले. दोघांचीही राष्ट्रपती व उपराष्ट्रपती म्हणून दुसऱ्यांदा कारकीर्द सुरू झाली.

[ क्रमशः ]

पुस्तके

# रोबो

लता भिसे

प्रत्येक सुसंस्कृत समाज अनेक पोलादी चिलखतं घालून स्वतःला जपत असतो. सामाजिक नीतिनियम, कायदेकानू हे व्यक्तीचा सामाजिक व्यवहार सुरळीत आणि सुरक्षित व्हावा म्हणून काम करतात. ह्या नीतिनियम आणि कायदेकानूद्वारा समाजाला अंतर्गत संरक्षण मिळत असते. सैन्य नावाचं पोलादी चिलखतही प्रत्येक राष्ट्र सांभाळून असतं. त्या द्वारा त्या त्या समाजाला बाह्य संरक्षणाची हमी मिळत असते, हमी दिली जात असते.

कोणत्याही सैन्यातला सैनिक, 'सैनिक' हा शिक्का घेऊन जन्माला येत नाही. सैनिक घडवला जातो. व्यक्तीच्या सामाजीकरणाची जशी प्रक्रिया असते तशीच जो कोण माणूस सैनिक होतो त्याच्या सैनिकीकरणाची एक प्रक्रियाच असते. या प्रक्रियेतून मानवाचे रक्षण करण्यासाठी मानवामधूनच सैनिक घडवले जातात. कौटुंबिक जीवन व सामाजिक जीवनापासून सैनिक दूर राहातो. शिस्त आणि नियमांनी बद्ध असलेलं जीवन सैनिक जगतो. सैनिकाचं माणूसपण, त्याच्या मानवी भावना त्याला सैनिक म्हणून घडवला जात असताना चिरडल्या जातात. सैनिक फक्त यंत्र बनतो. एका बिनचेहऱ्याच्या अवाढव्य यंत्राचा एक बिनचेहऱ्याचा पार्ट म्हणून तो जगतो.

सैनिक नावाच्या माणसाची ही गोष्ट आपल्या कधी लक्षात आलेलीच नसते. कारण सैनिकाचा आणि आपला संबंध येतो तो कुणाशी तरी युद्ध सुरू झाल्यावर! मग तेव्हा आपण त्यांना त्रिवार वंदन काय करतो, ओलावल्या डोळ्यांनी त्यांचे स्मरण काय करतो, त्यांच्यासाठी रक्त काय देतो, त्यांची करमणूक काय करतो, एक ना हजार गोष्टी.

इतर वेळेला आपल्याच आपल्याला इतक्या कटकटी असतात, की तेव्हा सैनिकाचं पुण्यस्मरण आपल्याकडून होत नाही. मग त्यांच्याबद्दलचा विचार आणि सैनिकांबद्दलची विदारक सत्यं दूरच!

'रोबो' या दिनानाथ मनोहरांच्या कादंबरीत हे विदारक सत्य मांडण्यात आलं आहे.

रोबो म्हणजे यंत्रमानव. रोबो ही कथा आहे डिकीची. लान्स नायक डिकीची. डिकीचं जग म्हणजे एका सैनिकाचं जग. सैनिकाचा दिवस नियमाने उगवतो. कुठल्या तरी आज्ञेने दिवस मावळतो. सैनिकाच्या कपड्यांबद्दल नियम असतात, त्याच्या चालण्याबद्दल नियम असतात, त्याच्या झोपण्याबद्दल नियम असतात, त्याच्या खाण्याबद्दल नियम असतात. त्यांनी कौटुंबिक आयुष्य किती भोगावं, हे सुद्धा नियमांनीच ठरवलेलं असतं. डिकीचं जग म्हणजे नियमांचं जग.

डिकी वेगळा आहे. तो वेगळा आहे म्हणूनच त्याला नियम नकोसे वाटतात. एका भयानक प्रक्रियेत या नियमांनी घासूनपुसून तोलून, मापून आणि हजार परीक्षा घेऊन आपलं एक यंत्र बनतंय, हे डिकी विसरू शकत नाही. म्हणूनच यंत्र बनवणारे नियम तोडायचा तो सतत प्रयत्न करतो. डिकीची गोष्ट म्हणजे यंत्रमानव होऊ घातलेल्या माणसाची गोष्ट. चेहरा नसलेल्या आणि नियमांनी, कायद्यांनी हालचाल होणाऱ्या माणसाची कथा.

डिकी जपत राहतो ते माणूसपण. त्याला भविष्याची चिंता माहीत नाही. तो शाश्वततेवर विश्वास ठेवत नाही. तो सांभाळतो ते माणूसपण. हवालदार पिल्लेची सुंदर अनिल साहाशी 'लगट' लक्षात येते तेव्हा पिल्लेलां अद्दल घडवायच्या आघाडीवर राहाता तो डिकीच! सगळे नियम धाब्यावर ठेवून एका रात्री रुडसिंगला त्याच्या बायकोला भेटायला घेऊन जातो तो डिकीच! मेजरचं घरगुती काम करणार नाही, कारण मला त्यासाठी पगार मिळत नाही असं बजावणारा तो डिकीच. डिकी संवेदनाशील आहे. तो कमकुवत नाही. तो माणसाच्या माणूसपणावर प्रेम करतो. केवळ पूर्व बंगाली म्हणून हेर समजून एका मुस्लिमाला जमाव मारतो त्यावेळेला डिकी तडफडतो.

माणसाचं माणूसपण मातीमोल करणारे जाचक नियम डिकी सतत मोडत राहातो. म्हणूनच सैनिक म्हणूनच तो Mentally invalid मानला जातो. डिकी विरुद्ध ती यांत्रिकीकरणाची प्रक्रिया ह्यातला संघर्ष सुरू होतो तो इथेच. हा संघर्ष जसा बाहेरच्या जगाशी आहे तसाच स्वतःशीही आहे. डिकी जाणून आहे की "आर्मी में ऑर्डर ओबे की जाती है। चाहे वो गलत हो या सही। ऑर्डर इज ऑर्डर. फर्स्ट ओबे इट अँड देन रिपोर्ट." उशीरा उठणं, परेडला हजर न राहाणं, मेजरच्या घरी जाऊन काम कर अशी आज्ञा दिल्यावर ती न पाळणं, यासाठी त्याला शिक्षा होणार आहे, हेही त्याला माहीत आहे. या शिक्षेचं नाटक तो अनेकदा स्वतःशी करतो. पण हे शिक्षेचं नाटक त्याच्यासाठी नाही, याची त्याला जाणीव आहे. जे चौकटीत आहेत त्यांच्यासाठी हे शिक्षेचं नाटक आहे, एवढंच त्याला माहीत आहे. जीवनातील क्रूर नियमांचं पानच डिकीला उलटून टाकायचं आहे.

असा हा डिकी.

कादंबरी सुरू होते ती डिकीच्या मिलिटरीत येण्यानं! तिथून पुढे त्याचं ट्रेनिंग, त्याचं सरहद्दीवर जाणं, मधल्या काळात स्वतः यंत्र बनत चाललोय, ही जाणीव आणि मग सुरू होतो तो स्वतःबरोबरचा संघर्ष आणि त्याचबरोबर अवाढव्य बिनचेहऱ्याच्या यंत्राबरोबरचा संघर्ष—या सगळ्या काळात त्यांनी जपलेले आहे ते माणूसपण, त्याने शोधलेलं आहे. ते माणूसपण सगळे प्रसंग आणि सगळ्या घटना यातून तो शोधत राहतो तो माणूस आणि माणूसच. अपयश बरोबर घेऊन जगणाऱ्या पांडेची आत्महत्त्या, प्रभाशी मैत्री आणि तिची बदली होताना भेटू शकणार नाही म्हणून क्षणभर सैरभैर होणारा डिकी, रुडसिंगला—बायकोला—भेटण्यासाठी नियम तोडणारा डिकी, जवानांच्या बरोबरीने रायफल घेऊन कॉलिंग करणारा कर्नल फिलिप्स आणि म्हणूनच त्याचं कौतुक करणारा डिकी, सुनीताशी स्नेहबंध जोडणारा डिकी, दरिद्री स्त्रीला प्रचंड हवेलीतल्या श्रीमंताच्या खुर्चीवर बसलेलं स्वप्न पाहणारा डिकी, मेजरशी वाद घालणारा डिकी आणि शेवटी लान्स नायक डिकीचं 'पे बुक' फेकून देणारा डिकी.

कादंबरी संपते ती इथे. रोबो ही कादंबरी म्हणणे विलक्षण कसदार अनुभव आहे. एका अमानुष प्रक्रियेत माणसाचं माणूसपण कसं उद्ध्वस्त केलं जातं, चिरडलं जातं, याचं वर्णन करणारी ही कादंबरी !

रोबो हा अनेक मूलभूत प्रश्नांचा शोध आहे. पहिला मूलभूत प्रश्नच मानव आहे. युद्धाचा फोलपणा समजण्यासाठी प्रत्येक पिढीला युद्धाच्या यातनांतून जावेच लागते का ? पोटासाठी पेटीच्या सुरांवर त्या आसामी तरुणींना का नाचावं लागतं ? अन्नाच्या शोधात माणसांना स्वतःच्या देशाच्या सीमारेषा ओलांडून का भटकावे लागते ? आदिवासींना सैनिकांची भीती का वाटते ? ही भीती कशाबद्दल ? ही भीती कोणाची ? हा तिटकारा की ही चीड ? ही चीड सैनिकांबद्दल की सिव्हिलाईज्ड जगाबद्दल ?

आणि म्हणूनच माणसाचं माणूसपण, माणूस जपणं म्हणजे सैन्य तयार करून संरक्षण देणं नाही, त्या सैनिकाचं माणूसपण हरवणं नाही, तर माणसाच्या मूलभूत गरजा भागवणं, त्याला नैसर्गिक स्वातंत्र्य देणं होय. माणूसपण उद्ध्वस्त करून टाकणाऱ्या नियमांनी, कायद्यांनी मानवी व्यवहार मर्यादित होणे म्हणजे त्याचा यंत्रमानव होणं.

डिकीला झुगारून द्यायचेत ते हे नियम आणि कायदे. आणि म्हणूनच सबंध कादंबरी-भर हाच झगडणारा, तडफडणारा डिकी आपल्याला भेटत राहतो.

'मी'ला पारख्या करून टाकणाऱ्या प्रक्रियेतलं क्रूर वास्तव मांडणारी ही कादंबरी ! इथे हा 'मी' सैनिक आहे, पण हे वर्णन फक्त सैनिक नावाच्या 'मी'चं नाही. हे वर्णन आहे माणसाला यंत्र बनवणाऱ्या अनेक प्रक्रियांचं. दिवस-रात्र, क्षण अन् क्षण चालू असलेल्या प्रक्रियेचं. 'मी'ला गिळून टाकणाऱ्या प्रक्रियेचं. ज्या प्रक्रियेची व्याख्या करता येत नाही. माणसातील माणूसपण नष्ट करणारी ही प्रक्रिया, माणसाला अमानुष बनवणारी. त्याचे जनावर करून टाकणारी, त्याचे यंत्र करणारी. एक सार्वत्रिक अनुभव सांगणारी ही कादंबरी. संवेदनाशून्य जगाचा अनुभव सांगणारी. समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला यंत्र बनवणारी प्रक्रिया उघड करून सांगणारी ही कादंबरी. समाजातल्या रोगट मनोवृत्तीवर बोट ठेवणारी कादंबरी.

दुसऱ्याला स्वतःच्या संरक्षणासाठी बाळगणं, त्याला पशू बनवणं, त्याला यंत्र बनवणं या रोगट मनोवृत्तीची ही हकीकत.

या कादंबरीत सैनिक नावाच्या यंत्राचं जरी वर्णन आलं असलं तरी डिकी प्रतिनिधित्व करतो यंत्रं बनवल्या गेल्या साऱ्यांचं. ही कादंबरी उघडी करते ती अमानुष प्रक्रिया जिथे स्वतःच्या हितासाठी क्रूर कायदे व नियम करून दुसऱ्याला बांधून ठेवलं जातं–दुसऱ्याचं स्वातंत्र्य हरण केलं जातं–दुसऱ्याचं माणूसपण हरण केलं जातं. या अवाढव्य प्रक्रियेचं वास्तव मांडणारी ही कादंबरी.

तथाकथित सुसंस्कृत वर्गाजवळ शोषणाचे तत्त्वज्ञान असते. या तत्त्वज्ञानातले महत्त्वाचे पाऊल असते ते साऱ्यांना यंत्र बनवणे, या साऱ्यांना नकळत त्यांचे चेहरे पुसून टाकणे, त्यांचा मी हिसकावून घेणे. मनोहरांनी या तत्त्वज्ञानाविरुद्ध झगडणारा नायक दाखवलाय.

रोबोचं सारं चित्र आहे हे असं. मनोहरांनी डिकीची सैन्यातली ५ वर्षं उभी केलीत मोठ्या ताकदीनं. कुठलाही वेगळा विषय मांडताना, नवं मूल्य सांगताना ते सोप्या रीतीनं, दुसऱ्याला विश्वासात घेऊन सांगावं लागतं. सहज सोप्या भाषेत. प्रत्येक घटना रंगवत मनोहर पटवत जातात, समजावत जातात. त्यामुळे डिकीचं वागणं कधीच revolt वाटत नाही. उलट त्याने तसेच वागायला पाहिजे होते असे वाटते.

युद्धाच्या कथा रम्य असतात, कारण आपल्या स्वतःच्या रक्षणासाठी कुणा दुसऱ्यानं रक्त सांडलंय, ही भावनाच अहं सुखावणारी असते. पण युद्धासाठी यंत्र बनवणाऱ्या प्रक्रियेतलं भयाण वास्तवही मनोहरांनी रम्य करून टाकलंय.

आतापर्यंत मराठी साहित्यात आलेला सैनिक वीरगतीला तरी गेलेला आहे किंवा शत्रूच्या ताब्यात जाऊन परत आलेला आहे. नाही तर त्याचे नायिकेशी मीलन झालेले आहे. एका वेगळ्या अर्थानं बंड करणारा डिकी नवा आहे. तो खोटा नाही, तो मुखवटा नाही. माणसाला जनावर करून टाकणाऱ्या रोगट मनोवृत्तीविरुद्ध जागृत होणाऱ्या साऱ्यांचा तो प्रतिनिधी आहे. माणसाचा खरा शोध घेऊन माणसासाठी, प्रत्येक माणसासाठी, माणूसपण जपणारे तत्त्वज्ञान शोधणाऱ्यांचा तो प्रतिनिधी आहे.

कुठल्या ना कुठल्या तरी तत्त्वज्ञानाने भारलेल्या कादंबऱ्या मराठी साहित्याला नव्या नाहीत. पण दुसऱ्याला यंत्र बनवणारं तत्त्वज्ञान उघडं करणाऱ्या, त्यायोगे तशाप्रकारचं शोषणाचं तत्त्वज्ञान उघडं करणाऱ्या आणि माणूसपणाचा शोध घेणाऱ्या या कादंबरीची नोंद मराठी साहित्याला करून घ्यावीच लागेल. *

रोबो
दिनानाथ मनोहर
ग्रंथाली, मुंबई
पृष्ठे : १३६
मूल्य : बारा रुपये

## The Brain Revolution

[By Marilyn Herguson.
Pages 413,
Bantam Books,
$ 2·25]

इंग्रजी पुस्तकांचे परिचयवजा परीक्षण तीन एक महिन्यांपासून मी देत आहे. या काळात मला वाचकांची बरीच पत्रे आली. विलिंग्डन कॉलेज, सांगली येथील ॲसिस्टंट ग्रंथपाल श्री. यशवंत श्रीपाद रास्ते यांनी तर मला असे लिहिलें आहे की, माझ्या या सदरात फारच मोलाची माहिती मिळत आहे व त्यांनी मला विनंती केली आहे की, मी हा उपक्रम चालू ठेवावा.

हे सदर लिहिताना माझ्याकडे असलेल्या कात्रणांचा मला फारच उपयोग होतो. माझ्याकडे असलेली सर्व कात्रणे मी त्या त्या पुस्तकांना चिकटवून टाकली आहेत. ग्रंथपालाच्या शास्त्रशुद्ध दृष्टीने कदाचित ते औचित्यपूर्ण नसेल, पण माझ्या वाचकांना ते एकदम पसंत आहे. अर्थात हजारो कात्रणे लावताना कधी कधी थोड्या चुका होतातच, पण ज्या वाचकाला हंसाची नीर–क्षीर

विवेकबुद्धी आहे, त्याला या माहितीपासून बराच फायदा होतो.

स्पॅनमधील 'बुलफाईट' विषयी सर्वांनी ऐकले असेलच. एका भल्यामोठ्या रिंगणाभोवती भलामोठा जनसमुदाय बसलेला असतो. रिंगणात एक तगडा बैल व त्याचा प्रतिस्पर्धी एक मनुष्य (matador) उभे असतात. त्या मनुष्याच्या हातात एक लालबुंद फडका असतो. तो फडका त्याने दोन्ही हातांनी त्याच्या कडेला बरगड्या व मांड्यांच्यामध्ये अलगद धरलेला असतो. फडका बघून तो माजलेला बैल चेकाळतो व मनुष्याच्या हातातल्या फडक्यावर शिंगे रोखून, सर्व शक्ती एकवटून मुसंडी मारायला येतो. बैलाची शिंगे त्या फडक्याला लागतात न लागतात तोच तो मनुष्य ऐन वेळेला फडका बाजूला सारतो व स्वतःला रोधता न येईल इतक्या गतीने आलेला बैल बऱ्याच लांब जाऊन थांबतो व परत हल्ला करतो.

अशाच एका रिंगणात जॉस डॅलगाडॉ नावाचा माणूस उभा आहे व समोरच धष्टपुष्ट बैलही आहे. डॅलगाडॉच्या हातात लाल फडका व remote control electronic equipment आहे. बैलाच्या मेंदूभोवती विशिष्ट ठिकाणी electrodes लावले आहेत. जेव्हा बैल डॅलगाडॉवर हल्ला करतो, त्यावेळेला डॅलगाडॉ स्वीच दाबतो व बैलाच्या मेंदूला विशिष्ट ठिकाणी इलेक्ट्रिक् स्टीम्युलेशन मिळाल्यामुळे त्याची सर्व हिंसक वृत्तीच बदलून जाते व तो एखाद्या पाळलेल्या कुत्र्याप्रमाणे डॅलगाडॉशेजारी शांत उभा राहातो!

माणसाच्या मेंदूविषयी किती अवाढव्य संशोधन चालले आहे, याची कल्पना हे पुस्तक वाचून येते. क्वचित वर्तमानपत्रांत व नियतकालिकांतून त्रोटक वातम्या येतात. पण त्या अगदीच तुटपुंज्या असतात. मनुष्याच्या अस्तित्वाचा केंद्रबिंदू म्हणजे मेंदू. तोच शरीराच्या इतर भागांवर नियंत्रण ठेवतो. त्याला डोळ्यावाटे दिसते व कानावाटे ऐकू येते ते मेंदूतच. काही काही माणसांना अतींद्रिय शक्ती प्राप्त झालेली असते तीसुद्धा मेंदूतच. अगदी अलीकडे Biofeedback नावाची एक 'ट्रीटमेंट'च USA मध्ये निघाली आहे. समजा, तुम्हाला hypertension (ब्लड प्रेशरचा) रोग आहे, तर तुम्ही निवांतपणे झोपायचे व हृदयावर आपले लक्ष केंद्रित करायचे. खोलीत तुम्हाला मार्गदर्शन करणारा थीरेपीस्ट असेल तो तुमच्यात हळूहळू मोहिनी-विद्येसारखी अवस्था आणील व पॉझिटिव्ह विचार करायला सांगील. तुमच्या मेंदूत असा एखादा सुखद विचार येईल की, त्यातून (मेंदूतून) 'अल्फा वेव्हज्' निर्माण व्हायला लागतील. एका विशिष्ट यंत्राने या अल्फा वेव्हज्ची नोंद ठेवण्यात येते. Transcendental Meditation मध्ये सुद्धा अल्फा व बिटा वेव्हज् बऱ्याच प्रमाणात निर्माण होतात. हळूहळू सवयीने आपल्याला या वेव्हज्ची निर्मिती वाढवता येते. याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर तर होतोच, पण आपली मानसिक कार्यक्षमता सुद्धा बऱ्याच प्रमाणात वाढते.

एकदा एका माणसाला खाली झोपवण्यात आले व अल्फा वेव्हज कशा निर्माण करावयाच्या याचे मार्गदर्शन दिले गेले. त्याच्या शेजारीच एक खेळण्याची इलेक्ट्रॉनिक गाडी ठेवण्यात आली. तिची रचना अशी करण्यात आली होती की, जेव्हा अल्फा वेव्हज् निर्माण होतील तेव्हाच तिला गती मिळेल. या अरेंजमेंटमुळे झोपलेला मनुष्य व आगगाडी यांची एकमेकांवर 'प्रतिक्रिया' होत गेली व तो मनुष्य जास्त प्रमाणात अल्फा वेव्हज् निर्माण करायला लागला. अल्फा वेव्हज् निर्माण व्हायला लागल्या म्हणजे मेंदूच्या एक किंवा अनेक भागांत न्युरोन्स उडायला लागतात. बिटा वेव्हज् निर्माण व्हायला लागल्या की गाडी थांबायची. Biofeedback Training (BFT) या विषयावर अमेरिकेत संशोधन चाललेले आहे. ज्यांना डोकेदुखीची पीडा आहे, त्यांना त्या दुखत असलेल्या भागापासून रक्त दुसरीकडे नेण्याचे शिकवले की, डोकेदुखी थांबते! ज्यांचे हृदयाचे ठोके लयबद्ध पडत नाहीत, त्यांच्यासाठी लुकलुकते दिवे ठेवण्यात येतात आणि त्या उघडझाप होणाऱ्या दिव्यांत व हृदयाच्या ठोक्यांत एक


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्रीगाडगेमहाराज**–(चरित्र) : गो. नी. दांडेकर | रु. | २०/– |
| २. | **अगा जें कल्पिलें नाहीं**–(आत्मचरित्र)–सत्यवान : नामदेव सूर्यवंशी | रु. | १५/– |
| ३. | **आटप ! अरे आटप लौकर !**–(कलात्मक रहस्यकथा) : द. पां. खांबेटे | रु. | २०/– |
| ४. | **सोन्याचा पिंपळ**–(कथासंग्रह) : श्रीनिवास विनायक कुलकर्णी | रु. | |
| ५. | **'हॅलोऽऽ मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय !'**–(कथासंग्रह) : व. कृ. जोशी | रु. | १२/– |
| ६. | **द्वैत**–(कादंबरी) : नारायण धारप | रु. | १०/– |
| ७. | **नवी माणसं**–(भयकथा) : नारायण धारप | रु. | ७/– |

- आपल्यास पाहिजे असलेली पुस्तके आम्ही परगावीही पुरवू. (V. P. नाही.)
- आपल्या पुस्तकांना प्लॅस्टिक कव्हर्स घालून देऊ.
- नॉनमेंबर्सना डेलिबेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतील.
- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पोस्टासमोर, पुणे ३०.**

प्रकारचा लयबद्ध संबंध तयार करण्यात येतो. अर्थात हे सर्व मेंदूच्या साहाय्याने होते म्हणून याची माहिती दिली आहे. बायॉफीडबॅक या विषयावर सर्वांत जास्त संशोधन कुणी जर केले असेल तर ते डॉ. बार्बारा ब्राऊन या बाईने. १९६० च्या पुढे जेव्हा इतर शास्त्रज्ञ सशावर व उंदरांवर प्रयोग करीत होते, तेव्हा ही बाई माणसाला बायॉफीडबॅक ट्रेनिंग देत होती. डॉ. ब्राऊन हिने ९ वर्षे संशोधन करून 'New Mind, New Body (Harper and Row, $ 9.95) हे पुस्तक लिहिले आहे. एकदा संशोधन करताना तिला अशी माहिती मिळाली की, आपण अल्फा वेव्हज् निर्माण करीत आहोत या जाणीवेनेच त्या वेव्हज् अधिक प्रमाणात निर्माण होतात. म्हणजे जसे 'दुष्टचक्र' आहे तसे 'सज्जन' चक्रही आहे म्हणायचे. If there is a viscions circle, then surely there a luscious circle also!

तर डॉ. ब्राऊनने काय केले ते पुढे सांगतो. बऱ्याच लोकांना माहिती असेल की, हृदयाची कार्यक्षमता ECG (इलेक्ट्रॉकार्डियोग्राम) या यंत्रावर कळू शकते. मेंदूतसुद्धा काय काय चालले आहे ते जाणण्यासाठी EEG (electroencephalogram) नावाचे यंत्र असते. या इलेक्ट्रॉएन्सेफॅलॉग्रामवर डॉक्टर ब्राऊनने एक निळा बल्ब बसवला व एका माणसाच्या मेंदूला त्या EEG चे वायर जोडले. डॉ. ब्राऊनने अशी रचना केली होती की, अल्फा लहरी जेव्हा निर्माण होतील तेव्हाच निळा दिवा लागावा. थोड्या मिनिटांनी त्या माणसाला अल्फा लहरींमुळे सुखद वाटू लागले. डॉ. ब्राऊनने त्याला अर्थात निळ्या दिव्याकडे बघत राहण्याची सूचना दिली होती व तो दिवा का लागतो, हेही सांगितले होते. तर या निळ्या दिव्यावर तो जितकी जास्त अल्फा लहरी 'बघू' लागला तितक्याच जास्त प्रमाणात तो त्या लहरी निर्माण करू लागला.

आणखी एक चमत्कार बघा. हा प्रकार डॅलगाडोंनि इलेक्ट्रिक स्टीम्युलेशन ऑफ द ब्रेनवर (ESB) संशोधन केल्यासारखाच आहे. कदाचित त्यानेही हा प्रयोग केला असेल. अपस्मार किंवा फेफऱ्याच्या रोग्याच्या मेंदूवर इलेक्ट्रॉड्स् ठेवले जातात व त्याचा एका कॉम्प्युटरशी संबंध ठेवला जातो. जेव्हा फिट यायची असते त्या वेळेला कॉम्प्युटरवर त्याची पूर्वसूचना मिळते. ती मिळाल्यावर मेंदूवर ठराविक भागात इलेक्ट्रॉनिक स्टिम्युलेशन दिले जाते. त्यामुळे हळूहळू फिटस् येण्याचे थांबतात व पेशंट बरा होतो. अर्थात याचे प्रयोग फक्त पाश्चात्य देशांत चालले आहेत.

आणखी एका प्रकरणात असे लिहिले आहे की, मेंदूच्या एका विशिष्ट भागात त्या त्या भागाची तृप्तीकेंद्रे असतात. आता खाण्याच्या तृप्तीकेंद्राला तृप्तीची जर सूचनाच मिळाली नाही तर तो मनुष्य त्याच्या शरीराला आवश्यक असेल त्यापेक्षा जास्त अन्न खाईल. (व लठ्ठ होत जाईल!) म्हणजे आता लठ्ठ मनुष्याकडे अनुकंपेनेच पाहिले पाहिजे! अर्थात लठ्ठपणा इतर कारणांमुळेही येऊ शकतो. याउलट एखादा विशिष्ट भाग इलेक्ट्रिकली स्टिम्युलेट केला तर (तुम्ही जरी नुकतेच भरपूर जेवण केले असले तरी) तुमचा जठराग्नी क्षुधेने व्याकुळ होऊन जाईल! याचप्रमाणे तहान कृत्रिमरीत्या निर्माण करता येते.

मनुष्याचा हा जवळजवळ तीन पौंडांचा मऊ गोळा म्हणजे जगातील एक चमत्कारच आहे. मेंदूवर भरपूर संशोधन चालले आहे. पण अजून जितक्या गोष्टी ज्ञात झाल्या आहेत, त्यापेक्षा किती तरी गोष्टी अज्ञात आहेत. जॉन एक्लीज या न्यूरोलॉजिस्टला १९६३ साली नोबेल पारितोषिक मिळाले होते. त्या वेळी तो म्हणाला होता की, अजून कितीतरी शतके मेंदूवर संशोधन केले तरी सर्व गोष्टी उजेडात येणार नाहीत.

मेंदूच्या मध्यभागी 'पीनीअल' ग्रंथी असते. प्रसिद्ध गणिततज्ज्ञ व तत्त्वज्ञ Descartes याचे म्हणणे असे होते की, मानवाचा आत्मा या 'पीनीअल' ग्रंथीतच असतो! काही काही सरपटणाऱ्या प्राण्यांना जर जास्त प्रकाशात ठेवले तर ही 'पीनीअल' ग्रंथी त्यांच्या कातडीचा रंग कमी-अधिक प्रमाणात गडद करते! डोळ्यांवाटे त्या ग्रंथींपर्यंत प्रकाश जातो व त्यामुळे हे सर्व होते. जर्मनीमध्ये या विषयावर संशोधन करण्यात आले. त्यात असे आढळून आले की, मोतीबिंदूमुळे दृष्टी अधू झालेल्या लोकांच्या डोळ्यांतून प्रकाशाचा प्रवेश कमी झाल्यामुळे या लोकांची चयापचय क्रियाच बिघडते! ऑपरेशननंतर दृष्टी परत सुधारल्यास चयापचय क्रिया पूर्ववत सुरू होते. प्रकाशामुळे शरीराच्या व मेंदूच्या रसायनक्रियेत किती बदल घडून येतात, त्याचे हे एकच उदाहरण आहे. अमेरिकेत नवजात अर्भकांना कावीळ होते, तेव्हा त्यांना निळ्या प्रकाशात ठेवतात. या प्रकाशामुळे रक्तातले bilirubin कमी होते व मेंदूला होणारा संभाव्य धोका टळतो. या विषयावर तर Henry Denker ने The Physicians नावाची एक कादंबरीच लिहिली आहे. त्याचे परीक्षण तीन एक महिन्यांपूर्वी 'माणूस' मध्ये मी दिले आहे.

ज्या मुली जन्मापासून अंध असतात त्यांना इतरांपेक्षा दोन वर्षे आधी रजोदर्शन घडते, कारण 'पीनीअल' ग्रंथीपर्यंत प्रकाश न पोचल्यामुळे तारुण्य लवकर येते. काही लहान मुलांच्या 'पीनीअल' ग्रंथींवर सूज आली असल्यास त्यांनाही तारुण्य पुष्कळ वर्षे आधी येते.

या व अशा माहितींनी हे पुस्तक काठोकाठ भरलेले आहे. स्थळाअभावी आणखी कितीतरी मनोरंजक व उद्बोधक माहिती देता येत नाही.

—जे. एन. पोंडा
फिनिक्स लायब्ररी.

# ' कुंकू 'मध्ये दिसलेले
# शांतारामबापू ७५
## ' चानी 'मध्येही दिसावेत

वृत्तपत्रांतून वाचले की, १८ नोव्हेंबर १९७६ ला व्ही. शांताराम यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाली. ते सध्या 'चानी' या चिं. त्र्यं. खानोलकरांच्या कादंबरीवर आधारित सिनेमा काढण्यात गर्क आहेत. आठवण झाली एकाएकी 'कुंकू 'मध्ये दिसलेल्या शांतारामबापूंची.

देव-दानवांच्या सरळसोट मनोरंजनात्मक गोष्टी लिहिणं–खरं तर पाहणं–फार सोपं असतं. लहान मुलांची आणि जाणीवा प्रगल्भ न झालेल्या प्रौढांची त्यातून करमणूकदेखील होते. परंतु ज्यांना स्वतःचा स्वभाव आहे, स्वतःचा अभिमान आहे, ज्या संस्कृतीत वाढले तिचा वारसा आणि तिच्या मर्यादा आहेत, पुढे जाण्याची प्रबळ इच्छा आहे, अशा खऱ्याखुऱ्या माणसांच्या गोष्टी रंगविणे फार अवघड असते. त्यासाठी अनेक रेषा, विविध रंग, अगणित छटा आणि अमाप कल्पनाशक्ती–कौशल्य लागते. अशा कलाकृती अवतरताना त्या कधी कधी ढोबळ (crude) होण्याची शक्यता असते; परंतु कलाकृती जर उभी राहिली तर मात्र तिला तोड नसते. 'प्रभात' फिल्मचा 'कुंकू' हा असा एक चित्रपट. सर्वसामान्य मराठी अथवा हिंदी चित्रांपेक्षा वेगळा, खूपच तरल आणि म्हणूनच मनात कायमचे घर करून बसणारा!

चित्रपट श्री. ना. ह. आपटयांच्या 'न पटणारी गोष्ट' या कथेवर आधारित. पूर्वी अनेक वेळा हाताळलेला. 'तरुण मुलीचे वयस्क गृहस्थाशी लग्न' हा विषय. अशा विषयात तरुणीबद्दल अनुकंपा आणि म्हाताऱ्याबद्दल कडवट भावना निर्माण होणे साहजिक असते. असा एकदा ग्रह झाला की, कथा, कादंबरी, नाटक अथवा चित्रपट सरळसोट होऊन जातो. त्यात हिरो, व्हिलन इत्यादी मालमसाला येतो, वास्तव माणूस हरवून जातो आणि कलाकृती धाडकन खाली आपटते. 'कुंकू' अशी निराशा करत नाही, हेच त्याचे वैशिष्टय! या वैशिष्टयाचे कारण, अनेक रंग, स्वभाव आहेत, सांस्कृतिक वारशाने समृद्ध आणि त्याच वेळी सांस्कृतिक मर्यादांनी जखडलेली पात्रे–माणसे–या चित्रात वावरतात हे आहे.

वास्तविक, निरूला (शांता आपटे) आईवडील वारल्यावर सांभाळणाऱ्या मामामामीने चक्क फसविले आहे. पैशासाठी तिचे एका वृद्ध वकिलाशी (केशवराव दाते) लग्न लावून दिले आहे. तिने त्रागा करणे, वाईट वाटून घेणे, मामा-मामींवर ओरडणे साहजिक आहे, परंतु विसाव्या शतकाच्या चाळिशीच्या काळात रूढिबद्ध निरूने लग्नमंडपातून पळून जाणे अशक्य आहे. व्हायचे ते लग्न झालेच. हात कितीही थरथरला, थबकला तरी तिला नवऱ्याच्या नावाने कुंकू लावलेच पाहिजे, ही रूढप्रथा आहे. 'या चौकटीबाहेर जग असू शकते' ही जाणीव तेव्हा कुणालाही येणे अशक्य! निरूही तेच करते. पण अन्यायाला तडाखेबंद उत्तर देण्याच्या ठाम निर्धाराने. या निर्धाराचाही आई-वडिलांनी केलेल्या संस्कारात आणि शिक्षणातून आलेल्या मूल्यात उगम आहे.

स्वतःबरोबर कुणालाही न घेता ती सासरी जाते ती याच निर्धाराच्या बळावर. वकीलसाहेबांच्या घरी जे अनेक प्रसंग दाखविले आहेत, त्यातून तिचे पूर्ण चित्र उभे राहते–घडतेसुद्धा. तिचा स्वाभिमान, अन्यायाविरुद्ध झगडण्याची वृत्ती, स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी पराकाष्ठा, स्त्री-स्वातंत्र्याबाबत आस्थेने बोलणाऱ्या सुधारक चित्राताईंविषयी (वकीलसाहेबांची मोठी मुलगी) अपार कुतूहल आणि न देखता निर्माण झालेली जवळीक, यातून निरूचे सुरेख चित्र आकार घेते. या किंवा अशाच प्रसंगातून माणसे दिसत असतात, तशीच घडतही असतात आणि म्हणून याच प्रसंगातून वकीलसाहेबांचा दुबळेपणा, वार्धक्य न दिसू देण्याची धडपड, या धडपडीतून व्यक्त होणारा, केल्या लग्नाचा पश्चात्ताप आणि मनःस्ताप दिसतो. विशेष म्हणजे वकीलसाहेबांचे चित्र केवळ काळया रंगात नाही. 'उतारवयात मायेचे कोणी जवळ असावे,' असं त्यांना वाटलं. त्यात कांय वावगं आहे? पण तो काळच असा की, सर्वसामान्यांना विधवेशी अथवा प्रौढेशी विवाह करायचं धैर्य होऊ नये. त्यापेक्षा पैसा खर्च करून एखाद्या तरुण गरीब मुलीशी विवाह करणे सोपे. त्यांचं वागणं तसं म्हटलं तर रूढिमान्य असल्याने ठीकच होते. पण घडलं ते वेगळं. ही 'बया' पत्नी म्हणून राहायला तयारच नाही. अंगाला हात लावू देत नाही अथवा सरळ बोलतदेखील नाही. बोलते ते त्यांचा अथवा त्यांच्या काकूंचा पाणउतारा करणारं बोलते. वागतेदेखील तसेच फटाकडीसारखे! वकीलसाहेब रूढिप्रिय असले तरी या माणसाजवळ निरूवर बळजबरी करण्याएवढी दुष्टता नाही. उलट, हा मनुष्य सुज्ञ आहे. ज्याच्यावर अन्याय होतो त्याला अन्यायाची जाण आलेली आहे हे समजताच, आपल्या रूढिमान्य कृतीमुळे निरूवर होणारा अन्याय त्यांनाही पटेनासा होतो. अर्थात त्या पटण्यास दुसरा पर्यायही नाही. बऱ्याच मोठ्या मानसिक घालमेलीनंतर तेच निरूला बोलावून स्वतःच्या नावाने लावलेले कुंकू पुसायला सांगतात.

इतका वेळ निर्धाराने वागणारी, अन्यायाला प्रतिकार करणारी निरू यावेळी मात्र हबकते. 'हा नवरा नको' हे पटले तरी वळावे कसे? कारण तिच्या निर्धाराला संस्कृतीच्या मर्यादाही आहेत. राम-सीता, मंगळागौरी यांत रमणारे तिचे मन कुंकू पुसायला कचरते आणि ती 'नकार देते.' अन्यायाला तडाखेबंद उत्तर देताना, 'तुम्ही माझे वडील असतात तर तुमचे मला कौतुक वाटले असते,' असे म्हणणारी निरू प्रत्यक्ष संधी आल्यावर माघार घेते. हा प्रसंग मोठा नाटयपूर्ण आहे आणि तेवढाच नाजुक आहे. कारण येथे चित्रपटात पुन्हा सरळसोटपणा येण्याची खूप शक्यता आहे. प्रेक्षकांवर प्रचंड ताण आहे. निरूने जर या प्रसंगी कुंकू पुसले असते तर हा चित्रपट प्रचारकी ठरला असता. प्रचार चांगल्या गोष्टीचा असला तरी तो प्रचार म्हणूनच राहिला असता. वास्तव

व्यक्तींना एकदम 'काल्पनिक पूर्णत्व' देण्यामुळे त्यांची चित्रणे ढिसूळ, ओबडधोबड वाटली असती. तसे घडते तर चित्रपटाबद्दल काही लिहायचे कारणसुद्धा नव्हते अथवा शांतारामबापूंबद्दल कौतुक वाटायचेही कारण नव्हते.

परंतु, निरू कोलमडून पडेपर्यंत बदललेले वकीलसाहेब रिले रेसप्रमाणे पुरोगामित्वाची मशाल घेऊन पुढे होतात आणि स्वत:च्या हाताने तिचे कुंकू पुसतात. कोलमडलेली, भेदरलेली, चक्रावलेली निरू 'या बापाच्या' मांडीवर डोके ठेवून स्फुंदून स्फुंदून रडते. अनेक कारणांसाठी हे अश्रू असतील—इतक्या चांगल्या माणसाचा सहवास लाभल्याचा आनंद (कारण या क्षणीचा सहवास अनंत युगांच्या रटाळ सहवासापेक्षा जास्त आनंददायक आहे), स्वत: कमी पडल्याची अस्वस्थता, स्वातंत्र्याचा आनंद अथवा वकीलसाहेबांच्या अपयशाचे दुःख त्यात असेल. मनावर सतत दडपण आणणारा क्षण, ढोबळपणा (crudeness) कदाचित अपरिहार्य आहे असे भासविणारा नाट्यमय क्षण एकदम उलटलाय. या कलाटणीमुळे चित्रपट एक महान उंची गाठतो. आधीचे दोन तास तर या क्षणासाठी पूर्वतयारी होती, तितकीच आवश्यक !

## आत्महत्या की हौतात्म्य ?

'हा क्षण' आपली दाद घेऊन भूतकाळात विरून जातो आणि या जोडप्यास वास्तवात यावे लागते. निरूला, वकीलसाहेब सोडून दुसरे कोण वकीलसाहेबांची मुलगी मानायला तयार होणार ? आणि सारा समाजच जर तयार नसेल तर तिच्या 'या मुक्तीस' काय अर्थ आहे ? हातात पुरोगामित्वाची मशाल घेऊन पुढे चाललेल्या वकीलसाहेबांना जाणवते, 'निरूच्या जीवनातून आपण अदृश्य झाल्याशिवाय तिला खरी मुक्ती नाही.' मृत्यूला असं आलिंगन द्यायचं म्हणजे पलायनवाद तर नव्हे ? निरूला स्वत:ची मुलगी मानले तर तिचे जीवन सुखी करण्यासाठी जातीने जिवंत राहायचे की पळपुटेपणा पत्करून आत्मघात पत्करायचा ?

या प्रश्नाचे उत्तर वकीलसाहेबांच्या चित्रपटभर पसरलेल्या स्वभावातच आहे. स्वत:चा सूर न सापडलेला असा हा माणूस आहे ! स्वत:च्या पत्नीची आपल्याच डोळ्यादेखत छेड काढणाऱ्या स्वत:च्याच मुलास वठणीवर न आणू शकणारा, दुसरे लग्न झाल्याची बातमी गावात कळताच छत्रीआड तोंड लपविणारा, भेदरट, धमक नसलेला, दुष्टता नसलेला असा हा गृहस्थ आहे. तो ज्या प्रसंगात सापडतो त्या प्रसंगाचेच श्रेष्ठत्व आणि नाट्य त्यास महान बनविते. त्याच्या इच्छेविरुद्ध नव्हे तर त्याच्या इच्छा बदलून ! या प्रसंगी वकीलसाहेब एका प्रचंड लाटेवर आहेत आणि तीमुळे ते केवळ भासतातच असे नव्हे तर 'खरोखरच' महान होतात. आणि म्हणून त्यांचा मृत्यू म्हणजे आत्महत्या नसून हौतात्म्य आहे. 'वकीलसाहेब खरे म्हणजे पुरोगामी कधीच बनत नाहीत, परिस्थितीच त्यांना पुरोगामित्वाच्या घोड्यावर बसविते, खरे तर ते प्रतिगामीच,' अशा शंकेला काहीही अर्थ नाही. ज्यांना बदलत्या परिस्थितीची आणि काळाची बिलकूल जाणीव नसते, तिला विरोध करून भूतकाळात जाण्याचा जे प्रयत्न करतात ते प्रतिगामी. 'परिस्थिती-निरपेक्ष पुरोगामित्व' ही एक भाबडी गोड कल्पना असते. अर्थात हे खरेच की, परिस्थितीचा रेटा काही कारणाने बदलला आणि लाट ओसरली तर हेच महानत्व क्षुद्रत्वात विलीन होऊ शकते. स्वातंत्र्यपूर्व काळात प्राणपणाने लढणारी माणसे नंतर ताम्रपट मिळविण्यासाठी भांडत बसताना आपण पाहात नाही का ? पण म्हणून त्यांची स्वातंत्र्यपूर्वकाळातील त्यागवृत्ती खोटी म्हणणे चूक आहे. वकीलसाहेबांच्या मनास पटले आणि त्यांच्या स्वभावात त्यावेळी बसले म्हणून ते मृत्यूला कवटाळतात. आणि 'प्रभातची' तुतारी परिस्थितीची कोती गगने भेदत कानात वाजत राहाते अनेक दिवस, अनेक महिने, खरं तर आयुष्यभर !

ही 'न पटणारी गोष्ट' अप्रतिम असली तरी तिला न्याय सुद्धा तितक्याच ताकदीने दिला आहे. व्ही. शांताराम यांनी स्वत:चे सारे कौशल्य आणि कल्पनाशक्ती पणास लावल्याचे जाणवते. 'कुंकू लावणे' ही कृती आणि भिंतीवरील घड्याळाच्या लंबकाचे प्रतीक अप्रतिमपणे वापरले आहे. निरूचे स्वभावचित्रण करण्यासाठी तेव्हाच्या रूढींचा वापरही कौशल्यपूर्ण आहे. तसेच कुंकू पुसल्यावर द्विधा मन:स्थितीत असलेल्या निरूचे कोडे सुटणे हे चित्रपटातील कोणत्याही पात्राच्या जाणीवेबाहेर आहे, हे शांतारामबापूंनी जाणले. आणि म्हणून त्या काळी प्रचारासाठी शाहिरी गाणीच वापरली जायची, या वस्तुस्थितीचा त्यांनी खुबीदार वापर केला आहे. त्यावेळी घराबाहेर 'मुद्द तुजं मन रं गड्या, तुला रं भिती कशाची...' या शाहिरी गाण्याने प्रश्नाचे सुभाषितवजा प्रचारकी तरीही सफाईदार (Sophistication) उत्तर दिले आहे.

प्रभातचे 'माणूस' अथवा 'शेजारी' 'कुंकू' इतके चांगले वठले आहेत, असे मला व्यक्तिशः तरी वाटत नाही. अर्थात ही तुलना प्रभातच्याच चित्रपटामध्ये आहे. 'माणूस' आणि 'शेजारी' हे चित्रपटदेखील व्ही. शांताराम यांच्या अलीकडच्या अनेक चित्रपटांपेक्षा आणि आजच्या अनेक हिंदी-मराठी चित्रपटांपेक्षा चांगलेच आहेत. प्रश्न पडतो की, शांतारामबापूंना 'प्रभातची' परंपरा का पेलली नाही ? राजकपूरच्या चित्रपटांबद्दल देखील हेच खरे नाही का ? कदाचित स्वातंत्र्यपूर्वकाळातील जागृतीच्या लाटेवर असल्याने अनेक माणसे महान झाली असतील. लाट ओसरली आणि ती महान माणसे सर्वसामान्यांसारखी झाली. या अधोगतीचे कारण एखाद्या व्यक्तीत अथवा संस्थेत सापडेल असे मला तरी वाटत नाही.

गेल्या दहा-वीस वर्षांत पुन्हा विचारमंथनाची प्रक्रिया देशात सुरू झाली होती. अनेक चांगल्या कलाकृती निर्माण झाल्या. उल्लेख म्हणून गुरुदत्तच्या 'प्यासा', 'साहब बीबी और गुलाम', 'कागजके फूल', मृणालसेनचे अनेक चित्रपट, आणि 'गरम हवा' यांचा उल्लेख करता येईल.

शांतारामबापूंनी सध्या अत्यंत सकस अशी खानोलकरांची 'चानी' चित्रपटासाठी निवडली आहे. ''कुंकू' मध्ये दिसलेले व्ही. शांताराम 'चानी' मध्येही दिसावेत', या इच्छाप्रकटीकरणाशिवाय त्यांचे ७५ व्या वर्षी दुसऱ्या कोणत्या प्रकारे अभिष्टचिंतन करता येईल ? शांतारामबापू कलाकार आहेत आणि त्यांनी कलेतच आपली स्वत:ची पूर्वीची रेकॉर्डस ब्रेक करावीत, हीच रसिक म्हणून आमची त्यांना विनंती.

—प्रकाश बुरटे

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# थँक यू मिस्टर ग्लाड

## प्रभावी कादंबरीचा यशस्वी नाट्याविष्कार

हे श्रेय कादंबरी-नाटककार अनिल बर्वे यांचं आहे की, दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकरांचं की नाट्यसंपदा आणि प्रभाकर पणशीकरांचं हा मतभेदाचा मुद्दा होऊ शकेल. पण एक नक्की की, कादंबरीच्या यशस्वी नाट्य, चित्ररूपांतरणाची जी दुर्मिळ उदाहरणं सापडतात, त्यात थँक यू मिस्टर ग्लाडचा समावेश जरूर करावा लागेल. निव्वळ नाट्यप्रयोग पाहणाऱ्या प्रेक्षकांना प्रभावित करण्याबरोबरच, मूळ कादंबरी वाचून आलेल्या आणि तुलनात्मक दृष्टीनं पाहू शकणाऱ्या–पाहू इच्छिणाऱ्या चिकित्सकांनाही काही मर्यादेपर्यंत समाधान देण्याची अवघड कामगिरी या नाटकानं बजावली आहे. 'काही मर्यादेपर्यंत' असं म्हणावं लागतं, कारण कादंबरीचं नाट्यरूपांतर पाहताना, प्रेक्षकांच्या काही अपेक्षा, काही associations, काही गृहीतकल्पना यांचा हस्तक्षेप अपरिहार्य असतो. एखादं पूर्ण स्वतंत्र नाटक पाहायला प्रेक्षक जितक्या प्रमाणात कोऱ्या पाटीसारखं मन घेऊन येऊ शकतात, तितक्या निखळ, unconditioned मनःस्थितीत ते आपण वाचलेल्या एखाद्या चांगल्या कादंबरीचा नाट्यावतार पाहू शकतील, असं वाटत नाही आणि ही कादंबरी जितकी अधिक प्रभावी, तितकी हस्तक्षेपाची संभाव्यता अधिक असणं साहजिक आहे.

मी स्वतः या नाटकाच्या यशाचा सिंहाचा वाटा लेखक श्री. अनिल बर्वे यांना देईन. अर्थात तो उत्तम संवादलेखनाबद्दल नव्हे. त्यांचं सगळ्यात मोठं यश आणि त्यांच्या नाट्यकृतीचं बलस्थान त्यांची मूळ कादंबरी हेच आहे आणि नाट्यमयता व संवादप्रधानता हे दोन गुण कादंबरीतच इतक्या प्रमाणात आहेत की, तिचं नाट्यीकरण फारसं दुर्घट होऊ नये. त्यामुळेच की काय, पण कादंबरी आणि नाटक यांची तुलनात्मक चर्चाचिकित्सा करायला या संदर्भात बेताचाच वाव आहे. अर्थात कादंबरी व नाटकात महत्त्वाची स्थळं नाहीतच असा याचा अर्थ नाही. एक महत्त्वाचा फरक आहे तो घटनाकालाचा. कादंबरीतील नायक डॉ. वीरभूषण पटनाईक हा पराभूत नक्षलवादी आहे, तर नाटकातला नायक, नाव तेच असलं तरी, स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक आहे. साहजिकच कादंबरीचा घटनाकाल प्रचलित असताना नाटकातला घटनाकाल थेट स्वातंत्र्यपूर्वकाळापर्यंत मागे नेलेला आहे. ही तडजोड सद्यःपरिस्थितीला अनुसरून केली आहे, असं गृहीत धरले तरी तिच्यातला केविलवाणा फोलपणा जाणवल्याशिवाय राहात नाही. एक तर नाटकातला क्रांतिकारक सर्व वेळ नक्षलवाद्याचेच 'डायलॉग्' फेकत राहतो. दोन : कादंबरीतला व नाटकातला मिस्टर ग्लाड हा हिटलरकडून नागवला गेला हे खरं मानलं तर पुढच्या वर्षांचा मेळ बसत नाही. कारण हिटलरचा मृत्यू व भारताची स्वातंत्र्यप्राप्ती यात केवळ दोनच वर्षांचं अंतर आहे, दोन दशकांचा हिशेब त्यात कसा बसेल ? तीन : कालविषयक औचित्यभंग (anachronism) टाळण्यात आलेला नाही. मटका, आकडे लावण्यासंबंधीचे उल्लेख हे याचं एक ढोबळ उदाहरण.

अशा negative change बरोबरच एक positive बदलही कादंबरीतून नाटकात आला आहे. बर्व्यांची मूळ कादंबरी कलात्मक उद्देशसंपन्न होती, असा दावा खुद्द ते स्वतःही करणार नाहीत आणि ती निव्वळ प्रचारात्मक उद्देशानंच लिहिली गेल्याचा इतरांचा आरोपही क्षणभर अमान्य केला, तरी कादंबरीत मोठ्या प्रमाणावर प्रचारी अभिनिवेश होता आणि तो विचारपूर्ण असण्यापेक्षा भावनामय अधिक होता; हे काही खोटं नाही. विचारांचा, तत्त्वांचा कोरडा संघर्ष पाहण्यापेक्षा तो मानवी भावनांच्या चौकटीत पाहणं प्रेक्षक अधिक पसंत करतील, ते जास्त appealing होईल हे लक्षात घेऊनच बेतल्यासारखा या कादंबरीचा आराखडा आहे. त्यातले 'ग्लाडसाहेबाचं स्वप्न, नक्षलवाद्याचं मृत्युपत्र असे काही भाग तर प्रच्छन्न प्रचारानं लडबडलेले आहेत. फक्त हा सगळा प्रचारकी थाट भावनात्मक व व्यक्तिगत संघर्षाच्या सूत्रात इतक्या एकजीवानं गुंफला गेला आहे की, त्यामुळे कादंबरी काही एका कलात्मक पातळीपर्यंत, उंचीपर्यंत जायला अडथळा येत नाही. नाटकात हा प्रश्न जवळजवळ संपुष्टातच आला आहे. कारण नक्षलवाद्याचा स्वातंत्र्यवीर झाल्यानं त्याची प्रचारकी दातनखं मुळातच गळून पडतात. प्रचाराची बैठकच अशी eliminate झाल्यानं त्याची मूळची धार, त्याचा अभिनिवेश हेही बोथट होतात. याला मी positive chang म्हणतो. कारण नाटकाची कलात्मक विशुद्धता वाढायला या elimination मदत बरीच झाली आहे. मुळातच नाटक ही pure art मानली जात नाही, कादंबरी मानली जाते, पण इथे तर कादंबरीलाच mixed art म्हणण्याची वेळ आली होती. नाटकात अशी पाळी आली नाही.

कादंबरीच्या नाट्यप्रवासात अपरिहार्यपणे घडणारा एक फरक इथेही जाणवतो. कादंबरीत लेखकाची स्वतःची involvement जितकी असते, तितकी नाटकात येणं शक्यच नसतं. अनेकदा ते योग्यही नसतं. पण त्यामुळे नाटकाला पुरेशा प्रभावासाठी इतर अंगोपांगांचाही आधार घ्यावा लागतो. कादंबरीकार या नात्यानं बर्व्यांनी आपली स्वतःची अशी जी 'कॉमेंटरी', जी 'अॅडिशन' वारंवार दिली आहे आणि बऱ्याचदा मोठ्या अभिनिवेशानं दिली आहे, तिचा लाभ नाटकाला मिळणं अशक्यच होतं. विशेषतः नाना पात्रांचे स्वभाव, त्यांची पार्श्वभूमी, त्यांचे गुणदोष आणि त्यांच्या क्रियाप्रतिक्रिया यांच्याबद्दल कादंबरीकार बर्वे जे सहज शेरे मारतात, त्यांच्या वागण्यातला-बोलण्यातला कार्यकारणभाव ज्या सहजतेनं ते स्वतःच उलगडतात, तो effect नाटकात येणं अवघडच आहे.

अर्थात या सगळ्या मर्यादा गृहीत धरूनही नाट्यसंपदेला यशस्वी प्रयोगाचं श्रेय दिलंच पाहिजे. साडेतीन तासांच्या या प्रदीर्घ नाटकानं सुरुवातीपासूनच जबरदस्त पकड घेतली. नाटकाचा प्रारंभ ज्या 'शॅडो-प्ले' मधून

झाला, तिथपासूनच खरं तर ही प्रभावी पकड सुरू झाली. तीन-चार मिनिटांचा हा शॅडो-प्ले म्हणजे दिग्दर्शनाची विजयपताका असं म्हणायला काहीच हरकत नाही फिरत्या स्वस्तिकाच्या(–जर्मनीचं युद्धचिन्ह–) पार्श्वभूमीवर ग्लाडसाहेबाचं पूर्वायुष्य संक्षेपानं पण टोकदारपणे दाखवलं गेलं, आणि तेही हिटलरसकट सर्वांच्या नुसत्या सावल्यांतूनच. त्यातून नाटकाला एक चांगली पार्श्वभूमी, एक आधारभूमी मिळाली. कारण ग्लाडच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेचं कोडं उकलायला त्याच्या पूर्वजीवनाचीच मदत लागते.

नाटचसंपदेच्या प्रयोगाची बाजू समाधानकारक तर अभिनयाची आघाडी मजबूत होती. वस्तुतः मूळ कादंबरीचं घटनास्थळ अत्यंत विस्तृत आहे. हे सगळं तुरुंगाचं आवार एका फिरत्या रंगमंचावरच्या साहाय्याने उभं करताना नेपथ्यकार छेल-परेश यांची कसोटीच लागली आहे. तथापि त्यांच्या मर्यादांमध्ये राहून त्यांनी आपली कामगिरी चोख बजावली आहे. प्रकाशयोजनेसही नाटकात बऱ्यापैकी महत्त्व आहे आणि ती गरजही यथायोग्य भागवली गेलेली आहे. मात्र फिरता रंगमंच फिरण्या / फिरवण्याची वेळ, पद्धत आणि प्रकाशयोजनेतील बदल यांचा कुठेतरी मेळ बसणं अतीव अगत्याचं आहे. एरवी प्रवेश पूर्ण होण्यापूर्वीच रंगमंच फिरू लागणं, तो एकदम फिरू लागल्याने पात्रांना धक्का बसणं, तो पूर्ण फिरण्याआधीच पुन्हा पूर्ण प्रकाश येणं अशा तांत्रिक चुका टाळता येणं शक्य आहे.

एक अँग्लोइंडियन जुलमी जेलर आणि फाशीची शिक्षा घेऊन त्याच्या तुरुंगात आलेला एक झुंजार क्रांतिवीर यांच्या संघर्षाची कथा सांगणाऱ्या या शोकात्मिकेचं प्रमुख यश तिच्यातल्या पात्र-चित्रीकरणात ( Characterization ) आहे असं मला वाटतं. मूळ कादंबरीपेक्षा कितीतरी पटीनं अधिक जिवंत, जास्त खरी वाटतील अशी माणसं निर्माण करण्यात लेखकांना आलेली सफलता आणि या कॅरॅक्टर्स तशाच जिवंतपणे उभ्या करण्यात अभिनेत्यांनी दाखवलेलं कर्तृत्व याचा हा मिलाफ आहे. मि. ग्लाड ही प्रधान व्यक्तिरेखा तर विलक्षण समृद्ध, अनेक पैलू असलेली, अनेक परस्परविसंगत गुणावगुणांचं मिश्रण असलेली, आणि मुख्य म्हणजे गतिशील, परिवर्तनक्षम, dynamic अशी. पहिल्या अंकातला राक्षसी मोजमापांचा ग्लाड आणि तिसऱ्या अंकातला तुलनेने दुबळा पण माणसात आलेला ग्लाड यांच्या व्यक्तिस्वातला संपूर्ण बदल हे एक आव्हान होतं, आणि प्रभाकर पणशीकरांनी ते स्वीकारून बाजी मारली आहे. commanding personality बरोबरच एका multi-dimensional भूमिकेच्या हृदयापर्यंत पोचल्यानं येणारी आविष्काराची खोली (depth of expression) आणि हुकमी, करडा, कणखर, खरखरीत आवाज व किंचित ओलाव्याचा, बसका, जाड, साधा आवाज यांचा योग्य तसा वापर ही त्यांच्या 'ग्लाड'ची काही ठळक वैशिष्टचं. शेवटी हे नाटक (कादंबरीप्रमाणेच) क्रांतिकारकाचं न राहता ग्लाडभोवतीच भिरभिरतं, यात जितकं लेखकाचं अपयश आहे, तितकाच वाटा पणशीकरांच्या सव्यसाची अभिनयाचाही आहे. तथापि एक जबरदस्त व्यक्तिरेखा उत्पन्न होऊनही दुय्यम पात्रांचं चित्रण अपुरं किंवा दुबळं झालेलं नाही हे विशेष. ग्लाडची मुलगी जेनिफर ( जान्हवी पणशीकर ), वीरभूषणची पत्नी उमा ( सुधा करमरकर ), दोन असिस्टंट जेलर्स ( वसंत खरे व सीताराम सामंत ), फाशीगेटचा वेंधळा जमादार (छोटू सावंत) आणि वॉर्डर गफूरदादा ( अप्पा गजमल ) ही सर्वच व्यक्तिरेखाटनं दुय्यम असूनही आपापल्या परीनं आणि आपापल्या ठिकाणी समर्थ, सुडौल आणि संपूर्ण आहेत. मुख्य पात्रांचं उदात्तीकरण करण्याच्या हेतूनं ही पात्रं निर्मिल्याचं किंवा कामी आणल्याचं कधीच जाणवत नाही. जमादार, ठाकूरदादा आणि उमा पटनाईक या तीन व्यक्तिरेखा या दृष्टीनं विशेष तपासण्यासारख्या आहेत. वेंधळेपणावर मात करून जाणारी मानवतावादी उदारता आणि आयुष्याचं काही तरी—निदान कामचलाऊतत्वज्ञान या आपल्या गुणवैशिष्ट्यांसह

## Romance of Realism

'थँक्यू मि. ग्लाड', मराठी नाटकाच्या पूर्वापार आणि प्रचलित परंपरांपेक्षा एकदम वेगळं का वाटावं ?

याबद्दल विचार करताना, लेख लिहिल्यानंतर सुचलेला एक 'आफ्टरथॉट'— पूर्ण नाटकाभोवती वास्तववादाच्या विविध पातळ्यांनी धरलेला फेर, त्याचा काहीसा स्वैर पण ठामपणे जाणवणारा विहार हे याचं कारण असावं.

वस्तुतः हौतात्म्याच्या गूढरम्य प्रदेशात वावरायला योग्य असं हे कथानक. पण कादंबरीपेक्षाही नाटकाची कथावस्तू म्हणून उभं राहताना ते वास्तवाच्या कितीतरी अधिक जवळ आलं. त्यातली सर्वच पात्रं, विशेषतः मि. ग्लाड आणि डॉ. पटनाईक विलक्षण 'माणसातलीच' वाटली. त्यांची सुखदुःखं, भावभावना खास त्यांच्याच आणि खास माणसाच्या वाटल्या. हा Psychological realism मला वेगळा वाटला. डॉ. पटनाईक व उमा यांच्या शेवटच्या भेटीचा प्रसंग हा Psychologically convincing characterization चा उत्कृष्ट नमुना. एरवी हा प्रसंग बेसुमार धीरोदात्त, वज्रकठोर, कोरडाठाण इ. इ. (आणि पर्यायानं अमानुष) करणं अशक्य नव्हतं. पटनाईकचं मृत्युपत्र आणि अखेरीस ग्लाडनं त्याला छातीवर गोळी घालून वीरमरण देणं या घटनाही वस्तुतः dark fantasy किंवा romanticism मध्ये जमा होण्यासारख्या, त्याही Psychologically Convincing होतात त्या नाटककाराच्या material realism च्या जाणिवेमुळे. सभोवारचं भान ठेवल्यामुळे. त्यामुळेच हा क्रांतिकारक नायक काय किंवा इतर कोणतेही पात्र काय, त्याला वास्तवाच्या भक्कम पायावर उभारलेलं स्वतःचं असं मजबूत व्यक्तिमत्त्व लाभलं आहे, जे या मातीतलं आणि हाडामांसाचं आहे. शिवाय नाटकात मांडलेला विचार— तत्वज्ञान म्हणा हवं तर— या काळाचं आणि पुढच्याही काळाचं आहे.

किंचित romance आणि बराचसा realism यांचा अवघड तोल सांभाळताना ढगात डोकं जाऊ देण्याचा व्यावसायिक मोह नाटककारानं आवरला, हे अभिनंदनीय. *

समोर येणारा जमादार काय, किंवा ग्लाड-साहेबाला आपला फार दरारा वाटतो अशा भूलथापा अडाण्यांना मारून आपल्या काल्पनिक मोठेपणात मश्गूल राहणारा आणि तरी जमिनीवरच पाय रोवलेला, त्यामुळेच वीरभूषणच्या फाशीचा दोर वळायला नकार देणारा गफूरदादा काय, हीं पात्रं स्वयंपूर्ण वाटतात, Paracital वाटत नाहीत. जोसेफ (ग्लाडचा नोकर) सारख्या परावलंबी, परोपजीवी पात्राकडे पाहिल्यावर हे विशेष जाणवेल.

उमाची कॅरॅक्टर लहानशी असली—पहिल्या अंकातल्या अखेरच्या पंधरा मिनिटांपुरतीच मर्यादित असली——तरी भावचित्राचा तो एक अप्रतिम नमुना आहे. आयुष्यात अखंड निखाऱ्यावरच चालत आल्यानं पाय होरपळल्याच्या शारीरिक वेदनेची खंत न करणारी, पण अंतिम ताटातुटीच्या वळणावर संवेदना जिवंत असल्यानं घालमेलीत सापडणारी उमा; नवऱ्याकडून नेत्रदानाच्या आश्वासनपत्रावर बेडरपणे सही घेऊन आपण डोळे गाळणारी उमा हे दुय्यम पात्रातलं एक अत्यंत विलोभनीय रेखाटन आहे. छोटू सावंत, अप्पा गजमल आणि सुधा करमरकर यांनी या स्वयंसमर्थ व्यक्तिरेखा तितक्याच ताकदीनं पेलून उभ्या केल्या आहेत, हेही महत्त्वाचं. दोन असिस्टंट जेलर्स आणि जेनिफर ही पात्रांच्या अचूक निवडीची दोन उदाहरणं. त्यातही जेनिफरच्या भूमिकेत वसंत खरे यांना बराच वाव मिळाला आणि त्यांनी त्याचा चांगला वापरही केलाय्. विशेषतः तिसऱ्या अंकातला दोघांचाही अभिनय खास उल्लेखनीय. असि. जेलर बानर्जी (सीताराम सामंत) व जोसेफ (नान संझगिरी) या त्यां मानानं मागं पडलेल्या आणि लेखनातही थोडचा कच्च्या, तृतीय श्रेणीच्या ठरलेल्या व्यक्तिरेखा ठीक वठल्या. क्रांतिकारकाच्या भूमिकेत बाळ धुरी यांनी काहीसा अपेक्षाभंगच केला. अकारण चढा आवाज, नाटकी हालचाली व दृष्टिक्षेप व अवघडल्यासारखा वाटणारा रंगमंचावरील वावर हे दोष त्यांच्याकडून अपेक्षित नव्हते. एरवी नाटक बंदिस्त, रेखीव आणि देखणंही वसवणाऱ्या दिग्दर्शक दारव्हेकरांचं याकडे थोडं दुर्लक्ष झाल्यासारखं वाटतं. अर्थात तरीही, एकाचवेळी बुद्धिवाद व भावनाशीलता दोघांनाही appealing ठरणारी नाट्यवस्तू आणि क्वचित आढळणारी समर्थ व्यक्तिचित्रणांची मैफल यासाठी हे नाटक दीर्घकाळ लक्षात राहील. □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**११।१२।७६ ते १७।१२।७६**

**मेष : स्त्रीकडून फायदा**

तुम्ही अडचणीतून बाहेर पडला आहात. रवी–मंगळ आठवे, गुरू पहिला, बुध भाग्यस्थानी व शुक्र दहावा अशी या वेळेची ग्रहांची रचना आहे. हे ग्रह तुमचे भाग्य उदयाला आणणार आहेत. व्यापारात तुमची गती विशेष करून जास्त प्रत्ययाला येईल. अडचणी संपून नवे प्रगतीचे पर्व सुरू होईल. यावेळी तुम्हाला एखादी धनवान स्त्री आर्थिकदृष्टचा उपकारक ठरण्याची शक्यता आहे. स्वतंत्र धंदा जर काढलात तर स्त्री-भागीदार घ्या. नोकरीत बरेच अनुकूल स्थित्यंतरे घडण्याची स्वप्ने दृष्टिपथात येतील. वरिष्ठांच्या विश्वासात तुमची गणना होऊं लागेल. शुभ दिनांक १२-१४.

**महिलांना :** गायन, नृत्य वगैरे कलाक्षेत्रांत नाव चमकेल.

**विद्यार्थ्यांना :** श्रमाचे चीज होईल. यश दुणावेल.

**वृषभ : मार्ग ठरेल**

वक्री स्थितीत गुरू आता बारावा झाला असला तरी त्यामुळे तुमचे कोणतेच नुकसान होणार नाही. लेखक व प्रकाशक यांनी लेखणी सैल सोडू नये, एवढेच पथ्य पाळावे. आर्थिक बाजू सुधारेल. एखादी सरकारी स्त्री–अधिकारी व्यवसायाला फक्त मार्गदर्शक म्हणून सहवासात येण्याची शक्यता आहे. रवी–मंगळ सातवे आहेत. संसारात व कौटुंबिक जीवनात नवे सुखकारक घडण्याचा संभव आहे. मात्र नवीन संसारी व्यक्तींनी भांडणाला संधी देऊ नये. एकमेकांना समजून घेणे जरूर आहे. सिनेकलावंत, चित्रकार, नाटचव्यवसायी तसेच गायक लोकप्रियता मिळवतील. शुभ दिनांक १३-१५.

**महिलांना :** भरतकाम, विणकाम लोकांच्या स्तुतीला पात्र ठरेल.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक बाजू भक्कम होईल

**मिथुन : धनलाभ होईल**

आठवा शुक्र हाच यावेळी तुमचा भाग्यदाता ठरणार आहे. प्रवास घडून एखादी उच्चपदस्थ व्यक्ती तुमच्या हिताला उपकारक ठरणार आहे. वारसहक्काने स्थावराची प्राप्ती होईल. रेस व लॉटरीत नशिबाची परीक्षा पास होऊ शकाल. सौंदर्यप्रसाधने, कापड, रेशमी कापड या व्यापारात भरपूर लाभ होईल. फिरत्या विक्रीच्या योजना आखून त्या प्रत्यक्षात आणणारे स्त्री–पुरुष खूप पैसा कमावतील. नोकरीत बरेच काही हितकारक घडेल. सरकारीदरबारी रेंगाळून पडलेली अनेक कामे मार्गी लागतील. जुने हक्क व बाकी मिळेल. कर्जाची डोकेदुखी कमी होईल. शुभ दिनांक ११–१२.

**महिलांना :** लॉटरीत अवश्य भाग घ्या.

**विद्यार्थ्यांना :** वाङमयाचा अभ्यास यशस्वी होईल.

**कर्क : विवाहेच्छूंना शुभवार्ता**

शुक्र मकर राशीत चंद्रासमोर आहे. शनी पहिला आहे. पण रवी-मंगळ पाचवे असून त्यांचा नवपंचमयोग चंद्राबरोबर होत आहे; ही विशेष लाभकारक गोष्ट होय. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह ठरत नव्हते किंवा अडचणी येत होत्या, त्यांचे विवाह अनपेक्षितपणे या वेळी ठरतील. पालक काळजीमुक्त होतील. पैशाची या आठवड्यात अजीबात काळजी राहणार नाही. धंद्यात तेजीचे वातावरण राहून मोठी उलाढाल होईल. धंद्याचे तंत्र जमेल. धंद्यातील अडचणी कमी होतील. बेकारांना वनवास संपण्याची चाहूल या वेळी लागेल. नोकरीत प्रमोशनचे जमून जाईल. बदलीचा प्रयत्न करू नका. कामातही बदल करू नका. शुभ दिनांक १४-१५.

**महिलांना :** नोकरीत चांगले दिवस आहेत. वरिष्ठांची मर्जी राहील.

**विद्यार्थ्यांना :** डोळचांना सुखावणारी व्यक्ती भेटेल.

**सिंह : काळजी संपली**

वृश्चिक राशीत रवी-मंगळाचे वास्तव्य अजून आहे. त्यामुळे मानसिक समाधान किंवा स्वास्थ्य अजून काही काळ तरी तुम्हाला मिळणार नाही. पण भाग्यस्थानी असलेला गुरू व त्याचा राशीचंद्राबरोबर होणारा नवपंचमयोग यामुळे तुमच्याबाबतीत आता काळजी संपलेली आहे. बाराव्या शनीची तुम्ही मुळीच काळजी करू नका. मकर राशीत शत्रुस्थानी शुक्र आहे. स्त्री-विरोधक गुप्त कारवाया करू शकतील. पण त्याची फिकीर करू नका. हा आठवडा

तुमची प्रतिष्ठा उंचावणारा आहे. सार्वजनिक मानसन्मान मिळेल. लेखक व पत्रकार यांना लोकप्रियता मिळेल. उच्चपदस्थांबरोबर सुखसंवाद होईल. शुभ दिनांक १२-१३.

**महिलांना :** नोकरीत प्रामुख्याने महत्त्वाचा असा हा आठवडा आहे. अधिकारात वाढ.

**विद्यार्थ्यांना :** मुलींच्या बाबतीत खोडया वगैरेंपासून दूर राहा.

**कन्या : कार्यक्षमता वाढेल**

अजून एक आठवडा रवी तिसरा आहे. तसेच मंगळदेखील तिसरा आहे. त्यामुळे तुमच्या अंगभूत गुणांना वाव मिळणार असून, नोकरीत कार्यक्षमता वाढेल. वरिष्ठांची मर्जी संपादन होईल. तुम्ही तुमची जबाबदारी पार पाडू शकाल. कामांची गर्दी असली किंवा ताण पडत असला तरी त्याची फिकीर करू नका. आर्थिक बाजू थोडी फार सुधारली तरी बचतीची योजना अमलात येणे कठीण. दुय्यम धंदा वाढवायला बराच वाव मिळेल. हाती घेतलेली कामे पुरी होऊ शकतील. सार्वजनिक व वाङ्मयक्षेत्र याबाबतीत नवी क्षेत्रे उपलब्ध होतील. जुने संबंध पुन्हा प्रस्थापित होतील. नवा मित्रपरिवार जोडण्यात यश मिळेल. उच्च लोकांशी संबंध येईल. शुभ दिनांक १४-१६.

**महिलांना :** तब्येतीची काळजी मुळीच करू नका. नोकरीत भाग घ्या.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत मोठे यश पदरात पडेल. उत्साह राहील.

**तूळ : कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल**

गेल्याच आठवडयात गुरूने मेष राशीत म्हणजे तुमच्या सप्तमस्थानी मुक्काम ठोकला असल्यामुळे तुमच्या कौटुंबिक अडचणींचा आता निरास होऊ लागणार आहे. तुमच्यापैकी जे विवाहाच्या तयारीत असतील त्यांना अत्यंत अनुकूल असा हा आठवडा आहे. कटकटीशिवाय चटकन विवाह ठरतील व पार देखील पडतील. नवरा-बायकोंचो भांडणे समाप्त होऊन प्रेमाचे नवे पर्व सुरू होईल. इतर बाबतीत आठवडा प्रगतीचा आहे. दुसरे रवी-मंगळ पैसा खूप खर्च करायला लावणार असले तरी तो मिळण्याला उणेपणा नाही. स्त्रीकडून धनलाभ होण्याची शक्यता आहे. नोकरीत कामांचा ताण वाढेल. पण कार्यक्षमता वाढेल. शुभ दिनांक १५-१६.

**महिलांना :** मुलांचे कौतुक होईल. पतीचे प्रेम वृद्धिंगत होईल.

**विद्यार्थ्यांना :** प्रेम व सहानुभूती मिळेल.

**वृश्चिक : कर्तबगारीला वाव**

राशीत रवी-मंगळ आहेतच. तिसरा शुक्र सहकार्याचे क्षेत्र वाढवणार आहे. नवे नवे क्षेत्र दृष्टिपथात आणणार आहे. उद्योगात भांडवल मिळून शेती व रासायनिक उद्योग सुधारू लागतील. नोकरीत मालक व वरिष्ठांबरोबर मर्जीप्रमाणे सुसंवाद होईल. एखादी नवी जबाबदारी सोपवण्यात येऊन गुणांना वाव देण्यात येईल. सरकारी नोकरीत असलेल्या लोकांनी अधिकाराचा वापर फार जपून करावा. पैशाचे व्यवहार काळजीपूर्वक करावे. इंजिनीयरिंग उद्योगात असलेल्या नोकरांना शुभवार्ता कळेल. पगारवाढ मिळू शकेल. सार्वजनिक कामात मान मिळेल. कलाक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल. व्याप वाढेल प्रवासात फायदा होईल. शुभ दिनांक १४-१५.

**महिलांना :** नोकरीत फार अनुकूल अशा घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** भांडण टाळणे आवश्यक आहे.

**धनू : ईश्वरी कृपा**

गेल्या आठवडयातच राशिस्वामी गुरू पाचवा झाला आहे. तोच तुमचा हितकर्ता असल्यामुळे गेल्या काही दिवसांत तुमच्याभोवती निर्माण झालेली गैरसमजाची कोंडी आता फुटणार आहे. या वेळी तुम्ही अपेक्षित पत्रव्यवहार करून तुमचे हितसंबंध वाढवू शकता. तुमच्या कल्पकतेला योग्य क्षेत्र उपलब्ध होणार आहे. नोकरीत आता कोणतीच अडचण राहणार नाही. बिघडलेले संबंध पुन्हा प्रस्थापित होतील. कौटुंबिक अस्वस्थतेची गाडी पुन्हा स्वास्थ्याच्या रुळावर येऊ लागणार आहे. कार्यक्षमता व उत्साह वाढता राहील. लेखनाची हौस पुरी होईल. बुद्धीला नवी दालने मोकळी होतील. गुरूमुळे आध्यात्मिक शक्ती वाढेल. सुख व समाधान मिळेल. शुभ दिनांक ११-१४.

**महिलांना :** उत्कर्षाचे व कौटुंबिक सुखाचे वारे वाहणार आहेत.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासाची-प्रगती डोळयात भरेल.

**मकर : व्यक्तिमत्त्व उंचावेल**

या आठवडयास रवी बारावा होणार आहे. त्याकडे दुर्लक्ष करू नका. तुम्ही जर नोकरीस उच्चपदावर असाल तर समंजसपणाने बोलणे आवश्यक होईल. नको त्या लोकांची सहकार्य करणे भाग पडेल. राजकारणात तुम्ही आजवर जे डावपेच खेळलात ते उलटणार नाहीत, याची खबरदारी घ्या. नोकरीत आपले काम स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. वरिष्ठांच्या विश्वासावर अवलंबून राहू नका. आर्थिक परिस्थिती एकूण चांगली राहील. लॉटरीत लाभ होईल. शेतीमुळे घरची परिस्थिती समाधानकारक राहील. राशीत शुक्र आहे. तो व्यक्तिमत्त्व आकर्षक बनवून प्रभाव पाडील. शुभ दिनांक १५-१६.

**महिलांना :** स्थावराच्या तंटयात वाद न वाढवता समझोता करा. फायदा होईल.

**विद्यार्थ्यांना :** स्मरणशक्ती तल्लख होईल. यश द्विगुणीत येईल.

**कुंभ : यश जवळ येईल**

तुम्ही अनेक दिवस ज्या एका साध्याची वाट पाहात होता ते सध्या यावेळी अनपेक्षित साध्य होणार आहे. तुमचे सार्वजनिक जीवनातील स्थान उंचावणार आहे. राजकारणात एक स्त्री-व्यक्ती तुमच्या आश्वासनाची पूर्ती करणार असून तुम्हाला मोठे पद बहाल करणार आहे, धंदाव्यवसाय सुरळीत चालणार आहे. तुम्हाला काही नवे धाडस प्रामुख्याने धंद्यात करावयाचे असेल तर त्याला गुरू-शनीची चांगलीच साथ मिळणार आहे. शिवाय रवी-मंगळासारखे ग्रह तुमची आर्थिक समृद्धी करण्यासाठी दाखल असल्यामुळे यावेळी तुम्ही उत्साहाने कामास लागणे आवश्यक आहे. लॉटरीत लाभ होईल. शुभ दिनांक १३-१६.

**महिलांना :** सेवा व धंदा यात मोठे यश मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** कोणत्याही स्पर्धेत भाग घ्या. सफलता मिळेल.

**मीन : अनुकूल काळ**

भाग्यस्थानी मंगळ आहे तर दशमस्थानी रवी विराजमान होत आहे. अशा वेळी तुम्ही स्वस्थ बसण्यात काय अर्थ आहे ? एखादी महत्त्वाची योजना घ्या व त्याच्या उभारणीसाठी उभे राहा. उद्योगपती, व्यापारी, राजकीय नेता, पुढारी व उच्चपदस्थ अधिकारी यांपैकी कुणीही तुमची योजना यशस्वी करण्यासाठी तुम्हाला साहाय्यभूत होईल. स्वतंत्र धंदा, व्यापार, प्रकाशन यांपैकी कोणत्याही क्षेत्रात पाऊल टाका. यश हाती येणार आहे. चालू धंद्यात अन्य कोणताच त्रास उरलेला नाही. अडचणी दूर होत आहेत. दुसरा गुरू राशिस्वामी असल्यामुळे बौद्धिक लाभ करून देणार आहे. पत्रकार, लेखक, कलाकार यांना प्रसिद्धी व पैसा लाभणार आहे. मानही मिळणार आहे. शुभ दिनांक १४-१७.

**महिलांना :** साहित्यिक म्हणून नाव गाजणार आहे. नोकरीत यश.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणाचे नवे क्षेत्र उपलब्ध होईल. □